




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार २७ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







## बसपा आमदाराच्या घरात घबाड



- 11 कोटींची रोकड मिळाली
- महागडे घड्याळे-दागिने जप्त
- 1000 कोटींच्या करचोरी प्रकरण

**बलिया/नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बसपाचे एकमेव आमदार उमाशंकर सिंह यांच्या ठिकाणांवर आयकर विभागाची छापेमारी दुस-या दिवशीही सुरू आहे. सोनभद्र, कौशांबी आणि बलिया येथे कारवाई सुरू आहे, तर लखनौ येथील निवासस्थानी छापेमारी संपली आहे. येथे पथकाला सुमारे साडे ११ कोटी रुपये रोख रक्कम मिळाली आहे. याशिवाय महागडी घड्याळे, सोने-चांदी आणि मौल्यवान दागिनेही जप्त करण्यात आले आहेत. बुधवारी आयकर पथकाने एकाच वेळी १५ हून अधिक ठिकाणांवर छापेमारी केली होती. सूत्रांनुसार, आयकर विभाग १००० कोटी रुपयांच्या करचोरी प्रकरणात फाईल्स, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि इतर नोंदी तपासत आहे. मात्र, अधिकृतपणे जप्तीची पुष्टी करण्यात आलेली नाही. लखनउमध्ये बुधवारी सकाळी साडेसात वाजता सुरू झालेली कारवाई गुरूवारी सकाळी ९ वाजेपर्यंत चालली. सुमारे ५० अधिका-यांनी शोधमोहीम राबवली. यावेळी कोणालाही आत-बाहेर जाण्यास मनाई करण्यात आली होती. आमदार आणि त्यांचे कुटुंब घरातच उपस्थित होते. सोनभद्रमध्ये, छत्रशक्ती कन्स्ट्रक्शनच्या कार्यालयात २४ अधिकारी उपस्थित आहेत. गेट आतून बंद आहे. कंपनीचे कर्मचारीही आत आहेत. रात्री बाहेरून जेवण मागवून अधिका-यांनी भोजन केले. बुधवारी अधिकारी व-हाडी बनून पोहोचले होते. त्यांच्या गाड्यांवर लग्नाचे पंपलेट लावलेले होते. उमाशंकर सिंह हे बलियाच्या रसडा विधानसभा मतदारसंघातून सलग तीन वेळा आमदार आहेत. त्यांना ब्लड कॅन्सर आहे. ते गेल्या महिन्यातच अमेरिकेतून रक्त बदलून परतले आहेत. सध्या, लखनउ येथील निवासस्थानी आयसोलेशनमध्ये राहून उपचार घेत आहेत. बसपा सुप्रीमो मायावती यांनी या छापेमारीला मानवतेच्या विरोधात असल्याचे म्हटले होते. योगी सरकारमधील मंत्री दिनेश सिंह हे उमाशंकर सिंह यांचे व्याही आहेत. ते म्हणाले एका मुलीचा बाप असल्याने मी तिच्या सुख-दुःखात तिच्यासोबत उभा राहीन. मुलगी सोडता येत नाही, राजकारण सोडता येते.

## अल्पवयीन मुलांवर कुकर्म झाल्याची पुष्टी



- शंकराचार्य प्रकरणात दावा
- वैद्यकीय अहवाल आला
- अविमुक्तेश्वरानंदांनी शोषण केले

**वाराणसी/वृत्तसंस्था :** शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांच्या विरोधात लैंगिक छळाच्या प्रकरणात मुलांचा वैद्यकीय अहवाल आला आहे. पोलिस सूत्रांचा दावा आहे की त्यांच्यासोबत कुकर्म झाल्याची पुष्टी झाली आहे. बुधवारी पोलिसांनी पीडित अल्पवयीन मुलांची वैद्यकीय तपासणी केली होती. प्रयागराज येथील सरकारी रुग्णालयात दोन डॉक्टरांच्या पॅनेलने वैद्यकीय तपासणी केली होती. त्यानंतर गुरुवारी बंद लिफाफ्यात अहवाल तपास अधिका-याला सोपवण्यात आला. आता तो शुक्रवारी न्यायालयात सादर केला जाईल. पोलीस सूत्रांनुसार, बटूंशी कुकर्म कोणी केले? कधी केले? कुठे केले? हा तपासाचा विषय आहे. संपूर्ण तपासानंतर अविमुक्तेश्वरानंद यांच्यावरील आरोप किती खरे आहेत, हे स्पष्ट होईल. झुंसी पोलिस ठाण्याचे प्रभारी महेश मिश्र यांनी सांगितले की, वैद्यकीय तपासणी झाली आहे. हे न्यायालयाचे प्रकरण आहे. अधिक माहिती देउ शकत नाही. यापूर्वी, शंकराचार्यांवर गुन्हा दाखल करणारे आशुतोष महाराज यांनी बुधवारी सांगितले होते की, सर्व पुरावे आहेत. वैद्यकीय तपासणीत बटूंवर झालेल्या कुकर्माची पुष्टी झाली आहे. लवकरच न्याय मिळेल. दरम्यान, एक पीडित बटू पहिल्यांदाच माध्यमांसमोर आला. त्याने मुलाखतीत दावा केला मी अभ्यासासाठी गेलो होतो, तेव्हा माझे शोषण करण्यात आले. आमच्यासोबत इतरही मुले होती, त्यांचेही शोषण करण्यात आले.

## सफाई कामगार, ड्रायव्हरचा पगार आयएएसपेक्षाही जास्त



**हैदराबाद /वृत्तसंस्था :** तेलंगणाच्या आर्थिक स्थितीसंदर्भात एक अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली असून हैदराबादमधील सेंटर फार इकानामिक अँड सोशल स्टडीजतर्फे आयोजित १६ व्या वित्त आयोगाच्या परिषदेत राज्याचे मुख्य सचिव के. रामकृष्ण राव यांनी बुधवारी (२५ फेब्रुवारी २०२६) राज्याच्या वाढत्या आर्थिक बोजासंदर्भात अत्यंत धक्कादायक भाष्य केले आहे. गेल्या दहा वर्षांत तेलंगणाचा मासिक वेतन आणि पेन्शन खर्च तब्बल चार पटींनी वाढला असून तो ६००० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. धक्कादायक आणि थक्क करणारी गोष्ट म्हणजे, राज्यातील काही वरिष्ठ सफाई कामगार आणि ड्रायव्हर्सचा पगार हा चक्क आयएएस अधिकारी आणि राज्यपालांच्या पगारापेक्षाही अधिक झाला आहे. तेलंगणा राज्याची निर्मिती २०१४ मध्ये झाली. आंध्र प्रदेशचे दोन राज्यांत रुपांतर होउन तेलंगणा राज्य जन्माला आले. निर्मिती वेळी वेतन आणि पेन्शनचे एकूण बिल १,५०० कोटी रुपये महिना एवढे होते. जे आता ३०० टक्क्यांच्या वाढीसह ६००० कोटींच्याही वर पोहोचले आहे. मुख्य सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार, वीज विभाग आणि सरकारी संस्थांमध्ये सातत्याने होणा-या वेतन सुधारणेमुळे अशी परिस्थिती येउन उभी ठाकली आहे. मुख्य सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार, वीज विभागातील मुख्य अभियंत्यांचे वेतन ७ लाख रुपयांपर्यंत पोहोचले असून ३० वर्षांची सेवा पूर्ण केलेले सफाई कर्मचारी २ लाख रुपये, तर ड्रायव्हर्स १ लाख रुपयांहून अधिक वेतन घेत आहेत. जीएचएमसीमधील नियमित सफाई कर्मचा-यांना सरासरी ७० हजार रुपये वेतन आणि भत्ते मिळतात. तसेच नव्याने रुजू झाल्या कर्मचा-यांचे वेतन २८,००० रुपयांपेक्षाही अधिक आहे.

# टिपू सुलतानाने 75 हजार हिंदूंची कत्तल केली

## पण आपल्याला वर्षानुवर्षे खोटा इतिहास शिकवला गेला: देवेंद्र फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी :** टिपू सुलतान हा चांगला होता की नाही, नंतरची गोष्ट आहे. पण आमचा आक्षेप या गोष्टीवर आहे की, कोणीतरी म्हणतं टिपू सुलतान छत्रपती शिवरायांपेक्षा मोठे राजे होते. छत्रपती शिवरायांइतकं गुणगान टिपू सुलतानाचं केलं पाहिजे, असे म्हटले जाते, या गोष्टीवर आमचा आक्षेप आहे. गेली अनेक वर्षे देशाच्या इतिहासाशी छेडछाड करण्यात आली, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते गुरुवारी विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत बोलत होते. यावेळी त्यांनी टिपू सुलतान आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या तुलनेच्या मुद्द्यावरुन विरोधकांना प्रत्युत्तर दिले.

गेली अनेक वर्षे या देशाच्या इतिहासाशी छेडछाड करण्यात आली. वर्षानुवर्षे आपल्याला हे शिकवण्यात आले की, टिपू सुलतान हे महान राजे होते. पण टिपू सुलतानाने ७५ हजार हिंदू आणि ३३ हजार नायरांची कत्तल केली, हे कधी शिकवण्यात आले नाही. ते इंग्रजांशी का लढले हे कोणी सांगितलं नाही. टिपू सुलतान स्वतःचं राज्य वाचवायला इंग्रजांशी लढला, हे आपल्याला कधीच सांगण्यात आले नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

आता खरा इतिहास समोर येत आहे. वर्षानुवर्षे देशात एनसीआरटीच्या पुस्तकात मोघली साम्राज्याला १७ पानं देण्यात आली, छत्रपती शिवाजी महाराजांविषयी या पुस्तकात एकच परिच्छेद होता. आता मोदी सरकारने एनसीआरटीच्या पुस्तकात मराठ्यांच्या इतिहासाला २० पानं दिली आहेत. योग्यवेळी नीट इतिहास शिकवला असता तर आज देशातील एकाही मुसलमानाने औरंगजेबाला हिरो म्हटले नसते. पण आपण खरा इतिहास कधीच शिकवला नाही. या देशात राष्ट्रभक्त मुसलमान आहेत. मला त्यांच्याविषयी कुठलाही आक्षेप नाही. पण जे लोक देशाच्या विरोधकांना आणि आक्रमणका-यांना हिरो मानतील, त्यांना आम्ही सोडणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात विरोधी पक्षांना लक्ष्य केले. विरोधी पक्ष हा भ्रमित आणि संभ्रमित आहे, असे दिसते. माझी त्यांना सूचना आहे की, भ्रमात राहून धावण्यापेक्षा संभ्रमातून बाहेर पडण्यासाठी शांतपणे विचार करुन मुद्दे मांडले पाहिजेत. जेणेकरुन महाराष्ट्राच्या हितात तुमचे योगदान वाढेल. ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था, विकसित भारत, महाराष्ट्राची वाटचाल याबाबत विरोधी पक्षाच्या मनात गल्लत आहे. त्यांनी हा विषय नीट समजून घेतलेला नाही, किंवा त्यांना तो समजलाय पण त्यांना जनतेला संभ्रमित करायचे आहे. आम्हाला मनात कुठेही शंका नाही, महाराष्ट्र देशातील पहिली सब नॅशनल ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी होईल. भारत ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था होईल, ४ ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा आताच पार केला आहे. महाराष्ट्र ही देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. आपण दरवर्षी ३ लाख ६० हजार कोटींचा जीएसटी जमा करतो. जीएसटीबाबत दुस-या क्रमांकाचे राज्य आपल्या आसपासही नाही. कृषी निर्यात आणि सेवा क्षेत्रातही महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्राने जीडीपीच्या तुलनेत कर्जाच्या गुणोत्तराचे प्रमाणही उत्तम ठेवले आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## 1 मार्चपासून व्हॉट्सअ‍ॅप चालणार नाही



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की 'सिम बाइंडिंग'चे नियम लागू करण्याची २८ फेब्रुवारीची अंतिम मुदत वाढवली जाणार नाही. नवीन नियमांनुसार फोनमध्ये सिम कार्ड नसल्यास व्हाट्सअपसारखे मेसेजिंग अ‍ॅप काम करणार नाहीत. कॉम्प्युटरवर लॉगिन केलेले व्हॉट्सअ‍ॅप देखील ६ तासांत लॉग-आउट होईल. जेव्हा तुम्ही एखाद्या अ‍ॅपला सिम बाइंडिंगशी जोडता, तेव्हा ते अ‍ॅप तेव्हाच उघडेल जेव्हा तुमचे नोंदणीकृत सिम कार्ड त्याच फोनमध्ये असेल. हा नियम १ मार्च २०२६ पासून लागू होईल.केंद्रीय संचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी सांगितले की, सध्या नियमांचे पालन करण्याची मुदत वाढवण्यावर कोणताही विचार नाही. ते म्हणाले की, हे नियम राष्ट्रीय सुरक्षा आणि फसवणूक रोखण्यासाठी लागू करण्यात आले आहेत आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर सरकार कोणतीही तडजोड करणार नाही.युजर्सना हे सुनिश्चित करावे लागेल की त्यांचे व्हॉट्सअ‍ॅप ज्या नंबरवर आहे, ते सिम त्याच फोनमध्ये असावे. जर सिम कार्ड फोनमधून काढले तर मेसेजिंग अ‍ॅप काम करणे बंद करू शकते. इंडस्ट्री असोसिएशन IAMAI ने सरकारला इशारा दिला आहे की, दर ६ तासांनी लॉग-आउट करण्याचा नियम कामासाठी व्हॉट्सअ‍ॅप वेबवर अवलंबून असलेल्या प्रोफेशनल्ससाठी त्रासदायक ठरेल. तसेच, एकाच अकाउंटचा वापर करणा-या कुटुंबांनाही अडचणी येतील. केंद्र सरकारच्या आदेशानुसार, कंपन्यांना १२० दिवसांच्या आत याबाबत अहवाल सादर करावा लागेल. नियमांचे पालन न केल्यास दूरसंचार कायदा २०२३, दूरसंचार सायबर सुरक्षा नियम आणि इतर लागू कायद्यांनुसार कारवाई केली जाईल.

## जिल्हा परिषद अन् पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य




**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर तेथे स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली आहे. संख्याबळाच्या आधारावर पक्षांना हे स्वीकृत नगरसेवकपद मिळाले आहेत. त्यातच, नुकतेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकाही पार पडल्या असून आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य असणार आहेत. राज्य मंत्रिमंडळातया निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची सूत्रांची माहिती आहे. जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. किमान ५ सदस्य निवडणे बंधनकारक असणार आहे. यासंदर्भात लवकरच विधिमंडळात कायदा पारीत केला जाणार असल्याची माहिती आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वीकृत सदस्यसंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. ग्रामीण राजकारणाच्या दृष्टीने सरकारचा हा महत्त्वाचा निर्णय आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी यापूर्वीच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. ➪(पान २ वर)

# हा भारत आहे, उत्तर कोरिया नाही:राहूल गांधी

- शांततापूर्ण आंदोलन लोकशाहीचा आत्मा
- युवक काँग्रेस सदस्यांवर कारवाईवरून टीका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संसदेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी सोशल मीडिया X वर युथ काँग्रेस सदस्यांविरुद्धच्या कारवाईवरून पंतप्रधानांवर टीका केली. त्यांनी आपल्या पक्षाच्या युवा शाखेच्या सदस्यांविरुद्ध शर्टलेस आंदोलनासंदर्भात झालेल्या पोलीस कारवाईवर भाष्य केले.ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे सरकार आणि उत्तर कोरियाचे हुकूमशाही शासन एकसारखे आहे. ते म्हणाले की, हे भारत आहे, उत्तर कोरिया नाही. राहुल म्हणाले की, शांततापूर्ण आंदोलन लोकशाहीचा आत्मा आहे. हा कोणताही गुन्हा नाही. जेव्हा आदिवासी आपल्या जल, जंगल, जमिनीच्या हक्कांसाठी उभे राहिले, तेव्हा त्यांच्याकडेही



संशयाने पाहिले गेले. ही कसली लोकशाही आहे, जिथे पंतप्रधान प्रश्नांना घाबरतात? जिथे मतभेदांना चिरडणे शासनाचा स्वभाव बनत चालला आहे? खरं तर, दिल्लीत आयोजित AI ➪(पान २ वर)

### मोदीजी, एपस्टीन फाइल्समध्ये तुमचे नाव

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी यापूर्वी २३ फेब्रुवारी रोजी सोशल मीडिया X वर एक व्हिडिओ शेअर केला होता. यात ते म्हणाले- मोदीजी, एपस्टीन फाइल्समध्ये तुमचे नाव आले, तुम्हाला लाज वाटायला पाहिजे. तुम्ही अमेरिकेशी व्यापार करार करून देशाला ट्रम्पच्या हाती विकले. त्यांनी सांगितले की, संपूर्ण देशाला माहीत आहे, अदानीवर अमेरिकेत सुरू असलेल्या प्रकरणामुळे तुमची रात्रीची झोप उडाली आहे, कारण ते भाजप आणि तुमच्या आर्थिक संरचनेवरील प्रकरण आहे. राहुल गांधींचे हे विधान २२ फेब्रुवारी रोजी मेरठमध्ये पंतप्रधानांनी दिलेल्या विधानानंतर आले आहे. येथे एका सभेत मोदींनी म्हटले होते की, दिल्लीत आयोजित AI समिटमध्ये काँग्रेसवाल्यांना नग्न होण्याची गरज नव्हती. काँग्रेसवाले आधीच नग्न आहेत.

## सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड



**मुंबई/प्रतिनिधी :** अजित पवार यांच्या जाण्याने नुकसान झालं. अजित पवारांमुळे राज्यात आणि देशात आपली ओळख निर्माण झाली होती, सामान्य कुटुंबातून ते आले होते. २०२३ मध्ये अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष झाले, हे सांगण्यात मला कोणतीही अडचण नाही, असे म्हणत राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या बैठकीत सुनेत्रा पवारच राष्ट्रीय अध्यक्ष असल्याची घोषणाही करण्यात आली आहे. पटेल यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत याबाबतचा प्रस्ताव मांडला, त्याच सर्वानुमते सहमती दर्शवण्यात आली. दरम्यान, पार्थ पवार यांच्याकडेही मोठी जबाबदारी देण्यात येणार असल्याची माहिती आहे. अजित दादा २८ जानेवारी दिवशी आपल्यातून निघून गेले, आपल्या सर्वांसाठी ते धक्कादायक होतं. आपल्या सर्वांना प्रश्न होता उद्या आपण काय करणार, ➪(पान २ वर)

## पार्थ अजित पवार राज्यसभेचे उमेदवार

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा केली. यावेळी सुनेत्रा अजित पवार यांनी देशभरातील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यानंतर प्रफुल्ल पटेल यांनी राज्यसभेचे उमेदवार म्हणून पार्थ अजित पवार यांचे नाव जाहीर केले.अजित पवार यांच्या निधनानंतर उद्भवलेल्या कठीण परिस्थिती सुनेत्रा पवार यांनी नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारत राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. अजितदादांच्या पश्चात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे काय होणार, विलीनीकरणाची प्रक्रिया कशी राबवली जाणार याबाबत अनेक सवाल उपस्थित केले जात होते. अखेरीस राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. तसेच पार्थ पवार यांच्या नावाची घोषणा राज्यसभेचे उमेदवार म्हणून करण्यात आली.

# शनिवारी पाहायला मिळणार ग्रहांचा मेळावा

**बंगळूरू /वृत्तसंस्था :** अवकाशप्रेमी आणि खगोलशास्त्राची आवड असलेल्या सर्वांसाठी २८ फेब्रुवारी २०२६ ची संध्याकाळ एक अविस्मरणीय मेजवानी घेउन येत आहे. या दिवशी सूर्यास्तानंतर आकाशात बुध, शुक्र, गुरू, शनी, युरेनस आणि नेपच्यून हे सहा ग्रह एका रांगेत उभे राहिलेले दिसतील. विशेष म्हणजे, या रांगेत मंगळ नसला, तरी हे सहा ग्रह रात्रीच्या आकाशाचे सौंदर्य वाढवतील.

- ब्रम्हांडाचा अद्भूत सोहळा
- दुर्बिणीशिवाय पाहता येणार
- 6 ग्रहांची परेड



***कोणत्या ग्रहाला कुठे शोधाल?***

**१. गुरू :** हा ग्रह पाहण्यासाठी सर्वात सोपा असेल. २८ फेब्रुवारीला सूर्यास्ताच्या वेळी गुरू पूर्व आकाशात उंच दिसेल. मिथुन राशीतील चंद्र आणि कॅस्टर-पोलक्स ता-यांजवळ तो शोधणे सोपे आहे.

**२. शुक्र :** हा बुधापेक्षा वरच्या बाजूला अत्यंत तेजस्वीपणे चमकताना दिसेल. शुक्र संध्याकाळी उशिरा मावळतो, त्यामुळे तो पाहण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल. बुधाला शोधण्यासाठी शुक्राची मदत होउ शकते.

**३. बुध :** हा ग्रह पश्चिम क्षितिजावर थोडा खाली असेल. १९ फेब्रुवारीला तो सूर्यापासून लांब गेल्यामुळे स्पष्ट दिसत होता, मात्र २८ फेब्रुवारीला तो थोडा मंद असू शकतो. तो पाहण्यासाठी दुर्बिणीचा वापर करणे फायदेशीर ठरेल.

**४. शनी :** शुक्र आणि बुधासोबत पश्चिम आकाशात शनीची स्थिती थोडी खाली असेल. हा ग्रह सूर्यास्तानंतर लगेच मावळत असल्याने, त्याला लवकर पाहणे गरजेचे आहे.






## इस्त्रायलमध्ये भारतीय UPI लागू होणार

### मोदी-नेतन्याहू बैठकीत करार



**तेल अवीव//वृत्तसंस्था :** पंतप्रधान मोदींच्या इस्त्रायल दौ-याचा आज दुसरा दिवस आहे. भारताची छ्धक्ष पेमेंट सिस्टीम आता इस्त्रायलमध्ये लागू केली जाईल, असा निर्णय मोदी आणि इस्त्रायली पंतप्रधान नेतान्याहू यांच्यात झालेल्या द्विपक्षीय बैठकीत घेण्यात आला.पंतप्रधान नेतन्याहू यांच्यासोबत संयुक्त पत्रकार परिषदेत मोदींनी सांगितले की, भारत लवकरच इस्त्रायलसोबत मुक्तव्यापार करार (FTA) करणार आहे. इस्त्रायलला भेट देणे ही त्यांच्यासाठी अभिमानाची गोष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.आज सकाळी, पंतप्रधान मोदींनी प्रथम जेरुसलेममधील होलोकॉस्ट स्मारक याद वाशेमला भेट दिली, जिथे त्यांनी हिटलरच्या नाझी राजवटीत मारल्या गेलेल्या साठ लाख ज्यूंना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर मोदींनी इस्त्रायली राष्ट्राध्यक्ष आयझॅक हर्झोग यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय बैठक घेतली. आयझॅक यांनी सांगितले की भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढली आहे आणि जगाचे लक्ष वेधून घेत आहे. पंतप्रधान मोदींनी इस्त्रायली राष्ट्राध्यक्षांना भारत भेटीचे आमंत्रणही दिले.

## इंस्टाग्रामवर 100 मिलियन फॉलोअर्स

### मोदी एकमेव

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंस्टाग्रामवर १०० मिलियन, म्हणजेच १० कोटी फॉलोअर्स झाले आहेत. या प्लॅटफॉर्मवर ही उपलब्धी मिळवणारे ते जगातील पहिले नेते आणि राजकारणी बनले आहेत. पंतप्रधान मोदी २०१४ मध्ये इंस्टाग्रामशी जोडले गेले होते. येथे त्यांचे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यापेक्षा दुप्पटहून अधिक फॉलोअर्स आहेत. ट्रम्प ४३.२ मिलियन फॉलोअर्ससह दुस-या क्रमांकावर आहेत. जगातील ५ मोठ्या नेत्यांच्या एकूण फॉलोअर्सची संख्या मोदींच्या एकट्या फॉलोअर्सच्या संख्येपेक्षा कमी आहे. ट्रम्प यांच्यानंतर इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांटो यांच्याकडे १५ मिलियन फॉलोअर्स आहेत.




# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात
# आधुनिक शरीररचना संग्रहालयाचे उद्घाटन

**अमरावती/प्रतिनिधी:-** वैद्यकीय शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, प्रत्यक्ष व विद्यार्थी केंद्रित व्हावे या उद्देशाने डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथील शरीररचनाशास्त्र विभागात अत्याधुनिक व आधुनिक तंत्रज्ञानाचे सुसज्ज असे शरीररचना संग्रहालय सुरू करण्यात आले आहे. संग्रहालयाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन प्र. देशमुख यांच्या शुभहस्ते व संस्थेचे पदाधिकारी अॅड. गजाननराव पुंडकर, अॅड. जयवंत उपाख्य भैय्यासाहेब पाटील (पुसदेकर),केशवराव मेतकर, दिलीपबाबू इंगोले, सुरेशराव खोटरे, प्रा.सुभाषराव



बनसोड, संस्थेचे आजीवन सभासद तथा स्वतंत्र विकास समितीचे सदस्य डॉ. प्रभाकरराव काळमेघ, डॉ. विरेंद्र वसु, डॉ. विजयराव बोंडे, डॉ. निळकंठ यावलकर, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, विभाग प्रमुख डॉ. दिपाली विधळे, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्नील मोहोड, विभागातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न झाले. या संग्रहालयामध्ये मानवी शरीराच्या विविध अवयवांचे जतन केलेले नमुने, कृत्रिम मॉडेल्स, ३-डी प्रतिकृती, शैक्षणिक चार्टस्, डिजिटल डिस्प्ले, दृक-श्राव्य साधने तसेच आधुनिक अध्यापन साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना मानवी शरीररचनेची सखोल व दृश्यात्मक समज मिळावी, यासाठी संग्रहालयाची रचना करण्यात आली आहे. हे संग्रहालय पदवी व पदव्युत्तर वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे अध्ययन केंद्र ठरणार असून त्यामधून क्लिनिकल समज, निरीक्षणशक्ती व शैक्षणिक गुणवत्ता वाढीस लागेल. उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी अत्याधुनिक संग्रहालयाचे कौतुक केले व क्षमता-आधारित वैद्यकीय शिक्षण अधिक प्रभावी करण्याच्या दिशेने हे संग्रहालय मोलाची भूमिका बजावेल अशी अपेक्षा व्यक्त केली. उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षक, पदव्युत्तर व पदवी विद्यार्थी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे यशस्वीतेकरीता शरीररचनाशास्त्र विभागातील डॉ. गितांजली यादगिरे, डॉ. अनंत काळबांडे, डॉ. आनंद बिजवे, डॉ. सरीता कडू, डॉ. रूग्वेदा, डॉ. खुशबू तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी, टेक्निशिअनस् व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## १ व १० वरिल उर्वरित

### जिल्हा परिषद अन् पंचायत

मुख्यमंर्त्यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, आता राज्य मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे.

**निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्यांना संधी-** ग्रामीण भागात समाजाभिमुख कार्य करणा-या, परंतु निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्या पात्र कार्यकर्त्यांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध होईल,या उद्देशाने महायुती सरकारने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, आता इच्छुक कार्यकर्त्यांना जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सभागृहात बसण्याची संधी मिळणार असल्याचे निश्चित झालं आहे.

### हा भारत आहे, उत्तर कोरिया

समिटदरम्यान युवक काँग्रेसच्या सदस्यांनी शर्ट काढून निषेध केला होता. या संदर्भात दिल्ली पोलीस ३ सदस्यांना अटक करण्यासाठी शिमला येथे पोहोचली होती. त्यानंतर हिमाचल पोलिसांनी दिल्ली पोलिसांना त्यांना घेउन जाण्यापासून रोखले होते. अटक केलेल्या तीन युवक काँग्रेस कार्यकर्त्यांना दिल्लीत परत आणण्याची परवानगी मिळाल्यानंतर राहुल यांनी हे विधान केले.

विचार करा, मुद्दा कोणताही असो, जर तुम्ही सत्तेच्या विरोधात संवैधानिक मार्गाने आवाज उचललात, तर लाठीमार, खटला आणि तुरुंगवास, हे जवळजवळ निश्चित आहे. पेपरफुटीने त्रस्त झालेल्या तरुणांनी आपल्या भविष्यासाठी आवाज उचलला, उत्तर मिळाले लाठ्यांनी. देशातील गौरवशाली महिला कुस्तीपटूंनी भाजपच्या प्रभावशाली नेत्यावर लावलेल्या गंभीर आरोपांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. त्यांच्या हाकेला बदनाम करण्यात आले, आंदोलनाला चिरडले गेले आणि त्यांना रस्त्यांवरून जबरदस्तीने हटवण्यात आले. एका बलात्कार पीडितेच्या समर्थनार्थ इंडिया गेटवर शांततापूर्ण निदर्शने झाली. न्यायाच्या मागणीला व्यवस्थेसाठी गैरसोय मानून दूर करण्यात आले. युवा काँग्रेसने देशाचे नुकसान करणा-या छच ट्रेड डीलचा शांततापूर्ण विरोध केला, तेव्हा त्यांना देशद्रोही ठरवून अटक करण्यात आली.

जेव्हा सामान्य लोक विषारी हवेविरुद्ध उभे राहिले, तेव्हा पर्यावरणाच्या चिंतेलाही राजकारण म्हणून दाबून टाकण्यात आले. जेव्हा शेतक-यांनी आपल्या हक्कांसाठी आंदोलन केले, तेव्हा त्यांना देशविरोधी ठरवण्यात आले. अश्रु धुराचे गोळे, रबरी गोळ्या, पाण्याचे फवारे आणि लाठ्या, हेच संवादाचे माध्यम बनले.दिल्लीतील AI परिषदेत अर्धनग्न अवस्थेत आंदोलन केल्याच्या आरोपावरून ३ युवक काँग्रेस नेत्यांच्या अटकेवरून बुधवारी हिमाचल आणि दिल्ली पोलिसांमध्ये संघर्ष झाला. दिल्ली पोलिसांनी शिमला येथील एका ह?टेलमधून मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातील ३ नेत्यांना अटक केली, परंतु हिमाचल पोलिसांनी त्यांना अर्ध्या वाटेतच रोखले आणि दिल्लीला घेउन जाण्यास मज्जाव केला.

हिमाचल पोलिसांचे म्हणणे होते की, या संदर्भात दिल्ली पोलिसांनी कोणतीही औपचारिक माहिती दिली नाही. हिमाचलमध्ये साध्या वेशात येउन पाहुण्यांना ताब्यात घेण्यात आले. न्यायालयात सुनावणीदरम्यानही दोन्ही पोलिसांमध्ये वाद होत राहिला. यानंतर न्यायाधीशांनी कागदपत्रे तयार करण्यास सांगितले असता, दिल्ली पोलिसांनी पुन्हा कोणतीही कागदोपत्री कारवाई न करता तिन्ही नेत्यांना घेउन गेले.

हे कळताच हिमाचल पोलिसांनी त्यांना पुन्हा थांबवले. यानंतर तिन्ही नेत्यांना न्यायालयात हजर करून दिल्ली पोलिसांनी ट्रान्झिट रिमांडवर घेतले. सुमारे १८ तास दिल्ली आणि हिमाचल पोलिसांमध्ये नाट्य सुरू राहिले. नंतर गुरुवारी सकाळी पावणे ६ वाजता दिल्ली पोलीस तिन्ही नेत्यांना घेउन निघून गेले.

### सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या

कसं करणार? पण सुनेत्राताईच्या नेतृत्वात आपला पक्ष काम करेल, असे प्रफुल पटेल यांनी म्हटले. दरम्यान, राष्ट्रवादीच्या बैठकीसाठी सुनेत्रा पवार, सुनील तटकरे, प्रफुल पटेल, पार्थ पवार, रुपाली चाकणकर छगन भुजबळ यांच्यासह अनेक नेते व पदाधिकारी उपस्थित होते.

मागच्या महिन्यात आपण पाहिलं की, काहीजण बोलू लागले. आपल्या पक्षात काही संबंध नाही ते काहीही बोलायला लागले, आम्ही काय करायचं ते सांगायला लागले. पोटात एक आणि ओठात एक बोलू लागले. परंतु आपण सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री केलं. आपण योग्यवेळी योग्य निर्णय केला. आता, आपल्याला अजित पवारांच्या आदर्शावर पुढे जायचं आहे. आता आपण नव्या अध्यक्षांच्या नेतृत्वात आपली वाटचाल करणार आहोत. आपण सर्वजण याठिकाणी एकत्र आलो आहोत. सगळ्या प्रांतातील लोकं याठिकाणी आले आहेत, असे म्हणत प्रफुल पटेल यांनी सुनेत्रा पवारांच्या नावाची घोषणा केली.

अजित पवारांनी मला राष्ट्रीय कार्याध्यक्ष केलं होतं. त्यांनी माझ्यावर एवढा मोठा वि□ास टाकला होता. पक्ष महाराष्ट्र आणि देशाच्या हितासाठी आम्ही काम केलं. राष्ट्रीय कार्याध्यक्ष म्हणून माझी आणि प्रदेश अध्यक्ष म्हणून तटकरे आणि भुजबळ मुश्रीफ आमची सर्वांची जबाबदारी होती आपला पक्ष आपण कशा प्रकारे पुढे घेउन जाणार आहोत. मी ३५ वर्ष अजित पवारांचा मित्र म्हणून आज घोषणा करत आहे सुनेत्रा पवार यांना राष्ट्रीय अध्यक्ष केल जावं, असा प्रस्ताव प्रफुल पटेल यांनी मांडला. त्यानंतर, सर्वांनी हात उंचावत सहमती दर्शवली. तसेच, मी घोषणा करतोय की राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा अजित पवार यांची निवड करण्यात आली आहे, असे पटेल यांनी जाहीर केले.**अजित पवारांची आठवण -**अजित पवार एका वेगळ्या मातीचेच बनले होते, आपल्यावर अनेक संकटे आली. अजित पवारांनी नेतृत्व हातात घेतल्यानंतर एक वेगळी परिस्थिती निर्माण झाली आपल्याला प्रश्न पडला होता आता आपण पुढे कसं जाणार आहोत. मात्र, अजित पवारांनी कधीही आपला निश्चय कमी होउ दिला नाही. शेवटी नेता तोच असतो जो लढाईमध्ये पुढे येउन लढाई लढतो आणि त्यानुसार त्यांनी लढाई लढली, जिंकली. सुनेत्रा पवार, सुनील तटकरे यांना माहिती आहे की, अजित पवारांबाबत काय भावना होती आणि आता नाहीत त्यावेळी काय आहे. सुनेत्रा पवार ज्यावेळी उपमुख्यमंत्री झाल्या त्यावेळी आम्ही संसदेत गेलो त्यावेळी सगळेजण येउन भेटत होते, त्यांच्या डोळ्यात पाणी होतं, अशी आठवण प्रफुल पटेल यांनी सांगितली.

### अपघाताचा बनाव, अल्पवयीन

खाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, (गुन्हे) रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे व कैलास पुंडकर (गाडगेनगर विभाग) यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, महेश इंगोले, अमोल कडू, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने तसेच पोलीस अंमलदार सुनील लासुरकर, फिरोज खान, सतीश देशमुख, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, जहीर शेख, सचिन बहाळे, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, विकास गुडधे, अतुल संभे, मिर्झा नईम बेग, नाझीम उद्दीन सैयद, विशाल वाकपांजर, सागर ठाकरे, रंजीत गावंडे, राजीक रायलीवाले, सुरज चव्हाण, निखिल गेडाम, योगेश पवार तसेच चालक संदीप खंडारे, प्रभात पोकळे, चेतन शर्मा व राहुल दुधे यांनी ही कारवाई यशस्वी केली. या प्रकरणी आरोपीवर लवकरच औपचारिक अटकेची कारवाई करण्यात येणार असून पुढील तपास सुरू आहे.

### धामणगाव मार्गावर कार-बाईकचा

माहितीनुसार भरधाव कार देवगावजवळ समोरून येणाऱ्या एका दुचाकीला धडकली. यामध्ये भावना कदम यांचा जागीच मृत्यू झाला तर पाच जण जखमी झाले. दुचाकीला धडक देऊन कार रस्त्याच्या खाली उतरली आणि अपघातग्रस्त झाली. धडकेचा आवाज इतका मोठा होता की परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. त्याचवेळी विजय चिंचमलातपुरे आपल्या कुटुंबीयांसोबत लग्न सोहळ्यामध्ये जात होते. त्यांनी जखमींना आपल्या वाहनाने धामणगाव रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्यामुळे जखमींना यवतमाळ आणि अमरावती येथे रेफर करण्यात आले. पोलिसांनी पंचनामा करून गुन्हा दाखल केला आहे.

### मांडवा ग्रामस्थांचे उपोषण मागे

भूमी अभिलेख अधिकारी, उप विभागीय अधिकारी, तंटा मुक्ती समिती अध्यक्ष यांनी मांडवा गावात घटनास्थळी जाऊन उपोषणकर्त्यांच्या मागणीनुसार घटनास्थळाची पाहणी करावी आणि शेतकरी आणि मांडवा गावातील लोकांना न्याय द्यावा,असे लेखी पत्र उपोषणकर्त्यांना देण्यात आले. त्यानंतर उपोषणकर्ते किसन इंगोले, विठ्ठल फरकाडे, दिनेश बेलसरे, अवधूत भौमकाळे, देवराव तिरमारे, सुनील सोनवणे, मुकिंदा गडलिंग,सागर फरकाडे, माहुलकर व इतर शेतकऱ्यांनी माजी आमदार काँग्रेस नेते विरेंद्र जगताप,नायब तहसिलदार अजय बनारसे,अंकुश चवरे यांच्या हस्ते शरबत घेऊन उपोषण सोडले. यावेळी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अमोल होले, प्रफुल्ल कोकाटे, मांडवा सरपंच प्राजक्ता अनिल इंगोले, तंटा मुक्ती समितीचे अध्यक्ष सुनील कोयरे, इंदरपाल बनसोड, बाळासाहेब परकडे, नंदू पनपलिया, जितू ठाकूर, अनिल इंगोले, शिटटू सुर्यवंशी,श्रीनिवास सूर्यवंशी, स्वप्नील मानकर, पंकज मेश्राम,वैभव मलवार तसेच काँग्रेस कार्यकर्ते व मांडवा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गांधी पूल सार्वजनिक वाचनालय

पत्रकापेक्षा २९.७८७ टक्के कमी दराने स्वीकारले होते. मात्र प्रत्यक्ष स्थळी पाहणी केली असता अनेक महत्त्वाचे काम अद्याप अपूर्ण असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. असे असतानाही मोजमाप पुस्तिकेत खोट्या नोंदी करून बिल काढण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिक व युवक संघटनांकडून करण्यात येत आहे.

या प्रकरणात अधिक गंभीर बाब म्हणजे, २७ डिसेंबर २०२५ रोजी मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीने काम पूर्णत्वाचा दाखला देण्यात आल्याचे सांगितले जाते. प्रत्यक्षात मात्र वाचनालयाचे बांधकाम आजही अपूर्ण असून, कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे स्थानिकांनी उघड केले आहे.

स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, बांधकामासाठी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले असून शासनाचा मौल्यवान निधी उघडपणे व बेधडकपणे दुरुपयोग करण्यात आला आहे. 'अपूर्ण कामाला पूर्ण दाखवून लाखो रुपयांची उचल करण्यात आली आहे. यामागे अधिकारी व कंत्राटदार यांचे संगनमत तर नाही ना?' असा थेट सवाल युवा सेना शहर प्रमुख लकी महाराज चौबे यांनी उपस्थित केला आहे.

**सखोल चौकशीची जोरदार मागणी-**अपूर्ण असताना कामाला पूर्णत्वाचा दाखला कसा देण्यात आला? प्रत्यक्ष काम न करता RA Bill कोणत्या आधारावर अदा करण्यात आले? मोजमाप पुस्तिकेत चुकीच्या व खोट्या नोंदी कोणी आणि कशासाठी केल्या? संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यात संगनमत होते का?

या प्रकारामुळे शहरात तीव्र संतापाची लाट उसळली असून, संबंधित कंत्राटदारावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, त्याला काळ्या यादीत टाकावे, तसेच अदा केलेली रक्कम शासनाकडे तात्काळ वसूल करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. दरम्यान, या वाचनालय बांधकाम प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी तातडीने करण्यात आली नाही, तर युवा सेना शहर प्रमुख लकी महाराज चौबे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.या गंभीर आरोपांवर प्रशासन कोणती ठोस भूमिका घेते, दोषींवर कारवाई होते की नाही, याकडे आता संपूर्ण अचलपूर शहराचे लक्ष लागले आहे.

### इलेक्ट्रिक वाहनाचा शॉक लागल्याने

पडली होती. शरीर काळे पडले होते. पण उपचार व्हावे म्हणून तिला साहू हॉस्पिटलमध्ये प्रथम दाखल करण्यात आले. त्यांनी सावंगी रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला. पण वाटेतच तिची प्राणज्योत मावळली.सायंकाळी ६ वाजता ती मृत झाल्याचे सावंगी रुग्णालयाने घोषित केले. एका हसत्या-खेळत्या मुलीचा असा अचानक अंत झाल्याने तिचे कुटुंब, नातेवाईक आणि शाळेतील मित्र-मैत्रिणींना मोठा धक्का बसला आहे. परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. विजेच्या उपकरणांचा वापर करताना किती काळजी घेणे गरजेचे आहे, हे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. या घटनेमुळे रामटेके परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. संस्थाध्यक्ष डॉ. राजेश भोयर हे म्हणतात की आमच्या शिक्षण संस्थेत शिकणा-या मुलीची घडलेली ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे.

### तुळजापूर गडी येथे २१

कामावर गेले असता हा प्रकार उघडकीस आला.या घटनेची माहिती मिळताच चांदूरबाजार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे. ठाणेदार उल्हास राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय योगिता ठाकरे, दिनेश राठोड आणि जितेश सावरकर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात चोरी झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

### नगरसेविका कांबळे यांच्या पात्रतेवर

यांनी विभागीय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीवर आता विभागीय आयुक्तांसमोर सुनावणी होणार आहे. सुनावणीसाठी मीरा कांबळे यांना नोटीसही जारी करण्यात आली आहे. माहितीनुसार ६ एप्रिल रोजी महानगरपालिकेमध्ये नवनिर्वाचित नगरसेवकांसाठी बैठक बोलविण्यात आली होती. या बैठकीमध्ये महापौर-उपमहापौर यांची निवड करण्यात आली होती. या बैठकीत मीरा कांबळे यांनी महायुती उमेदवारांना पाठिंबा देत आपले मत दिले होते. त्यांनी महापौर श्रीचंद तेजवानी आणि उपमहापौर सचिन भेंडे यांच्या पक्षात मत देत आपला हात वरती केला होता. या निवडणुकीत एमआयएमचे इतर ११ नगरसेवक तटस्थ राहिले. महायुतीला पाठिंबा दिल्यामुळे एमआयएमच्या वतीने मीरा कांबळे यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती.पक्षाचा व्हिप धाब्यावर बसवून थेट भाजपा महापौर उमेदवाराला मतदान केले. या अनपेक्षित धक्क्यामुळे एमआयएम गटनेत्यासह राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. त्यामुळे पक्षाने कांबळे यांची हकालपट्टी करण्याचा निर्णय घेतला. अमरावती महापालिकेत एमआयएमचे एकूण १२ नगरसेवक निवडून आले. महापौर-उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी पक्षाने आपल्या सर्व नगरसेवकांना पक्षाच्या भूमिकेनुसार मतदान न करण्याचा व्हीप जारी केला होता. मात्र प्रत्यक्ष मतदानाचे वेळी मीरा कांबळे यांनी व्हीप झुगारून भाजपाच्या बाजूने कौल दिला. मीरा कांबळे यांनी पक्षाच्या निर्णयाविरुद्ध जाऊन भाजपाला मतदान केले. यामुळे त्यांना पक्षातून निष्कासित करण्यात आले होते. तसेच पार्टीने त्यांच्या विरोधात विभागीय आयुक्तांकडे तक्रारही केली होती. त्यानुसार आता त्यांच्या अपात्रतेवर सुनावणी होत आहे.

### बालनाट्य स्पर्धेच्या अंतिम

आमदार प्रविण तायडे, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रतापदादा अडसड, महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलासराव इंगोले आदी मान्यवरांनी संपूर्ण महाराष्ट्रातुन आलेल्या स्पर्धकांचे स्वागत फलक लाऊन आणि शुभेच्छा देऊन केलेले होते.

स्पर्धा समन्वयक विशाल फाटे, सहसमन्वयक हर्षद ससाणे, नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई चे नियामक मंडळ सदस्य प्रशांत देशपांडे, महापौर श्रीचंद तेजवानी, सभागृह नेता चेतन गावंडे तसेच संपूर्ण महाराष्ट्रभरातून आलेले परीक्षक गोविंद गोडबोले, संजय पाटील, श्याम शिंदे, सुरेश गांगुर्डे आणि जुई बर्वे आदी मान्यवर या उद्घाटन प्रसंगी मंचावर उपस्थित होते.

अमरावती नाट्य परिषदेचे सक्रीय सभासद व पदाधिकारी प्रशांत देशपांडे, प्रा. डॉ. संजय तिरथकर आणि डॉ. मधुरा कहाळे यांचा नुकताच महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून प्रवेश झाल्याबद्दल अतिथींनी त्यांचे स्वागत केले आणि सभागृह नेता चेतन गावंडे यांनी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद अमरावतीचे याच कार्यक्रमात जाहीर आजीवन सदस्यत्व स्वीकारले. नटराज्याची सुंदर मिरवणूक संजना शिरभाते आणि रोहिणी डोरले यांच्या बाल गोपाल चमूने रंगमंचापर्यंत आणली व अतिथींचे रंगमंचावर आगमन झाले. महाराष्ट्र गीत, शिवतांडव व नटराज पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाल्यानंतर महापौर श्रीचंद तेजवानी यांनी उद्घाटनाची घोषणा केली. उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक अॅड. प्रशांत देशपांडे यांनी केले आणि अध्यक्षीय मनोगत सभागृह नेता चेतन गावंडे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन व अमरावती शहरामध्ये दाखल झालेल्या महाराष्ट्रातील स्पर्धकांचे स्वागत अमरावती नाट्य परिषदेचे अध्यक्ष अॅड. चंद्रशेखर डोरले यांनी केले.

सकाळी ११ वाजल्यापासून अहिल्या नगर संघाचे मुंग्यांची दुनिया, अमरावती संघाचे आदिबांच्या बेटावर, नंदुरबार संघाचे स्वराची कहाणी, अभिज्ञान अकादमीचे दिव्याखाली दौलत, कोल्हापूर संघाचे ठोंब्या आणि आकार सोशल फाउंडेशनचे होत्या काही चिमण्या हे ६ बालनाट्य प्रेक्षकांच्या लक्षणीय उपस्थितीत आज सादर करण्यात आले.

शुक्रवार दि. २७/०२/२०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून कोल्हापूर, परभणी, सांगली, अचलपूर इत्यादी संघाचे ६ बालनाट्य सादर केले जाणार आहेत. ही संपूर्ण स्पर्धा महाराष्ट्र शासनाचे वतीने रसिक प्रेक्षकांकरिता निशुल्क ठेवण्यात आलेली आहे.

अमरावतीकर कला रसिकांनी या स्पर्धेचा आनंद घ्यावा आणि बाल कलावंतांना प्रोत्साहित करण्याकरिता संपूर्ण स्पर्धेदरम्यान उपस्थित राहावे असे आवाहन नाट्य परिषदेचे स्पर्धा समन्वयक विशाल फाटे, सहसमन्वयक हर्षद ससाणे आणि अमरावती नाट्य परिषदेचे अध्यक्ष अॅड. चंद्रशेखर डोरले यांनी केले आहे.

### प्रत्येक खरेदीवर उपहार

राबविण्यात आली होती. या योजनेला शहरासह इतर शहरांतील ग्राहकांकडूनही मोठा आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता.

या योजनेतून १० आकर्षक उपहार जिंकण्यासह दररोज आणि दरमहा विविध उपहार जिंकण्याची संधी ग्राहकांना देण्यात आली होती. विशेष म्हणजे, दररोज आणि दरमहा उपहार जिंकलेल्या ग्राहकांनाही बंपर लकी ड्रॉमध्ये सहभागी करण्यात आले होते. त्यामुळे त्यांना एक नाही तर तीन वेळा उपहार जिंकण्याची संधी मिळाली. या योजनेला लाखोंच्या संख्येने प्रतिसाद मिळाल्यानंतर, ग्राहकांसाठी काहीतरी नवीन देण्याच्या उद्देशाने हबलानी कुटुंबाने 'हर खरेदीवर उपहार पक्का' ही नवी योजना सुरू केली आहे. या योजनेची सुरुवात २१ फेब्रुवारीपासून करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत ग्राहकांना बिझीलँड येथे असलेल्या एल-२ शोरूममध्ये तसेच जवाहर रोडवरील प्रतिष्ठानमध्ये किमान ५,००० रुपयांची खरेदी करावी लागेल. त्यानंतर त्यांना आकर्षक उपहार दिले जातील. ग्राहक जितकी जास्त खरेदी करतील, तितके अधिक उपहार त्यांना मिळणार आहेत.

आराधना होलसेल शॉपिंग मॉलमध्ये बनारसी शालू, डिझायनर साड्या, घागरा-ओढणी, सलवार सूट, ड्रेस मटेरियल, रेडीमेड कोट, शर्टिंग-सुटिंग, टीनएज वेअर, किड्स वेअर यांसह फॅशन अॅक्सेसरीज, ज्वेलरी, शूज व सँडल, तसेच होम डेकोर आणि मॅचिंग साहित्य एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आले आहे. या उपहार योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन आराधना होलसेल शॉपिंग मॉलच्या हबलानी कुटुंबाने शहरवासीयांना केले आहे.

### इर्विन, डफरीन व सुपर हॉस्पिटलमधील

उचलण्यात येणार आहे. सदर प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित होण्याकरिता शासनाने ३५ कोटी रुपये मंजूर करण्यासाठी नियोजन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्याला मंजुरी देऊन मार्च २०२६ च्या बजेट मध्ये निधी देण्याची मागणी आ. सुलभा खोडके यांनी अधिवेशनात केली आहे. तसेच राज्यात टाटा समूहामार्फत 'सीआयआयआयटी' केंद्र उभारणीमध्ये स्व. अजितदादा पवार यांचे महत्वाचे योगदान आहे, त्यांच्या पुढाकाराने विदर्भात दोन ठिकाणी सीआयआयआयटी केंद्र मंजूर करण्यात आले, म्हणून अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात उभारण्यात येणाऱ्या सीआयआयआयटी केंद्राला स्व.अजितदादा पवार यांचे नाव देण्याची मागणी सुद्धा आमदार खोडके यांनी केली आहे.

त्याचबरोबर नियोजन संदर्भात पुरवणी मागणीवर शासनाचे ध्यान आकर्षित करतांना खोडके यांनी सांगितले कि, अमरावती जिल्हा वार्षिक नियोजनसाठी १ हजार कोटींचा आराखडा मंजूर करण्याची मागणी आमदार महोदयांच्या वतीने अधिवेशनातून करण्यात आली. गेल्या वर्षीच्या जिल्हा नियोजनात ५२७ कोटींचे नियोजन करण्यात आले. मात्र अमरावती जिल्ह्याची वाढती लोकसंख्या लक्षात घेता तसेच भौगोलिक परिस्थितीनुसार जिल्ह्यात विकास कामांचे नियोजन वाढविण्याची गरज आहे. जिल्ह्याच्या आदिवासी क्षेत्रात चांगल्या सुविधा निर्माण करण्यासाठी व अनुसूचित क्षेत्रातील विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी यासह सर्वसाधारण क्षेत्रात पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी अमरावती जिल्हा नियोजन समितीचा आराखडा १ हजार कोटींचा निधी मंजूर करण्याची मागणी करीत आमदार महोदयांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

आरोग्य विषयावर बोलत असतांना आमदार महोदयांनी सभागृहात स्पष्ट केले कि, अमरावती जिल्ह्याच्या आरोग्य सेवांचा विस्तार व आरोग्य सुविधांच्या बळकटीसाठी शासनाच्या भरीव निधीची आवश्यकता आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन )मध्ये सद्याची अस्तित्वातील इमारत जुनी व जीर्ण झाली आहे. तसेच जुने रुग्णालय ३७९ बेड चे आहे व वाढती रुग्णसंख्या पाहता एका बेडवर तीन रुग्ण अशी परिस्थिती आहे. म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालय हे ७०० खाटांची नवीन इमारत बांधण्यासाठी सुद्धा शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. यावर्षीच्या बजेट मध्ये जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या ७०० खाटांच्या नूतन इमारतीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार सुलभा खोडके यांनी केली. त्याचबरोबर अमरावती येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातून रुग्ण उपचारासाठी येत असतात. सुपर हॉस्पिटल मध्ये किडनी विभाग , मेंदूरोग , हृदयरोग युनिट सुरु आहे. या ठिकाणी किमोथेरपी सह कँसर रुग्णांसाठी १०० खाटांचे हॉस्पिटल उभारण्याची गरज आहे. तसेच गॅस्ट्रोलॉजी व इम्प्लांट सर्जरी युनिट सुरु करायचे आहे. यासाठी सुपर हॉस्पिटलमध्ये टप्पा -तीन सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्याला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली. सुपर हॉस्पिटल मधील टप्पा -१ व टप्पा -२ मध्ये मनुष्यबळाचा अभाव लक्षात घेता येथील डॉक्टरांना रुग्णसंख्येचा डोलारा सांभाळत असतांना प्रचंड कसरत करावी लागते. म्हणून सुपर हॉस्पिटलमध्ये डॉक्टर व आरोग्य सेवकांची पदे मंजूर करण्याची मागणी सुद्धा करण्यात आली.

त्याचबरोबर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अमरावती हे सद्या डफरीन परिसरात सुरु आहेत . याठिकाणी २०० खाटांचे हॉस्पिटल असून तपासणी , उपचार व शल्यक्रिया सारखी सुविधा दिली जात आहे. अमरावती वैद्यकीय महाविद्यालय चालविण्यास शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने मागितले आहे. परंतु या परिसरातील सर्व आरोग्य सेवा , सुपर हॉस्पिटल , डफरीन हॉस्पिटल हे सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत चालविण्यात येत असल्याने अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे वैद्यकीय शिक्षण विभागाकडे न देता सार्वजनिक आरोग्य विभागाकडे देण्याची सूचना आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली.

तसेच अन्न पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग संदर्भात बोलत असतांना आमदार सुलभा खोडके यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मधील शिव भोजन केंद्र चे जून २०२५ पासून शासनाकडे थकीत असलेले जवळपास २५ कोटींचे देयके अदा करण्यासंदर्भात बजेटमध्ये प्रावधान देण्याची मागणी केली.

### अमरावतीत ३१ सराईत गुंड्यांची

मोक्का किंवा तडीपारीसारख्या कठोर कायदेशीर कारवाईचे प्रस्ताव तयार करण्यात येत आहेत. आगामी होळी, रमजान, शिवजयंती, गुढी पाडवा, रामनवमी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आदी उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस सतर्क झाले आहेत. संबंधित आरोपी सध्या कुठे आहेत, ते जामिनावर बाहेर आहेत का, त्यांची टोळी सक्रिय आहे का, याचीही सविस्तर माहिती गोळा करण्यात येत आहे. पोलीस आयुक्तांनी ही जबाबदारी गुन्हे शाखा यांच्याकडे सोपविली असून, लवकरच मोठी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यापूर्वी कुख्यात गुंड्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली असून, पुढील काही दिवसांत आणखी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार आहेत. शहरात शांतता राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असल्याचे अधिकृत सूत्रांनी सांगितले.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती**
**(e-mail-amravati.ee@mahapwd.gov.in)**
**निविदा सुचना क्र.२९ सन २०२५-२६ (जा.क्र.१९५६/निलि/दि.२४.०२.२०२६)**
**निविदा सूचना (ई-निविदा प्रणालीव्दारे)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत /अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता **"ब-२ (Item rate)"** नमुन्यातील निविदा ई-प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहे.निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **http://mahatenders.gov.in** येथुन डाउनलोड करण्यात यावी, तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत किंमत (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | मोर्शी, जि.अमरावती येथे मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे बांधकाम करणे. (विद्युतीकरणासह) | १०६२१.७६ |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :- निविदा वेळापत्रका प्रमाणे**
**ई-निविदा उघडणे दिनांक :- निविदा वेळापत्रका प्रमाणे**

**Note**
1. Please note the further changes regardings this work will not be published through corrigendum by press notice. The changes will be available on electronic tendering system of Government of Maharashtra which is available on the portal http://mahatenders.gov.in
2. **The Bidder shall submit the Hard copy within 72 Hrs. during office hours.**
3. **कंत्राटदारांनी ई-निविदा ऑनलाईनदारे भरतांना E.M.D. ही ज्या नावाने जसे (वैयक्तीक संस्था/भागीदारी संस्था/कंपनी) निविदा भरली आहे त्याच्याच बॅक खात्यातून सादर करणे आवश्यक आहे. इतरत्र E.M.D. भरल्यास ई-निविदा उघडण्यात येणार नाही याची कृपया दक्षता घेण्यात यावी.**

स्वाक्षरी/-
(प्रतिक गिरी)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अमरावती

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अकोट पोलिसांसाठी 'राजू बन गया जेंटलमेन' ?

## वरली-मटका, जुगार आणि नकली नोटांच्या साखळीत 'कलेक्शन एजंट'ची चर्चा

**समीर ठाकूर**

***अकोट :*** *शहरात वरली, मटका, टेबल जुगार आणि इतर अवैध धंद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून या साखळीच्या केंद्रस्थानी 'राजू' नावाचा कलेक्शन एजंट असल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. एकेकाळी गुन्हेगारी जगताशी संबंध असल्याचा संशय असलेला हा व्यक्ती सध्या पोलिस प्रशासनासाठी जणू काही 'जेंटलमेन' बनल्याचे बोलले जात आहे.*

गेल्या काही महिन्यांत अकोट शहर व ग्रामीण भागात अवैध धंद्यांचे जाळे वाढल्याचे चित्र आहे. वरली, मटका आणि टेबल जुगाराचे अड्डे उघडपणे सुरू असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. या अवैध व्यवहारांमुळे गुन्हेगारीलाही खतपाणी मिळत असून काही महिन्यांपूर्वी एका पत्रकारावर झालेल्या हल्ल्याची घटना अद्यापही शहराच्या स्मरणात ताजी आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### नकली नोटांचा धोकादायक शिरकाव?

अलीकडे शहरात पुन्हा नकली नोटांचा मुद्दा चर्चेत आला आहे. बाजारपेठेत काही संशयास्पद व्यवहार झाल्याची माहिती पुढे येत असून या मागे जुगार अड्ड्यांचा वापर 'सर्क्युलेशन पॉइंट' म्हणून केला जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. वरली-टेबल जुगाराच्या माध्यमातून नकली नोटा सहज व्यवहारात आणता येतात, असा दावा जाणकारांकडून केला जात आहे.

काही वर्षांपूर्वी अकोटात नकली नोटांबाबत कारवाई झाली होती. त्या प्रकरणातील सहभागी कोण होते, याची चौकशी केल्यास काही 'व्हाईट कॉलर' नावे पुढे येऊ शकतात, अशीही चर्चा आहे. मात्र सध्या उघडकीस आलेल्या प्रकरणात तपास यंत्रणेने केवळ व्हिडिओपुरतीच कारवाई मर्यादित ठेवल्याची कुजबुज सुरू आहे.

### 'कलेक्शन एजंट'ची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात

शहरातील अवैध धंद्यांतून आठवड्याला लाखोंची उलाढाल होत असल्याचे सांगितले जाते. या पैशाचे 'कलेक्शन' करण्यासाठी काही एजंट काम करत असून त्यात 'राजू' नावाचा व्यक्ती प्रमुख असल्याची चर्चा आहे. एकेकाळी अनेक प्रकरणात संशयित ठरलेला हा व्यक्ती सध्या विविध अड्ड्यांशी संपर्क ठेवून व्यवहार सुरळीत चालू ठेवतो, असा आरोप आहे. स्थानिक पातळीवर प्रश्न उपस्थित केला जात आहे की, एवढ्या मोठ्या प्रमाणात अवैध व्यवहार सुरू असताना पोलिसांची कारवाई नेमकी कुठे अडते? काहींच्या मते, कारवाईची दिशा ठराविक व्यक्तींपर्यंत पोहोचत नाही, तर छोट्या पातळीवरील कारवाया करून प्रकरण थंड केले जाते.

### प्रशासनाची कसोटी

अकोट शहर पोलिसांसाठी ही परिस्थिती मोठी कसोटी मानली जात आहे. अवैध जुगार, मटका, वरली आणि नकली नोटांचा संभाव्य शिरकाव यामुळे शहराच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

परिणामी गेल्या काही महिन्यांपासून शहरातील नागरिक या अवैध धंदेवाईकांच्या दहशतीखाली भितीपोटी आपले जिवन जगत असून या गुन्हेगारी साखळीचा उलगडा झाला नाही, तर गुन्हे अधिक बळावण्याची भीती व्यक्त केली जात आहे. एकंदरीतच अवैध धंद्यांच्या या साखळीमागील खरे सूत्रधार कोण? नकली नोटांचा मार्ग कोणाच्या संरक्षणाखाली मोकळा आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे देत ठोस आणि पारदर्शक कारवाई करणे, हीच आता पोलिस प्रशासनासमोरील खरी परीक्षा ठरणार आहे.

# खिर्डा येथे विजेच्या धक्क्याने तरुणाचा दुर्दैवी मृत्यू




■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शेतातील गहू पिकाला पाणी देत असताना अचानक लागलेल्या विजेच्या धक्क्याने सुशिक्षित युवा शेतकरी मारुती अभिमान कालापाड वय ३२ या विवाहित युवकाचा जागीच मृत्यू झाला.

सदर घटना दि.२४ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजताच्या दरम्यान खिर्डा शेतशिवारात घडली. प्राप्त माहितीनुसार मारुती अभिमान कालापाड हा युवक सुशिक्षित असून त्याने एलएलबी पदवी प्राप्त करीत नुकत्याच पोलीस भरतीमध्ये सुद्धा सहभाग घेतला होता. मारुती कालापाड त्याला फक्त सहा महिन्याची मुलगी आहे. एक भाऊ भारतीय सैन्य दलात आहेत. खिर्डा गावात त्यांच्याकडे स्वत:ची फक्त दोन एकर शेती असून गव्हाला पाणी देत असताना मारुती कालापाड याला विजेचा धक्का लागल्याने मृत्यू झाला आहे. मारुती कालापाडला सहा महिन्याची चिमुकली असून पित्याच्या अकाली मृत्युने चिमुकलीचे छायाछत्र हरविले आहे. सदर घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# आलेगाव सबस्टेशनवर शेतकऱ्यांची धडक

## नवीन रोहित्र बसवून वीजपुरवठा सुरळीत



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पांढुर्णा व पिंपळडोळी शेतशिवार परिसरातील शेतकऱ्यांना कमी विद्युत दाबामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. कृषी पंप सुरू न होणे, वारंवार रोहित्र जळणे आणि पिकांना पाणी देण्यात अडथळे निर्माण होणे, या समस्यांनी शेतकरी हैराण झाले होते. अखेर संतप्त शेतकऱ्यांनी आलेगाव येथील वीज उपकेंद्रावर धडक देत प्रश्न मार्गी लावला.

परिसरातील शेतकऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांच्याशी संपर्क साधत अडचणी मांडल्या. कापकर यांनी तत्काळ पुढाकार घेत शेतकरी बांधवांसह आलेगाव सबस्टेशन गाठले. संबंधित अधिकाऱ्यांना परिस्थितीची जाणीव करून देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

उपअभियंत्यासह वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतशिवाराला भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर नवीन रोहित्र बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. काही तासांतच नवीन रोहित्र बसवून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांचा दिलासा झाला असून, पिकांना पाणी देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

'शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्यांच्या प्रश्नांसाठी पदाची नव्हे, तर इच्छाशक्तीची गरज असते,' असे प्रतिपादन कापकर यांनी यावेळी केले. शेतकऱ्यांनी त्यांच्या तत्परतेबद्दल समाधान व्यक्त करत आभार मानले. परिसरात या कार्याची चर्चा सुरू असून, प्रशासनाने भविष्यात अशा समस्या टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# रिसोड कृ.उ. बा. समितीकडून चिया खरेदीस प्रारंभ



■ प्रतिनिधी | रिसोड ■

दि. २५ फेब्रुवारी रोजी रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीकडून चीया खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. नाविन्यपूर्ण आणि पर्यायी पीक म्हणून रिसोड आणि परिसरातील शेतकरी चिया पिकाकडे वळलेले आहेत. चिया पीक उत्पादन घेत असताना शेतकऱ्यांना अडचण जाऊ नये म्हणून रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मोठ्या प्रमाणावर आणि अल्प दरात शेतकऱ्यांना चिया बियाणे उपलब्ध करून देण्यात आले होते.

वाशिम जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त चियाचा पेरा रिसोड तालुक्यात बाजार समितीच्या पुढाकारामुळे झाला आहे.

विक्री व्यवस्था व्हावी व शेतकऱ्यांना कुठलीही अडचण जाऊ नये म्हणून गेल्या वर्षी पासून चीयाची खरेदी आणि विक्री रिसोड कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती विष्णुपंत भुतेकर यांच्या नेतृत्वात सुरू करण्यात आली आहे. यावर्षी रिसोड तालुक्यात चियाचे बंपर उत्पादन अपेक्षित आहे. दिनांक २५ फेब्रुवारी रोज बुधवार ला चिया विक्रीचे नियोजन रिसोड बाजार समितीकडून करण्यात आले होते.

# आदिवासी महिलांसाठी परसबागेतील कुक्कुटपालन प्रशिक्षण

## पोषणसुरक्षा व स्वयंरोजगाराला चालना

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि. २५ फेब्रुवारी रोजी मौजे मुसळवाडी, ता. मालेगाव येथे आदिवासी महिला व बचत गटांच्या सदस्यांसाठी 'परसबागेतील कुक्कुटपालन' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्र वाशिम चे प्रमुख डॉ. आर. एल. काळे तसेच पशुविज्ञान तज्ञ मयूर देशमुख उपस्थित होते.

डॉ. काळे यांनी ग्रामीण व आदिवासी भागातील पोषणसुरक्षा, अन्नसुरक्षा व आर्थिक सबलीकरणाच्या दृष्टीने परसबागेतील कुक्कुटपालनाचे महत्त्व स्पष्ट केले. कमी भांडवली गुंतवणूक, अल्प जागा व स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर यामुळे हा व्यवसाय महिलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. अंडी उत्पादनातून कुटुंबांना प्रथिनयुक्त



सकस आहार उपलब्ध होण्याबरोबरच नियमित उत्पन्नाचे साधन निर्माण होते. सध्या परिसरात 'बिबे फोडणे' या पूरक व्यवसायातून महिलांना प्रतिदिन सुमारे रु. ३०० पर्यंत उत्पन्न मिळत असले, तरी परसबागेतील कुक्कुटपालन व्यवसाय स्वीकारल्यास अधिक स्थिर व वाढीव उत्पन्नाची संधी उपलब्ध होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले. पशुविज्ञान तज्ञ मयूर देशमुख यांनी कुक्कुटपालनासाठी योग्य जातींची निवड, वैज्ञानिक पद्धतीने लसीकरण व आरोग्य व्यवस्थापन, संतुलित आहार नियोजन, निवाऱ्याची रचना, जैवसुरक्षा उपाययोजना तसेच अंडी व मांस विक्रीसाठी बाजारपेठ व्यवस्थापन या विषयांवर सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले. यावेळी बचत गटातील महिलांसह ज्ञानेश्वर भोकरे, महादेव झाटे, सुरज कदम व गजानन पांडे हे ग्रामीण युवक उपस्थित होते.

# प्रयोगसिद्ध लोककलांचे शाहिरी प्रशिक्षण शिबिराचा भव्य समारोप

## रंग शाहिरीचा कार्यक्रमाने रंगली सांस्कृतिक मेजवानी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई यांच्या वतीने आयोजित प्रयोगसिद्ध लोककलांचे शाहिरी प्रशिक्षण शिबिराचा समारोप सोहळा २५ फेब्रुवारी रोजी सांस्कृतिक वातावरणात पार पडला. याप्रसंगी रंग शाहिरीचा या विशेष कार्यक्रमाने संपूर्ण सभागृहात कलात्मक ऊर्जा,जोश आणि लोकसंस्कृतीचा अभिमान अनुभवायला मिळाला.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे जनसंपर्क अधिकारी राम श्रृंगारे यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून परिवर्तन कला महासंघाचे जिल्हाध्यक्ष शेषराव मेश्राम,रजत बागडे, रामेश्वर नव्हाळे,सदानंद इंगोले



(ब्राम्हणगाव) यांची प्रमुख उपस्थिती होती.सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन,दीपप्रज्वलन व पुष्पार्पण करून कार्यक्रम सुरु करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय भाषणात राम श्रृंगारे यांनी शाहीर संतोष खडसे यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हणाले की,लोककला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून ती समाजप्रबोधनाची प्रभावी ताकद आहे.शाहीर खडसे हे लोककलेच्या माध्यमातून सामाजिक जाणीवा जागृत करत आहेत.ग्रामीण भागातील युवकांमध्ये सांस्कृतिक चैतन्य निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते करत आहेत. अशा प्रशिक्षण शिबिरांमुळे नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळतो आणि त्यांच्यात आत्मविश्वास वाढतो असे नमूद केले. रंग शाहिरीचा या सादरीकरणात प्रशिक्षणार्थींनी शाहिरी, पोवाडे, लोकगीते,सामाजिक संदेशपर रचना सादर करून उपस्थितांची मने जिंकली.विकास इंगळे, आदित्य मोरे,स्वप्नील इंगळे (गोहोगाव), रविंद्र विरघट,स्वराज दामोदर, सुमेध गवई,गौरव गवई (तेल्हारा), पार्थ देशमुख,केदार म्हस्के(हिवरा आश्रम), साहील खराडे (रिसोड),ओम वांजोळ (बोरगाव काकडे),हर्षल सोनोने (कारंजा लाड), अवधूत मुंजे(पुणे),नारायण पायघण, रुद्र मुळे (सेनगाव), या सर्वांनी दमदार आणि आशयघन सादरीकरण करून रंग शाहिरीचा कार्यक्रम खऱ्या अर्थाने रंगवला.

# 'विकसित भारत' जिल्हास्तरीय युवा संसद कार्यक्रमात युवक युवतीनी सहभागी व्हावे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार अंतर्गत २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथे 'विकसित भारत' जिल्हास्तरीय युवा संसद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या युवा संसदेत जिल्ह्यातील १८ ते २५ वयोगटातील नोंदणीकृत युवक-युवती सहभाग घेऊ शकतात. यावर्षी चर्चेचा विषय 'आणीबाणीच्या ५० वर्षे : भारतीय लोकशाहीसाठीचे धडे' हा असून स्पर्धकांना मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत आपले विचार मांडण्याची संधी मिळणार आहे.



जिल्हास्तरावर निवडण्यात आलेले १० उत्कृष्ट स्पर्धक राज्यस्तरीय फेरीसाठी पात्र ठरतील. राज्यस्तरीय विजेत्यांना मुंबई येथे आयोजित अंतिम फेरीत सहभागाची संधी मिळेल, तसेच अंतिम विजेते स्पर्धकांना दिल्ली येथे संसद भवनात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. युवा संसद ही संसदीय कार्य मंत्रालयाद्वारे राबवली जाणारी महत्त्वपूर्ण योजना असून, तरुणांना लोकशाही प्रक्रिया, संसदीय शिस्त आणि प्रभावी वादविवाद कौशल्य आत्मसात करण्यासाठी उपयुक्त व्यासपीठ आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि राष्ट्रनिर्मितीची भावना बळकट होण्यास मदत होणार आहे.

# संत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील विद्याभारती शाळेत संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नितेश मिटकरी तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे संचालक सुमित सुरेशराव मिटकरी तसेच पर्यवेक्षक विजय गोटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून संत गाडगेबाबा यांच्या समाजप्रबोधनात्मक कार्याविषयी माहिती देत स्वच्छता व्यसनमुक्ती आणि समाजसेवेचे महत्त्व पटवून दिले. संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्यावर विद्यार्थ्यांनी गीते व नाटिका देखील सादर केल्या.


**जाहीरनामा**

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार मोहन जानु राठोड रा. पांढुरना यांनी संदर्भीय अर्ज या कार्यालयात सादर केला असून त्यांनी त्यांचे अर्जामध्ये नमुद केले आहे की, माझी पत्नीचे मौजे इलखी येथे गट नं ८९ मध्ये जमिन असून त्यामध्ये त्यांचे नांव चुकीने शकुंतला मोहन राठोड असे झालेले आहे परंतु त्यांचे नांव हे लिलाबाई मोहन राठोड असे आहे. त्याबाबत मुळ कागदपत्रे व राजपत्र सुध्दा सादर केले आहे. तेव्हा सदर राजपत्राप्रमाणे ऑन लाईन ७/१२ मध्ये दुरूस्ती करण्याबाबत अर्ज या कार्यालयात सादर केला आहे.

तेव्हा अर्जदार यांचे अर्जानुसार मौजे इलखी येथील गट नं. ८९ येथील त्यांचे ताब्यातील व वहीतीमधील ७/१२ वर शकुंतला मोहन राठोड झाले असून त्याऐवजी लिलाबाई मोहन राठोड अशी दुरूस्ती करण्यास हरकत व आक्षेप असल्यास सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसाचे आत त्यांनी लेखी या कार्यालयात कळवावे. मुदतीनंतर प्राप्त आक्षेप/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ३०/१२/२०२५
ठिकाण :- वाशिम.

- स्वा -
(निलेश पळसकर)
तहसिलदार वाशिम


# शिवचरित्राची झलक भारतीय राज्यघटनेत

## डॉ. अशोक बांगर यांचे प्रतिपादन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

भारतीय राज्यघटनेत समता, सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता यांसारखी मूलभूत मूल्ये प्रतिबिंबित झाली असून हीच मूल्ये छत्रपती शिवरायांच्या चरित्रातून प्रेरित झालेली आहेत, असे मत व्याख्याते डॉ. अशोक बांगर यांनी व्यक्त केले. ते शिवव्याख्यानमालेच्या दुसऱ्या दिवशीमहाराष्ट्र बहुजन पत्रकार संघांचे वतीने आयोजित 'शिवरायांचे प्रेरणादायी चरित्र' या विषयावर बोलत होते.

यावेळी त्यांनी सांगितले की, घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राज्यघटना तयार करताना कोणती प्रेरणा होती, असा प्रश्न विचारण्यात आला असता त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्राचा प्रभाव असल्याचे सांगितल्याचा इतिहास आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबात आणि समाजात शिवचरित्रातील आदर्श आचरणात आणणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अस्थिरोग तज्ञ डॉ. पंकज काटोले होते. प्रमुख अतिथी म्हणून





वनपरिक्षेत्राधिकारी गिरीश जतकर, श्यामशेठ अग्रवाल, उर्मिलाताई ठाकूर, तेजस्विनी देववर्त डहाके, चंदाताई कोळकर, शालिनीताई ठाकरे, अघम काकू तसेच महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बंडूभाऊ इंगोले उपस्थित होते.

यावेळी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यात कृषी उत्पन्न बाजार समितीचे बांधकाम सभापती बाबुराव चौधरी, नगर परिषदेचे बांधकाम सभापती हुसेन बंदूकवाले, नियोजन सभापती नदीम राज, नगरपरिषद सदस्य इम्रान पारेख, पत्रकार ज्ञानेश्वर धुळे, आदर्श शिक्षिका ज्ञानदेवी मंदिर, आदर्श शेतकरी अजय मोटघरे, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष संजय काकडे, समाजसेविका वर्षाताई शाहू भगत, सर्प अभ्यासक प्रा. राजा गोरे,प्रा रमेश वरघट आशा सेविका वैशाली लोमटे, आदर्श शिक्षक विजय भड, आरोग्य सेवक रमेश देशमुख आदींचा समावेश होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत पापडे यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय विजय भड यांनी करून दिला. आभार प्रदर्शन रामदास मिसाळ यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा उपाध्यक्ष आरिफ पोपटे, डॉ रमेश चंदनशिव,श्रवण किन्हीकर, योगेश जयस्वाल, रामदास मिसाळ,प्रा दिनेश रघुवंशी कालुभाई तवंगर, उषाताई नाईक, मोनाली कुलकर्णी, पवन कदम विनोद गणवीर, बबलू शेख, विजय खंडार, दीपक इंगळे, गजानन टोम्पे, ज्ञानेश्वर वरघट, निलेश मुंदे,अब्दुल अजीज, मयूर राऊत, अब्दुल जुबेर, दामोदर जोंधळेकर, मंगेश बाबर, राजेंद्र शामसुंदर, गुणवंत राठोड, अमित पजवानी, महादेव जाधव, धनंजय राठोड, महेंद्र गुप्ता आदींनी परिश्रम घेतले.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ९२ ■ शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# रक्ताच्या अक्षरांनी उठला सिंदीचा हुंकार ग्रामीण रुग्णालयाचा प्रश्न विधानभवनात घुमला

**जयंत पाटील यांनी सभागृहात मांडला सिंदी रेल्वेच्या आरोग्याचा ज्वलंत विषय**

**देवेंद्र फडणवीस यांना रक्तपत्रांचा इशारा; २५ गावांचा आरोग्यप्रश्न ऐरणीवर**



**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** गेल्या वीस वर्षांपासून आरोग्याच्या मूलभूत सुविधांसाठी धडपडणाऱ्या सिंदी रेल्वेच्या जनतेचा आवाज अखेर विधानभवनाच्या भिंतीवर धडकला. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी सिंदी रेल्वे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्याचा प्रश्न थेट सभागृहात मांडत प्रशासनाला जाब विचारला.

या मागणीसाठी राष्ट्रवादीचे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी पुढाकार घेत निवेदन सादर केले होते. त्यांच्या सोबत अमोल सोनटक्के, आशिष देवतळे, सुनिल भोमले यांची उपस्थिती होती. या निवेदनाची दखल घेत पाटील यांनी प्रश्नाला विधानभवनात वाचा फोडली.

सिंदीकरांचा संताप आता उफाळून आला आहे. टाळ-मृदंगाच्या गजरात आंदोलने झाली, निवेदने दिली, आश्वासने ऐकली, पण प्रशासन हलले नाही. अखेर संतप्त नागरिकांनी स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाब विचारण्याचा निर्धार केला आहे. आमच्या जिवाशी खेळ थांबवा, ग्रामीण रुग्णालय द्या, असा थरकाप उडवणारा संदेश या रक्तपत्रांतून देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या आंदोलनात सर्व धर्म, सर्व समाज, सर्व पक्ष आणि सर्व वयोगटातील नागरिक एकदिलाने उतरले. परिसरातील २५ गावांचा आरोग्यप्रश्न या एका मागणीशी जोडलेला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचे तातडीने ग्रामीण रुग्णालयात रूपांतर व्हावे, हीच ठाम मागणी आहे.

सिंदी रेल्वे येथील खासदार अमर काळे आणि जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून आंदोलनात पाठिंबा दर्शविला आहे. नागरिकांनी १५०० हून अधिक रक्तपत्रे पाठविण्याची तयारी केली आहे.

# 'लादेन' नावाचा डाग पुसला; सिंदीत वनजमिनीने घेतला मोकळा श्वास

## -तीन दशकांची वस्ती ६ तासांत जमीनदोस्त; वन-पोलीस प्रशासनाची संयुक्त धडक कारवाई







**सिंदी रेल्वे । जनमाध्यम :** सिंदी शहराच्या छाताडावर तीन दशकांपासून बसलेला 'लादेन नगर'चा डाग अखेर गुरुवारी बुलडोझरखाली गाडला गेला. वनविभागाच्या ३.७१ हेक्टर मोक्याच्या जमिनीवर उभी ठाकलेली ८२ घरांची बेकायदा वसाहत अवघ्या सहा तासांत सपाट करण्यात आली. प्रशासनाचा फौजफाटा, शेकडो पोलीस, दहा बुलडोझर आणि कडक बंदोबस्त सगळे चित्र एखाद्या मोठ्या मोहिमेची साक्ष देणारे होते,

हिंगणी वनपरिक्षेत्रातील परसोडी येथील खासरा क्रमांक २६, २७, २८ मधील जमीन गेली ३० वर्षे अतिक्रमणाखाली होती. सकाळी आठला सुरू झालेली ही कारवाई दुपारी दोनपर्यंत पूर्ण झाली. १०० वनअधिकारी आणि तब्बल ४०० पोलिसांचा ताफा तैनात होता. ५ ॲम्बुलन्स, २ अग्निशामक वाहने, ट्रॅक्टर, शासकीय गाड्यांची रांग प्रशासनाने यावेळी कोणतीही ढिलाई ठेवली नाही.

**'लादेन' नावाची सावली**

जागतिक स्तरावर कुख्यात ठरलेला दहशतवादी Osama bin Laden याच्या नावाशी साधर्म्य साधणारी वेशभूषा व शरीरयष्टी यामुळे या वस्तीस स्थानिकांनी 'लादेन नगर' अशी उपाधी दिली. नावावरूनच वाद पेटत राहिले, पण कारवाई मात्र रखडत होती. अखेर गुरुवारी ती प्रतीक्षा संपली.

**२४ घरांना अभय ?**

वनजमिनीवरील ८२ घरे पाडली, मात्र सीमावादामुळे सिंदी मौजातील 'सरकार/झुडपी' नोंदीवरील २४ घरांवर हात पडला नाही. ही घरेही अतिक्रमणाच्या चौकटीत येतात का? की त्यांना कायमस्वरूपी अभय, प्रशासनाची पुढील चाल काय, याकडे सिंदीकरांचे डोळे लागले आहेत.

**मानवी वेदनांचे सावट**

कारवाई दरम्यान वृद्ध, महिला, चिमुकली मुले, गरोदर माता सर्वांचे संसार मातीमोल झाले. पोलिसांकडून चहा-नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. घरातील उरलेसुरले साहित्य ट्रॅक्टरमध्ये भरून हलवले गेले, काहींनी कबाडीत विकले. एका बाजूला कायद्याचा कठोर चेहरा, तर दुसरीकडे बेघर झालेल्यांची असहाय्यता सिंदीने दोन्ही दृश्ये एकाच दिवशी पाहिली.

### प्रशासनाचा चोख बंदोबस्त

उपविभागीय अधिकारी दीपक करंडे, तहसीलदार शंकुतला पाराजे, नायब तहसीलदार राजेंद्र मंथनवार, मंडल अधिकारी सचिन पिसुड्डे, साहाय्यक वनसंरक्षक माधव आडे आदी अधिकारी घटनास्थळी ठाण मांडून होते. पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनीही पाहणी केली.

तीन दशकांचा प्रश्न एका दिवसात संपला, असे प्रशासनाचे म्हणणे असले तरी उरलेल्या २४ घरांचा निर्णय आणि भविष्यात पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठीची ठोस भूमिका यावरच या कारवाईचे खरे मूल्यमापन ठरणार आहे. सिंदीत बुलडोझर फिरला आता प्रश्न आहे, ही मोहीम शेवटची ठरणार की अजूनही काही 'डाग' बाकी आहेत.

# वाघमारेंच्या शेतात बिबट्या

## सेलूत बिबट्याचा कहर, रेस्क्यू पथकावरच झडप : धाडसी झुंजीत दोघे जखमी

**सेलूजवळील घटनेत नऊ महिन्यांच्या मादी बिबट्याचा उपचारादरम्यान मृत्यू**

**वर्धा/सेलू जनमाध्यम**

सेलू शहरालगत जखमी अवस्थेत मुक्त संचार करणाऱ्या मादी बिबट्याला पकडण्यासाठी राबविण्यात आलेल्या रेस्क्यू मोहिमेदरम्यान बिबट्याने पथकावर हल्ला केल्याची घटना बुधवारी रात्री घडली. या हल्ल्यात कौस्तुभ गावंडे आणि शुभम बोबडे हे दोघे जखमी झाले. दरम्यान, जाळ टाकून बिबट्याला पकडण्यात यश आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

बुटीबोरी-तुळजापूर महामार्गालगत विद्याभारती कॉलेज परिसरातील शेतशिवारात बिबट्याचा वावर असल्याची माहिती वनविभागाला मिळाली होती. वाघमारे यांच्या मक्याच्या पिकात बिबट्या जखमी अवस्थेत लपून बसल्याचे आढळून आले. मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वनविभाग, सेलू पोलिस आणि पिपल फॉर ॲनिमल्स'च्या सहकार्याने रेस्क्यू मोहीम सुरू करण्यात आली.

रात्री सुमारे ८.३० वाजताच्या सुमारास बिबट्या शेतातून बाहेर येऊन गावाच्या दिशेने सरकू लागला. त्याला जाळ्यात अडकविण्याचा प्रयत्न सुरू असतानाच बिबट्याने शुभम बोबडे यांच्यावर झडप घातली. त्यांच्या हात व छातीवर चावा घेतल्याने ते जखमी झाले.



दरम्यान, पथकप्रमुख कौस्तुभ गावंडे यांनी बिबट्याचा मार्ग अडवित त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. या वेळी बिबट्याने त्यांच्यावरही हल्ला केला. सुमारे पंधरा मिनिटांच्या प्रयत्नानंतर इतर सदस्यांच्या मदतीने बिबट्याला जाळ्यात पकडण्यात यश आले. या झटापटीत गावंडे यांच्या मांडी व मनगटावर जखमा झाल्या.

दोन्ही जखमींना प्रथम सेलू येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी वर्धा येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. पकडलेल्या नऊ महिन्यांच्या मादी बिबट्याला पिपरी मेघे येथील करुणाश्रमात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र प्रकृती खालावत गेल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. गुरुवारी शवविच्छेदनानंतर मृतदेहाची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली. वनपरिक्षेत्र अधिकारी मीनल तुरखेडे यांनी सांगितले की, प्राथमिक निरीक्षणात मृत्यूचे कारण स्पष्ट झाले नसून शवविच्छेदन अहवालानंतर अधिक माहिती मिळेल. वनविभागाकडून पुढील कार्यवाही सुरू आहे.

बिबट्या गावात शिरण्याची शक्यता लक्षात घेता रेस्क्यू पथकाने वेळीच कारवाई केली. पथकप्रमुख कौस्तुभ गावंडे यांनी दाखविलेल्या धाडसामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याची चर्चा परिसरात आहे.

# १७.४० लाखांचा अपहार; नगर परिषदेतील कनिष्ठ लिपीकावर गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा नगर परिषद येथील आर्थिक व्यवहारात मोठी अनियमितता उघड झाली असून कनिष्ठ लिपीक आशिष गायकवाड (रा. पुलफैल) याच्यावर १७ लाख ४० हजार २१५ रुपयांच्या अपहाराचा आरोप ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी २५ रोजी वर्धा शहर पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आशिष गायकवाड हा ऑगस्ट २०१५ पासून नगर परिषदेत कनिष्ठ लिपीक म्हणून कार्यरत आहे. काही वर्षांपूर्वी त्याच्याकडे रोखपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. दरम्यान, लेखापरीक्षणाच्या प्रक्रियेत गेल्या दोन वर्षांपासून रोकडवही अद्ययावत नसल्याचे आढळून आले. त्यानंतर प्रशासनाने आर्थिक व्यवहारांची सखोल छाननी केली असता संबंधित कालावधीत मोठी तफावत समोर आली. २३ नोव्हेंबर २०२३ ते २८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत प्राप्त झालेली चलनरक्कम बँकेत जमा करणे बंधनकारक होते. मात्र, तपासणीत १७.४० लाख रुपयांची रक्कम जमा न झाल्याचे स्पष्ट झाले. याबाबत लेखी खुलासा करण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्याला तीन दिवसांची मुदत देण्यात आली होती. तथापि, त्याकडून समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही.

# विजेच्या झटक्याने कोवळं स्वप्न हरपलं, सातवीतील आरोहीचा दुर्दैवी अंत

**वर्धा जनमाध्यम :** अजून खेळण्याचं, हसण्याचं, मोठी स्वप्नं पाहण्याचं वयष्ठ आणि त्याच वयात नियतीने निर्दयी झटका देत एका कोवळ्या जीवाला हिरावून नेलं. शहरालगतच्या नालवाडी परिसरात बुधवारी दुपारी विजेचा धक्का लागून १३ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसर हळहळला आहे.



आरोही तथागत रामटेके (वय १३) असे मृत मुलीचे नाव आहे. ती शहरातील School of Brilliant येथे इयत्ता सातवीत शिक्षण घेत होती. अभ्यासू, मनमिळावू आणि स्वप्नाळू स्वभावाची आरोही बुधवारी (२५ फेब्रुवारी) दुपारी सुमारे २.३० ते ३ वाजताच्या सुमारास मैत्रिणीच्या घरी अभ्यासासाठी गेली होती. नालवाडीतील गजानन अपार्टमेंटमध्ये ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, बाथरूममध्ये इलेक्ट्रिक वाहन चार्ज करण्यासाठी स्विच बोर्डमध्ये प्लग लावलेला होता. त्या प्लगमधून वीज प्रवाहित होत असताना आरोहीचा स्विच बोर्डशी संपर्क आला आणि तिला जबर विजेचा धक्का बसला. क्षणार्धात ती कोसळली. घाबरलेल्या कुटुंबीयांनी तिला तातडीने रुग्णालयात दाखल केले. पुढील उपचारासाठी सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र सायंकाळी सहाच्या सुमारास डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेमुळे रामटेके कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरात शोककळा पसरली असून शाळकरी मित्र-मैत्रिणींसह शिक्षकवर्गाने हळहळ व्यक्त केली. विजेच्या उपकरणांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष किती घातक ठरू शकते, याची जाणीव या दुर्दैवी घटनेने पुन्हा करून दिली आहे.

# देवळीतून पळविलेली अल्पवयीन मुलगी वर्धा स्थानकावर सापडली; आरोपी जेरबंद

**वर्धा जनमाध्यम :** अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेणाऱ्या तरुणास पोलिसांनी शिताफीने अटक करत पीडित मुलीची सुखरूप सुटका केली. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईत ही यशस्वी मोहीम पार पडली.

समीर कैलास बावणे (वय २४, रा. देवळी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. १७ वर्षीय मुलीस अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची तक्रार १७ ऑक्टोबर २०२५ रोजी देवळी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल होताच पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपासाची सूत्रे हाती घेतली.



जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग केला. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा मागोवा घेतला. शिर्डीहून वर्धेकडे येत असताना वर्धा रेल्वे स्थानकावर सापळा रचून आरोपी व मुलीस ताब्यात घेण्यात आले. मुलीला वैद्यकीय तपासणीनंतर कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. आरोपीस अटक करून पुढील तपासासाठी देवळी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात सुभाष राऊत, दिवाकर परिमल, खुशालपंत राठोड, नितेश मेश्राम, अलका कुंभलवार, नवनाथ मुंडे, अक्षय राऊत व गोविंद मुंडे यांनी केली. अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस प्रशासन सजग असून अशा गुन्ह्यांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

# धामणगाव मार्गावर कार-बाईकचा भीषण अपघात

## -महिलेचा जागीच मृत्यू, ५ जण गंभीर जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** धामणगाव - देवगाव मार्गावर स्विफ्ट कार आणि दुचाकी यांच्यात समोरा समोर धडक झाल्याची घटना आज गुरुवार २६ फेब्रुवारीला सकाळी ११.१५ वाजता सुमारास समोर आली. यामध्ये एका महिलेचा मृत्यू झाला असून पाच जण जखमी आहे. त्यांच्यावर यवतमाळ आणि अमरावती येथे उपचार सुरू आहे. भावना प्रवीण कदम (कारंजा) असे मृत महिलेचे नाव आहे तर पार्थ देशमुख, योगेश देशमुख, सारिका देशमुख आणि इतर दोन (सर्व राहणार यवतमाळ) अशी जखमींची नावे आहे. माहितीनुसार भरधाव कार देवगावजवळ समोरून येणाऱ्या एका दुचाकीला धडकली. यामध्ये भावना कदम यांचा जागीच मृत्यू झाला तर पाच जण जखमी झाले.

# श्रीमती रुक्मिणी पांडुरंगजी मुडे यांचे निधन



**हिंगणघाट -**येथील यशवंतनगर, मास्टर कॉलनी निवासी श्रीमती रुक्मिणी पांडुरंगजी मुडे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्या ८३ वर्षाच्या होत्या. त्यांचे पश्चात ३ मुले, २ मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे. स्थानिक मोक्षधामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या जीबीएमएम मोहता कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य, तसेच वर्धा जिल्हा ग्राहक पंचायतचे अध्यक्ष स्व. पांडुरंगजी मुडे यांच्या धर्मपत्नी होत.

# मोरांगणा शिवारात बिबट्याचा कहर

## -गोठ्यात शिरून सहा जनावरे ठार; एक गंभीर जखमी - पशुपालकांचे दीड लाखांचे नुकसान

**खरांगणा (मो.) जनमाध्यम :** रात्रीच्या शांततेला चिरत आलेल्या बिबट्याच्या सावलीने मोरांगणा शिवार दहशतीने थरथरला. खरांगणा वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या या भागात बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास गोठ्यात बांधलेल्या जनावरांवर बिबट्याने हल्ला चढवून सहा जनावरे ठार केली, तर एक जनावर गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे.

मोरांगणा येथील पशुपालक विजय भड हे रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास हरभऱ्याच्या शेतात फेरफटका मारण्यासाठी गेले होते. त्याच वेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्या घराशेजारील गोठ्यात प्रवेश केला. गोठ्यात बांधलेल्या चार वासरांवर, एका गायीवर तसेच म्हशीच्या पाड्यावर त्याने अचानक झडप घातली. बिबट्याच्या हल्ल्यात सहा जनावरे जागीच ठार झाली, तर एक जनावर गंभीर जखमी अवस्थेत आढळून आले.

घटनेची माहिती पहाटे उघड होताच परिसरात खळबळ उडाली. बातमी वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी ग्रामस्थांची मोठी गर्दी झाली. रक्ताने माखलेला गोठा आणि मृत जनावरे पाहून नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले. रात्री बाहेर पडायलाही भीती वाटते, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पाहणी करून पंचनामा केला. परिसरात बिबट्याच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी पथके नियुक्त करण्यात आल्याची माहिती वनविभागाने दिली. आवश्यक असल्यास पिंजरा लावण्याचाही विचार केला जात आहे.

या घटनेमुळे पशुपालक विजय भड यांचे सुमारे दीड लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. जनावरे हेच आमचे संसाराचे आधार आहेत. शासकीय मदत तातडीने मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, वनविभागाकडून नुकसानभरपाईचा प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

गेल्या काही महिन्यांत परिसरात बिबट्याच्या हालचाली वाढल्याची चर्चा असून, ग्रामस्थांनी वनविभागाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. रात्रीच्या अंधारात पुन्हा अशी घटना घडू नये, यासाठी सतर्कता बाळगण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.


## जाहिर नोटिस

श्री. मंगेश शंकर शेराम हे मौजा पिपरी मेघे, मौजा क्र. ८७, पी.एच. क्र. २१, ता. व जि. वर्धा येथील ग्रामपंचायत पिपरी मेघे हद्दीत येणाऱ्या मौजा पिपरी मेघे येथील सर्वे क्र. ६८, प्लॉट क्र. ५२, क्षेत्रफळ १५३.३१ चौ.मी. (१६५०.०० चौ.फुट) या मालमत्तेचे मालक आहेत.

**सदर प्लॉटच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत.**

पूर्वेस : प्लॉट क्र. ५७,

पश्चिमेस : ६ मीटर रुंदीचा लेआउट, रस्ता ,उत्तरेस : प्लॉट क्र. ५१,

दक्षिणेस : प्लॉट क्र. ५३,

श्री. पवन देविदासजी गाडेगोन यांनी प्लॉट क्र. ६८, क्षेत्रफळ १५३.३१ चौ.मी. (१६५०.०० चौ.फुट) हा प्लॉट दिनांक १२-०६-२०२४ रोजी दस्त क्रमांक २३३७/२०२४ अन्वये विक्रीखताद्वारे नमूद एकूण मोबदल्यावर व आवश्यक मुद्रांक शुल्क भरून श्री. मंगेश शंकर शेराम यांना विक्री केला आहे.

माझ्या ग्राहकांकडून खालील मूळ विक्रीखते हरवली आहेत –

विक्रीखत दिनांक १५-०५-१९९४, दस्त क्र. १५०५

विक्रीखत दिनांक २१-०३-२००३, दस्त क्र. १५८४/२००३

विक्रीखत दिनांक ०६-०८-२००३, दस्त क्र. ४०७८/२००३

तसेच माझ्या ग्राहकांनी ऊँ र्ण्ज्ञ्ूत प्द्ल्ेहु इर्ह्हम थ्. येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा वरील नमूद केलेली मूळ विक्रीखते कोणास सापडल्यास, कृपया सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर,**
**वर्धा.मो. ९८२२४२६१६८**



## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार अभिषेक अभय कोठारी यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे: मौजा कडजना, ता. हिंगणघाट जि. वर्धा, ग्रामपंचायत कडजनाच्या हद्दितील शेत सर्वे कं. १८१/१ (लिज डिड प्रमाणे) व १८१/१/१/२ (७/१२ प्रमाणे), मधील प्लॉट कं. २ ज्याची एकुण आराजी ५९१९. ४५ चौ. मी. इतकी असुन त्याची चतुःर्सिमा आहे. पुर्वेसः लगतचे शेत सर्वे कं. १८१/२, पश्चिमेसः प्लॉट कं. १, सर्वे नं. १८१/१ कडजना, उत्तरेसः नंदोरी हिंगणघाट राज्यमार्ग, दक्षिणेसः नंदोरी हिंगणघाट राज्यमार्ग

माझे पक्षकार अभिषेक अभय कोठारी यांनी वर नमुद मालमत्ता पुखराज कनकमल कोठारी यांच्या मृत्युपत्रान्वये प्राप्त केलेली आहे. त्यांनंतर माझे पक्षकार अभिषेक अभय कोठारी, अनुप अजीतकुमार कोठारी, व अभिषेककुमार अभयकुमार कोठारी यांच्यामध्ये वाटणीपत्र झाले. माझे पक्षकार यांनी शेत सर्वे कं. १८१/१ पुर्ण चे मुळ नोंदणीकृत विकिपत्र दिनांक ०८/०८/२०१२ ज्याचा दस्त कं. २८७० असा आहे तसेच मुळ नोंदणीकृत वाटणीपत्र दिनांक ०३/०१/२०१९ ज्याचा दस्त कं. १४/२०१९ असा आहे ते मुळ विकिपत्र व वाटणीपत्र आपल्या ताब्यात घेतले होते. ते वर नमुद मुळ विक्रीपत्र व वाटणीपत्र माझे पक्षकार यांच्या ताब्यातुन गहाळ झालेले आहे.

माझे पक्षकार वर नमुद मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता तसेच गहाळ झालेले वर नमुद मुळ विक्रीपत्र व वाटणीपत्र कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क व अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह ७ दिवसांच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही. तसेच गहाळ झालेले मुळ विकिपत्र व वाटणीपत्र सापडल्यास ते त्वरीत माझे पक्षकार यांना परत करावे.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

यशाचे अनेक वैध मार्ग असतात. पण, प्रतिस्पर्ध्याने त्यातला 'शॉर्टकट' निवडला, तर इतरांनाही त्याचेच अनुकरण करावे लागते. राजकारणात तर जणू हा नियमच आहे. कारण, तिथे कालापव्ययाला क्षमा नसते. प्रत्येकालाच 'ट्वेंटी-ट्वेंटी' खेळायची असते आणि जिंकायचेही असतेच. निवडणुकीच्या तोंडावर मतदाराला 'फुकट आमिष दाखवण्याचा प्रकार त्यातून सुरू झाला. मध्य प्रदेशात त्याही पुढे जाऊन महिलांच्या खात्यात दर महिन्याला 'भाऊबीज' जमा करण्याची शक्कल लढवली गेली. त्यातून निवडणुकीत चांगले यश मिळाले म्हटल्यानंतर पुढे तेलंगण, कर्नाटक, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, दिल्ली आणि बिहारमध्ये तोच कित्ता गिरवला गेला. प्रत्येक राज्यात साहजिकच त्यात सुधारणा होत गेल्या. निवडणुका जिंकण्यासाठीचा हा सर्वात आकर्षक आणि खात्रीशीर फॉर्म्युला आता यावर्षी ज्या राज्यात निवडणुका आहेत, तिथे वापरला जाणार आहे. दक्षिणेच्या राज्यात हा 'फॉर्म्युला' गेली काही दशके वापरला जातो आहे. सायकल, टीव्ही, गॅस शेगड्या, पंखे असं बरंच काही वस्तुरूपाने तिथे वाटले गेले आहे. दरमहा मोफत तांदूळ आणि त्याबरोबर आणखी काही किराणा माल देण्याची कल्पनाही दक्षिणेच्या राज्यांचीच. महाराष्ट्रातही असा विचार गेल्या दशकाच्या पहिल्या निवडणुकीसाठी झाला होता. पण, तत्कालीन सत्ताधाऱ्यांकडून होता होता ती योजना राहिली. मतदारांच्या थेट खात्यातच रक्कम जमा करण्याची कल्पना त्यापुढची आहे. तामिळनाडूमध्ये आता विधानसभा निवडणुका आहेत. याच वर्षी होऊ घातलेल्या या निवडणुकांच्या आधी तिथल्या द्रमुक सरकारने राज्यातील सर्व घरांत मोफत वीज पुरवण्याचा निर्णय घेतला. त्याबाबतची याचिका सर्वोच्च न्यायालयासमोर आली असता मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांना या प्रकाराबाबत सरकारला प्रश्न विचारण्याची संधी मिळाली. तामिळनाडू सरकारला फैलावर घेण्याच्या निमित्ताने त्यांनी कोणत्याही राज्याचा किंवा कोणत्याही राज्याच्या कोणत्याही योजनेचं नांव न घेता 'फुकट वाटपा'च्या धोरणाबद्दल आपली नाराजी व्यक्त केली. लोकनियुक्त सरकार त्यांचे निर्णय घेण्यासाठी सार्वभौम आहेत. त्यांना आडकाठी घालता येत

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# 'रेवडी'चा विरोध

नाही, पण, प्रश्न उपस्थित करता येतात. अन्य कोणी ज्याबद्दल थेट बोलू शकत नाहीत, त्याबाबत न्यायालयाला बोलता येत. सूर्यकांत यांनी ते केले. त्यामुळे चर्चेला तोंड फुटलं. सरकारला स्वतःचे उत्पन्नाचे साधन नसते. कर रूपाने गोळा होणारा पैसा आणि ज्या मालमत्तांचे विश्वस्तपद जनतेच्या वतीने त्यांच्याकडे आले आहे, त्यांचा ताबा हेच त्यांचे भांडवल असते. नागरिकांवर कराचे कमीत कमी ओझे टाकून कराच्या पैशांचं शक्य तेवढे चोख नियोजन करणं हे सरकारचे पहिले काम असते. सरकारचं यश त्यावरून मोजलं जातं. भारतासारख्या विषम आर्थिक परिस्थितीच्या देशांत दुर्बल घटकातील व्यक्ती-कुटुंबांना कर सवलती तर द्याव्या लागणारच; पण अधिक मदतही करावी लागणार, हे गृहीत आहे. 'गरजूं'ना मदत वेगळी आणि निवडणूक जिंकण्यासाठी जे 'गरजू' होतात, त्या गरजवंतांकडून 'फुकट वाटप' होणारी मदत वेगळी. या 'फुकट वाटपा'चा टक्का सध्या वाढतो आहे. त्यात अधिकात अधिकांना सामावण्यासाठी निकष अधिकाधिक सैल केले जात आहेत. त्यातून ज्यांना खरोखरच गरज नाही, असेही 'लाभार्थी' तयार होत आहेत. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या मनमोहन सिंह यांच्या सरकारच्या काळात काँग्रेसच्या तत्कालीन अध्यक्ष सोनिया गांधी यांनी त्यांच्या आग्रहापोटी 'अन्नसुरक्षा योजना' आणली. दर महिन्याला प्रत्येक कुटुंबाला माणसी धान्य, काही किराणा मोफत देण्याची तरतूद त्यात होती.

त्यावेळी मंत्रिमंडळात असलेल्या शरद पवार यांनी त्याला विरोध केला होता. अकुशल कामगार किंवा शेतीसाठी शेतमजुरांची टंचाई त्यातून निर्माण होईल, ही त्यांची भीती होती. ती खरी ठरली. शेतीचे, ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सगळे गणित त्या योजनेने विस्कटून गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही मध्यंतरी 'रेवडी' संस्कृती बद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली होती. आता न्यायालयाने घेतलेले आक्षेपही तेच आहेत. या फुकट वाटपाने मतदार खुश होत असला, राजकीय पक्षांची सोय होत असली, तरी राज्य कर्जाच्या ओझ्याखाली दवत आहेत. दीर्घकालीन गुंतवणुकीच्या योजना, दीर्घकालीन परिणामांच्या दूरदृष्टीच्या योजना आखण्याची क्षमता राज्य गमावत आहेत. अर्थसंकल्पात भांडवली गुंतवणुकीची रक्कम किरकोळ होत चालली असून प्रशासकीय खर्च आणि या तात्कालिक लाभाच्या योजनांवरील तरतुदींचे आकडे फुगत चालले आहेत. खरे तर, याचा फटका शेवटी गरिबालाच बसतो आहे. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला नाही. लेखी आदेशही नाही. पण, सविस्तर मतप्रदर्शन मात्र केले आहे. सरकारला तोंडी सूचनाही केल्या आहेत. देशाला स्वावलंबी, आत्मनिर्भर करायचे, तर देशातील नागरिक तसा झाला पाहिजे. अशा स्वावलंबनासाठी सामाजिक मन तयार केले पाहिजे. जिथे आवश्यकच आहे, तिथे मदत केली पाहिजे, पण, त्यातून सरकारी योजना किंवा सवलतींवर जगणारा वर्ग तयार होणार नाही, याची काळजीही घेतली पाहिजे. नागरिकांना रोजगाराच्या, कौशल्याच्या; त्यासाठीच्या शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. कष्टाच्या कमाईच्या आत्मप्रतिष्ठेची सवय लागली पाहिजे, हे नाही केले तर हळूहळू समाजातील सृजनशक्ती लयाला जाते. आपल्यालाच संपूर्ण समाजाचे ओझे व्हावे लागते आहे, अशी हताशता कर्त्या वर्गाच्या मनात येते आणि ते देशांतून स्थलांतरच्या संधी शोधू लागतात. आपल्या विकासकामांवर, विकासाच्या दृष्टीवर मतं मिळवण्याऐवजी अशी 'रोख' मतं घेण्याची सवय राजकीय पक्षांना लागते. राजकीय पक्षांच्या एका छोट्याशा मोहाने एवढे सारे अनर्थ घडतात. देशासाठी हे टाळा, असं आवाहनच सर्वोच्च न्यायालयाने या निमित्ताने केले आहे.

# सिंचन व्यवस्थापन अराजकतेच्या वळणावर

**राज्यात सिंचन क्षेत्रास चालना देण्यासाठी अगदी सुरुवातीपासूनच अनेक प्रयत्न झाले. परंतु आज सिंचन व्यवस्थापन कोलमडून अराजकतेच्या वळणावर येऊन ठेपले आहे. या विदारक परिस्थितीची राज्यकर्त्यांनी तातडीने दखल घ्यावी, हीच सिंचनदिनी अपेक्षा !**

राज्यातील उपलब्ध भूपृष्ठीय जल स्रोतांचा वापर करून सिंचन क्षेत्र निर्माण करण्याची, प्रत्यक्षात वापरण्याची आणि ते वाढविण्याची जबाबदारी प्रामुख्याने जलसंपदा विभागावर आहे. त्याचबरोबर मृद व जल संधारण विभाग व कृषी विभाग हेही लघूयोजनांच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर सिंचनाच्या सुविधा निर्माण करतात. वैयक्तिक शेतकरी उघड्या विहिरी व बोअरवेल खोदून भूजलाचा मोठ्या प्रमाणात वापर करत आहेत. महाराष्ट्र राज्याची निर्मिती १९६० रोजी झाली. त्यावेळी राज्यस्तरीय प्रकल्पांतून निर्मित सिंचन क्षेत्र ३.८ लाख हेक्टर होते.

गेल्या सहा दशकांत त्यात १५ पट्टीने वाढ होऊन आज ते ५६.४ लाख हेक्टर झाले आहे. १९६० मध्ये ब्रिटिशकालीन भंडारदरा, दारणा, भाटघर, खडकवासला, चणकापूरसारखी अगदी बोटांवर मोजण्याइतकी धरणे होती, तर आजमितीस जलसंपदा विभागाच्या अखत्यारित मोठी, मध्यम व लघू अशी एकूण ३६३६ पूर्ण बांधकाम झालेली धरणे आहेत. त्यातून ४३.७ अब्ज घनमीटर उपयुक्त पाणीसाठा निर्माण झाला आहे. यामुळे राज्याला जल सुरक्षितता प्राप्त होऊन कृषी सिंचनाबरोबरच अनेक महानगरे, शहरे व ग्रामीण भागास तसेच अनेक कारखाने, औद्योगिक समूह, जल विद्युत केंद्रे, औष्णिक वीज निर्माण केंद्रे यांना पाण्याचा शाश्वत स्रोत उपलब्ध झाला आहे.



मृद् व जलसंधारण विभागाकडे ६०० हेक्टरपेक्षा कमी लाभक्षेत्र असलेल्या प्रकल्पांचे नियोजन व कार्यान्वयन केले जाते. यामध्ये लघू सिंचन तलाव, कोल्हापुरी बंधारे, सिमेंट नाला बांध, वळवणीचे बंधारे, उपसासिंचन योजना, गाव तलाव, साठवण तलाव, माजी मालगुजारी तलाव, पाझर तलाव आणि भूमिगत बंधारे इत्यादींचा समावेश होतो. आजपावेतो एक लाख १४ हजार ६३८ पूर्ण झालेल्या योजनांतून २०.९ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होऊन ९.३ लाख हेक्टरवर प्रत्यक्ष सिंचन झाल्याचे कळते. जलयुक्त शिवार अभियानातून २.७ अब्ज घन मीटर पाणीसाठा निर्माण होऊन ३९ लाख हेक्टर शेतीसाठी संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण करण्यात आल्याचे सांगितले जाते. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या सहाव्या लघू सिंचन प्रगणनेनुसार (२०२३) राज्यात उघड्या विहिरी व बोअरवेलची संख्या ३२ लाख ३३ हजार ९६५ असून, भूजलाद्वारे ६०.६ लाख हेक्टर क्षेत्र सिंचन होते. कृषी विभागामार्फत तुषार व ठिबक सिंचन योजना व मागेल त्याला शेततळे योजना राबविली जाते. सन १९८६-८७ ते आजतागायत ठिबक सिंचनाखाली २२.३ लाख हेक्टर व तुषार सिंचनाखाली ९.८ लाख हेक्टर असे एकूण ३२.१ लाख हेक्टर क्षेत्रास या आधुनिक सिंचन तंत्रज्ञानाचा लाभ मिळाला आहे. यामुळे राज्यातील फळझाडे, द्राक्ष, केळी, कापूस, ऊस, भाजीपाला पिके, गहू, तेलबिया पिके, डाळवर्गीय पिकांच्या क्षेत्रात व उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. कृषी विभागाने पावसाचे पाणी साठविण्यासाठी हजारो शेततळी बांधली आहेत. त्यामुळेही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सिंचनाचा फायदा शेतकऱ्यांना मिळाला आहे.

### सिंचन क्षेत्रातील सुधारणा

राज्यात सिंचन क्षेत्रास चालना देण्यासाठी अगदी सुरुवातीलाच पहिला सिंचन आयोग (१९६०) स्थापन केला गेला. त्यानंतर १९९९ मध्ये महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने राज्यातील एकंदर सिंचन क्षेत्राचा खोरेनिहाय सखोल अभ्यास करून उत्कृष्ट अहवाल सादर केला. नदीखोरेनिहाय पाच सिंचन विकास महामंडळे, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (१९८०), राज्य जल मंडळ, राज्य जल परिषद, महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायदा २००५ व नियमन प्राधिकरणाची स्थापना, एकात्मिक राज्य जल आराखडा (२०१८) हे देशात पहिल्यांदा महाराष्ट्रात घडले आहे. जल संपदा विभाग आंतरराष्ट्रीय संकल्पनेतून प्रेरित होऊन २००१ पासून सिंचनस्थितिदर्शक, जललेखा व बेंचमर्किंग अहवाल प्रसिद्ध करत आहे. या सर्व सुधारणांमुळे महाराष्ट्राला एकेकाळी देशपातळीवर अव्वल स्थान मिळाले होते. परंतु दुर्दैवाने राज्य सिंचनाच्या बाबतीत केवळ पिछाडीवरच आले नाही तर सिंचन व्यवस्थापन कोलमडून अराजकतेच्या वळणावर येऊन ठेपले आहे.

### जल व्यवस्थापनाकडे अक्षम्य दुर्लक्ष

राज्यासाठी धरणे महत्त्वाची असली तरी त्यांच्या बांधकामातून जल संपदा विभाग सहा दशकानंतरही बाहेर येऊ शकले नाही. अजूनही २५९ सिंचन प्रकल्प बांधकामाधीन आहेत व ती पूर्ण करण्यासाठी एक लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी लागणार आहे. अनेक प्रकल्पांचे दशकान्दशके बांधकाम चालत राहिल्यामुळे शेतकऱ्यांऐवजी कंत्राटदार, अधिकारी आणि काही राज्यकर्ते यांचाच फायदा होतो आहे. त्यातच नार-पार, नळगंगा-पेनगंगा सारखे महाकाय नदीजोड प्रकल्प हाती घेण्याचे शासनाने निर्णय घेतला आहे. ज्या प्रमुख उद्देशासाठी अब्जावधी रुपयांची प्रचंड गुंतवणूक केली त्याकडे मात्र सातत्याने दुर्लक्ष होत आलेले आहे. कालव्यात मोठ्या प्रमाणात गाळ व झाडेझुडपे वाढल्यामुळे वितरण प्रणालीची कार्यक्षमता कमी होऊन सिंचन प्रकल्पांची कामगिरी खालच्या स्तरावर आली आहे. 'बांधा आणि दुर्लक्ष करा' या मानसिकतेमुळे उध्वस्त झालेली एक लाख किलोमीटर लांबीची कालवा वहन प्रणाली कर्ज घेऊन दुरुस्त होणार आहे काय ?

ज्या उद्देशाने शासनाने सहभागी सिंचन व्यवस्थापन कायदा २००५ केला त्याच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केल्यामुळे गेल्या दोन दशकांत पाणी वापर संस्थेच्या माध्यमातून सहभागी सिंचन व्यवस्थापन हा 'गेम चेंजर' समजला जाणारा उपक्रम सपशेल फेल झाला आहे. ठेकेदारांच्या माध्यमातून संस्था स्थापण्याचे काम चालू आहे, जे सहभागी सिंचन या संकल्पनेच्या विपरीत आहे. पाणी चोरी, धरणांच्या जलाशयातून हजारो पंपाद्वारे पाण्याचा अवैध उपसा होत आहे. पाणी पट्टी आकारणी व वसुलीच्या सदोष पद्धतीमुळे सिंचन व बिगरसिंचनाची सुमारे सहा हजार कोटीची थकबाकी झाली आहे. लाभक्षेत्रातील सिंचन व्यवस्थापन कालबाह्य झाले आहे.

शास्त्रीयदृष्ट्या पिकाला पाण्याची किती व केव्हा गरज आहे याचा विचार न करता ते जमिनीला दिले जाते. आज रिमोट सेन्सिंगच्या साह्याने पिकांची दैनंदिन सिंचनाच्या पाण्याची तंतोतंत गरज ठरवून ते प्रत्यक्ष देण्याचे अत्याधुनिक तंत्रज्ञान आपल्याच देशात उपलब्ध असूनही त्यापासून आपला शेतकरी वंचित आहे. सिंचन व्यवस्थापनाच्या या विदारक परिस्थितीची राज्यकर्त्यांनी तातडीने दखल घ्यावी हीच सिंचनदिनी अपेक्षा!

**डॉ. सुरेश कुळकर्णी**
kulsur@gmail.com
(लेखक आंतरराष्ट्रीय सिंचन व जलनिस्सारण आयोगाचे निवृत्त कार्यकारी सचिव आहेत.)

## म-हाठी माती...

काटा घुसता पायात
पाणीलगेचं डोळ्यांत

मातृभाषेत ये हुंकार
वेदना बोलते ओठात

ओलांडले समुद्रसात
वावरलो सुटा बुटात

इंग्रजांच्या कळपात
वावरतो कसे थाटात

मराठीची ओल राही
अंतरात देवा-ह्यात

जागा तीजकायमची
छान एक कोप-यात

भाषणे कैक भाषेत
बोले मी अस्खलीत

चीड येते शिव्यामात्र
देतो चक्क मराठीत

रे सरकारी दरबारात
मान नसो अभिजात

मराठी रे मनामनात
सळसळे नसानसात

अवमान रे मराठीचा
घुसे जोरा काळजात

मर्द मावळे शिवबाचे
धीट असे जन्मजात

मालवता प्राणज्योत
देवाचे नाव म-हाठीत

जन्मा यावे पुन्हापुन्हा
महाराष्ट्रा तव मातीत

**हेमंत मुसरीफ**
मो.९७३०३०६९९६

## 'आई-बाबा' शब्द हरवलेली मराठी

आज आपल्याला मम्मी, मॉम, पप्पा, डॅड आणि डॅडी हे शब्द अगदी सर्रास ऐकायला मिळतात. हे शब्द सहसा लहान मुलं आपल्या कुटुंबात वापरत असतात. आपल्या लहान मुलांना मम्मी, मॉम, पप्पा, डॅड, डॅडी ह्या शब्दांचा अर्थ सुद्धा माहित नसतो. हे शब्द मुलांच्या अंगवळणी पडलेले असतात म्हणून ते सहजतेने वापरत असतात. आपल्याला सुद्धा आपले मुलं हे शब्द वापरतात म्हणून खूप अभिमान वाटत असतो. आपण सुद्धा ह्याचे गोडवे गात असतो आणि आपण कसे स्वतःला स्टॅंडर्ड झाल्याचे म्हणवून घेत असतो व समाजात वावरत असतो. पूर्वी सुद्धा हे शब्द वापरले जायचे परंतु प्रमाण फार दुर्मिळ होते. हा सर्व परिणाम जागतिकारणाचा आहे. हे आता सर्वत्र स्पष्ट दिसून येत आहे.

आपण दिवसाची सुरुवातच गुड मॉर्निंगने करतो आणि दिवसाची सांगता गुड नाईटने करतो. त्यात भरीस भर प्रोत्साहन देण्यासाठी मोबाईलचा, व्हाट्स अपचा हातभार लागतोच आहे. त्यात आपण लहान बाळाला किसी दे, किसी असे म्हणत असतो. ह्यात आपला मुका कधी हरवला, कधी मुका झाला हे कळलेच नाही. अशा परिस्थितीत मराठी भाषेवर आक्रमण होत आहेत. सध्या मराठी भाषा आपल्या स्वकीयांच्याच आक्रमणाने बेजार झाली आहे.

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी मातृभाषेतून शिक्षण हे अत्यंत उपयुक्त ठरते. मुलांच्या आचार, विचार आणि उच्चार यासाठी चिंतन आणि यातून अभिव्यक्ती प्रक्रिया सुकर होण्यासाठी मातृभाषेतून शिक्षण महत्वाचे आहे. हाच खरा व्यक्तिमत्व विकासाचा भाग आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला ही आपल्यासाठी खूप आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. अभिजात दर्जामुळे शिक्षण संशोधनाच्या नव्या संधी मिळतील हा आपला सकारात्मक दृष्टिकोन आहे. पण त्या अगोदर तो मराठीचा पाया आहे तो मजबूत करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्याला आई-बाबा परत आणणे गरजेचे आहे. मराठी दिनाच्या सर्वानाच हार्दिक शुभेच्छा.

**अरविंद सं. मोरे**

## मराठीःमाझी मायबोली....

२७ फेब्रुवारी ला मराठी भाषा दिन आहे. या भाषेची समृद्धता अवर्णीय आहेच पण त्या भाषेत अनेक परकीय शब्दांनी आपले अस्तित्व निर्माण केले आहे. तरीही त्याची गरिमा अजूनही सुसंस्कृत आहे कारण या भाषेचे मूळ देवभाषेशी म्हणजेच संस्कृतशी निगडीत आहे. ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संत नामदेव यांनी आपल्या अभंगांतून आणि ओव्यांतून मराठीला जनमानसात रुजवले. ज्ञानेश्वरी' सारखा महान ग्रंथ मराठीत लिहिला गेल्यामुळे आध्यात्मिक ज्ञान सर्वसामान्यां पर्यंत पोहोचले. कुसुमाग्रज, वि. स. खांडेकर (ज्ञानपीठ विजेते), पु. ल. देशपांडे यांसारख्या साहित्यिकांनी आधुनिक मराठी साहित्याला जागतिक उंचीवर नेले. मराठी ही जगातील जुन्या आणि समृद्ध भाषांपैकी एक आहे. तिला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, जो तिच्या प्राचीनतेचा पुरावा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसोबतच 'राज्यव्यवहार कोश' तयार करून मराठी भाषेला प्रशासकीय प्रतिष्ठा मिळवून दिली. ही भाषा विविध अंगांनी नटलेली असली, तरी तिला या आधुनिक काळात टिकविणे हे आपल्यासारख्या सुजाण नागरिकांच्या हातात आहे, हे विसरून चालणार नाही.

**आल्हाद माळगांवकर**

## 'माय मराठी'ला समृद्ध करू !

दरवर्षी २७ फेब्रुवारीला कवी वि.वा. शिरवाडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मराठी राजभाषा दिन राज्यात सर्वत्र उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी आणि या दिवसाच्या निमित्ताने सर्वत्र मराठीचा बोलबाला असतो, मराठीत स्वाक्षरी करण्याच्या मोहीमा राबवल्या जातात, मराठी बोलण्याचा अट्टाहास केला जातो, मराठी पाट्यांचा प्रश्न ऐरणीवर येतो, मराठीतून शुभेच्छा देण्याचे आवाहन केले जाते. मात्र हा दिवस सरला की पुढे वर्षभर कोणी मराठीविषयी काहीच बोलताना दिसत नाही, त्यामुळे मराठी भाषाभिमानही अन्य 'डेज'प्रमाणे केवळ एक दिवसापुरता सीमित राहिला आहे.




आज मराठी भाषेला महाराष्ट्रातच घरघर लागली आहे याचे कारण आपलाच व्यवहारातील मराठीचा वापर कमी होत चालला आहे. एकीकडे मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत, तर दुसरीकडे इंग्रजी माध्यमांच्या आणि कॉन्व्हेंट शाळांना 'अच्छे दिन' आले आहेत. आजमितीला चारचौघांत इंग्रजी भाषेत संभाषण साधने प्रतिष्ठेचे समजले जाते. शाळांमध्ये मुलांना भरती करण्याआधी त्यांच्या पालकांना इंग्रजी येते का हे पाहण्यासाठी प्रथम पालकांच्या मुलाखती घेतल्या जातात. अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये नव्याने नोकरीस लागणाऱ्या मराठी माणसाला आज इंग्रजी मुलाखतीला सामोरे जावे लागते. आज मॉल किंवा सुपर मार्केट या ठिकाणी ग्राहकांशी नीट संवाद साधता यावा यासाठी हिंदी आणि इंग्रजी चांगले येणाऱ्या तरुण तरुणींना नोकरीवर ठेवले जाते त्यासाठी त्यांना अधिक वेतन दिले जाते त्यामुळे अशा ठिकाणी मराठी मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. ही स्थिती कोणी निर्माण केली ?

आज मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत. घरोघरी आई, बाबा, काका, मामा या गोड नात्यांची जागा आता मम्मा, डॅडा, आंटी, अंकलने घेतली आहे. मुलांना असे म्हणण्यास पालकांकडूनच प्रवृत्त केले जात आहे. मराठी भाषेला जपायचे असले तर सर्वप्रथम मराठी संस्कृती आणि मराठी अस्मिता जपणे अधिक महत्वाचे आहे आणि त्याची सुरुवात प्रत्येक मराठी माणसाने स्वतःपासून आणि आपल्या कुटुंबापासून करायला हवी. 'मराठी बोला, मराठी जगा आणि मराठी वागा' या नीतीचा अवलंब राज्यात सर्वच ठिकाणी केला गेला तरच येणाऱ्या काळात मराठी भाषेला तिचे पुनर्वैभव प्राप्त होईल.

**मोक्षदा घाणेकर**

### मायमराठीची उपेक्षाच

आज महाराष्ट्रात मराठी भाषेच्या जतनासाठी व्यापक चळवळ उभारली जाण्याची आता वेळ आली आहे. भाषा हा आपल्या सांस्कृतिक अभिमानाचा विषय आहे. सध्याच्या युगात जी भाषा आपल्याला रोजगार देऊ शकते ती भाषा शिकण्याकडे लोकांचा अधिकाधिक कल दिसून येतो. मातृभाषा टिकवण्यासाठी यापुढील काळात विशेष प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. केवळ मराठीच्या बेगडी प्रेमाखातर गळे काढून आपि माय मराठी टिकू शकणार नाही. त्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखला गेला पाहिजे. महाराष्ट्र सरकार त्यासाठी मदतीला तत्पर असायला पाहिजे. परंतु मराठी वाचविण्याच्या कामासाठी कार्यकर्त्यांची निकड भासत आहे. जास्तीत जास्त मराठी भाषेचा वापर करण्याची सवय लागल्यास भाषेच्या जाणिवा अधिकाधिक प्रगल्भ होत जाणार आहेत. सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मराठी भाषेला मिळत असलेले दुय्यम स्थान ही अतिशय वेदनादायी बाब आहे.

मराठी सिनेमा आणि नाटके यांचा जास्तीत जास्त प्रचार, प्रसार झाल्यास मराठी भाषा सर्वदूर जाणे सुलभवह होणार आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे राज्यभरात बोलल्या जाणाऱ्या मराठी बोलींच्या शब्दांचा वापर रोजच्या व्यवहारात जाणीवपूर्वक वाढवावा लागेल. शालेय स्तरापासूनच मराठी भाषेची गोडी विद्यार्थ्यांना कशी लागेल, यावरही लक्ष द्यावे लागेल. त्यापुढे मराठी बीभाषेत प्रसिद्ध होणारे साहित्य घरोघरी वाचले जावे, याचीही काळजी घ्यावी लागेल. माय बोलीचे सौंदर्य प्रकट करणारे विविध कार्यक्रम लोकांपर्यंत पोहोचवले पाहिजेत. भाषेच्या अंगाने विचार करण्यास मराठी जनतेला भाग पाडले तरच मराठी भाषेचे भवितव्य उज्वल असणार आहे. भाषा टिकली तरच आपला समाज टिकणार आहे. भाषा हा कुठल्याही समाजाचा अभिमान बिंदू असतो, हे ध्यानी घेऊनच मराठीसाठी लढा दिला पाहिजे.

**प्रा. मधुकर चुटे**

## 'कुसुमाग्रज' प्रतिभावंत साहित्यिक

आज आपण मराठी भाषा दिन साजरा करत असतो. आजच्या दिवशी मराठी सारस्वत असलेल्या मराठी साहित्यिकांचे व मराठी वाड्ममयात महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या संत मंडळीचे स्मरण होते. अशाच साहित्यिकापैकी एक महान व्यक्तिमत्व म्हणजे थोर साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर यांचा आज जन्मदिवस आहे. त्यांचा हा जन्मदिवस' मराठी भाषा गौरव दिन' म्हणून सर्व ठिकाणी साजरा केला जातो. पन्नास वर्षाहून अधिक काळ त्यांनी साहित्य क्षेत्रात लेखन केले. नटसम्राट, राज मुगुट, व वरचे दिवे ही त्यांची नाटके होती. सामाजिक अन्याय व विषमता यावर त्यांनी परखड असे लिखाण केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळी मध्ये सुद्धा त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. असे हे कुसुमाग्रज मराठी मनावर राज्य करणारे प्रतिभावंत साहित्यिक होते.

**प्रा. विश्वंभर कापसे**
मो.९४२१८२६५६०

## माय मराठी

सकल भाषांत शोभून दिसे
ती माझी माय माऊली मराठी
भाव, अर्थ, बंध तरलस्पर्श
स्फुरे मधुर नाद तिच्या ओठी

अभंग, दोहे, भारुड, ज्ञानेश्वरी
साहित्य उमले तिच्या पाठी
भाव शृंगार, साज लेवुनी
जणु सजली ती जरिकाठी

अक्षरमळा फुले तिच्यातुनी
दशकानुदशके शतकाकाठी
साहित्याच्या रसपानातुनी
मनामनाच्या इथे जुळे गाठी

अभिमानाची, अस्मितेची उमटे
लकेर तिच्या पद्यातून लल्लाठी
धन्य ती माय माऊली मराठी
उद्घोष मनाच्या तळ्याकाठी

**राजश्री खाजोने**
चांदूर बाजार, जि.अमरावती
मो.९६६५६८०६३९

शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६
E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# गांधी दर्शनाच्या आडून नियमांची पायमल्ली?

## यवतमाळ शिक्षण विभागातील समायोजन प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : जिल्हा परिषद शाळांतील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेत शासन नियमांना बगल देण्यात आल्याचा गंभीर आरोप शिक्षण विभागावर होत आहे. स्थानिक पंचायत समितीअंतर्गत पार पडलेल्या या प्रक्रियेत "गांधी दर्शन" शिवाय फाईल पुढे सरकत नाही, अशी चर्चा प्रशासकीय वर्तुळात रंगली असून, पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

समायोजनासाठी जाहीर करण्यात आलेल्या यादीत आक्षेप नोंदविण्याची अंतिम तारीख २२ फेब्रुवारी देण्यात आली. मात्र २१ आणि २२ तारखेला कार्यालयाला सुट्टी असल्याने संबंधित शिक्षकांना आक्षेप नोंदविण्याची प्रत्यक्ष संधीच मिळाली नाही. या परिस्थितीचा फायदा घेत गटशिक्षणाधिकारी पोपेश्वर भोयर यांनी घाईघाईने पुढील कारवाई केल्याचा आरोप होत आहे. मागील दोन दिवसांत काही बदल्या पूर्ण केल्याची माहिती समोर येत आहे.विशेष म्हणजे, ज्या शाळांमध्ये विद्यार्थिनींची संख्या ५० पेक्षा अधिक आहे.त्या शाळांमध्ये महिला शिक्षक नेमणे बंधनकारक असल्याचा नियम ग्रामविकास व गृह विभागाकडून आहे. मात्र प्रत्यक्षात अशा काही शाळांमध्ये पुरुष शिक्षक कायम ठेवून महिला शिक्षकांना अन्यत्र हलविण्यात आल्याचे दिसून येत आहे. राज्यातील काही गंभीर घटनांनंतर विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी महिला शिक्षक व सीसीटीव्ही सक्तीचे करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. तरीही या नियमांची पायमल्ली झाल्याची चर्चा आहे. शिक्षण विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या मते, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय हे निर्णय शक्य नाहीत. कालपर्यंत कडक भूमिका घेणारे काही अधिकारीही आता गप्प का आहेत, असा सवाल उपस्थित केला जात आहे.दरम्यान, संबंधित अधिकाऱ्याने आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऐच्छिक निवृत्तीचा अर्ज दिल्याची माहिती आहे.

राजकीय आश्रय मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची चर्चा असून, पूर्वी बोगस अपंग प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी केल्याचा आरोपही पुन्हा चर्चेत आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी मागणी शिक्षक व पालकांकडून होत आहे. आयुक्त कार्यालयाने तातडीने लक्ष घालून समायोजन प्रक्रियेची पारदर्शक चौकशी करावी, अन्यथा "गांधी दर्शन"च्या सावटाखाली शिक्षण व्यवस्थेचा विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# खासदार संजय देशमुख यांच्या वाहनाला ओव्हरलोड टिप्परची जोरदार धडक





**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - खा.संजय देशमुख यांच्या वाहनाला ओव्हरलोड टिप्परने धडक दिल्याची घटना बुधवारी (दि. २६ फेब्रुवारी) सायंकाळी सुमारे ६.४५ वाजताच्या सुमारास दिग्रस–दारव्हा रोडवरील साखरा परिसरात घडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून खासदारांसह वाहनातील सर्वजण सुखरूप बचावले आहेत.

**मोठे नुकसान, सर्वजण सुखरूप**

यवतमाळ–वाशिम मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख हे साखरा येथे स्वर्गीय माजी जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती यांच्या पुण्यस्मरण कार्यक्रमासाठी गेले होते. कार्यक्रम आटोपून ते दिग्रसकडे परत येत असताना स्व. सुमनताई राठोड यांच्या शेताजवळ रेल्वे कामावर धावणाऱ्या ओव्हरलोड टिप्पर (क्रमांक एमएच 40 बीजी 6403) ने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या वाहनात खासदार देशमुख यांच्यासह रमेश चव्हाण, दीपक वानखेडे, भारत राठोड, योगेश रामावत, सुरक्षा रक्षक अतिश सवळे आणि चालक शेख माजिद उपस्थित होते. अपघातामुळे खासदारांच्या वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले; मात्र कोणालाही गंभीर दुखापत झाली नाही. घटनेची माहिती मिळताच दिग्रस पोलीस ठाण्याचे ठाणेदार वैजनाथ मुंडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी संबंधित टिप्पर आणि चालकाला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते; मात्र पोलिसांच्या तत्परतेमुळे परिस्थिती लवकर नियंत्रणात आली.

# जिओ टॉवर देखभाल ठप्प

## कामगारांच्या धरणे आंदोलनामुळे सेवा विस्कळीत ग्राहक त्रस्त

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - मोबाईल टॉवर कामगार (टेक्नीशियन) संघटनेने मुख्य व्यवस्थापक, Pratap Technocrats Pvt. Ltd. यांच्या विरोधात १८ फेब्रुवारी २०२६ पासून आझाद मैदान यवतमाळ येथे जिल्हाधिकारी कार्यालयायांना निवेदन देऊन बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. संघटनेचा आरोप आहे की, Jio टेलिकॉम अंतर्गत देखभाल काम करणाऱ्या टेक्नीशियनना गेल्या दहा वर्षांपासून किमान वेतन, पगारवाढ, विमा व सामाजिक सुरक्षेसारख्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले आहे.

कामगारांनी सांगितले की, वारंवार लेखी तक्रारी देऊनही व्यवस्थापनाने कानाडोळा केला. उलट कामावरून कमी करण्याच्या व खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याने मागील १०-१२ दिवसांपासून कामबंद आंदोलन सुरू आहे. याचा थेट परिणाम महाराष्ट्रातील जिओ टॉवरच्या देखभाल व्यवस्थेवर झाला असून अनेक भागांत नेटवर्क खंडित होणे, कॉल ड्रॉप व इंटरनेट सेवेतील अडथळे वाढल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून येत आहेत. संघटनेच्या प्रमुख मागण्यांमध्ये बेकायदेशीर कामकाज बंद करणे, किमान वेतनानुसार पगारवाढ, डिझेल जनरेटरच्या नावाखाली होणारी पगार कपात थांबवणे, सुरक्षा किट व अपघाती विमा देणे, कामगारांना कायम करणे आणि आंदोलनकर्त्यांवर कोणतीही कारवाई न करणे यांचा समावेश आहे.टॉवर देखभाल ही दूरसंचार सेवेचा कणा मानला जातो. देखभाल करणारे कामगारच असुरक्षित आणि अस्थिर असतील, तर ग्राहकांना अखंडित सेवा कशी मिळणार, असा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून कामगारांना न्याय द्यावा, तसेच संबंधित कंपनीवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्राहक हित आणि कामगार हक्क या दोन्हींचा समतोल राखत प्रशासनाने त्वरित मध्यस्थी करणे गरजेचे असल्याचे स्पष्ट होत आहे. जवळपास १०० ते १२५ कामगार संघटनेच्या वतीने बेमुदत आंदोलन करीत आहे.

## • वेचक

### पंचायत समिती पांढरकवडाला लेटलतिफशाहीचे ग्रहण

पांढरकवडा - आदिवासीबहुल व दुर्गम भाग म्हणून ओळख असलेल्या पांढरकवडा येथील पंचायत समिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या लेटलतिफशाहीमुळे नागरिकांची कामे खोळंबत असल्याचा आरोप पुढे आला आहे. अनेक अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी न राहता यवतमाळ किंवा इतर ठिकाणांहून ये-जा करत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली असून, मनसेचे तालुका अध्यक्ष अश्विन ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आज (दि. २६ फेब्रुवारी) गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद केल्यानुसार, दुर्गम भागातून आलेले शेतकरी व नागरिक सकाळी १० वाजता कार्यालयात पोहोचतात; मात्र अनेक कर्मचारी १०.३० ते ११ वाजेपर्यंत उपस्थित राहत नाहीत. काही कर्मचारी प्रवासाचे कारण देत अनुपस्थित राहतात किंवा पूर्वसूचना न देता दांडी मारतात, असा आरोप करण्यात आला आहे. परिणामी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचत नसल्याची तक्रार आहे. मनसेने प्रशासनाकडे काही ठोस मागण्या केल्या आहेत. सर्व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी वास्तव्यास बंधनकारक करावे, मुख्यालयी न राहणाऱ्यांचा घरभाडे भत्ता तात्काळ थांबवावा व शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या वेळेवर उपस्थितीसाठी बायोमेट्रिक हजेरी प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. येत्या आठ दिवसांत परिस्थितीत सुधारणा न झाल्यास मनसे आपल्या शैलीत तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

### गर्भपातास मान्यतेसाठी वैद्यकीय मंडळ..! श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे मंडळ स्थापन

यवतमाळ : श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यवतमाळ येथे वैद्यकीय गर्भपात अधिनियम १९७१ च्या सुधारित २०२१ अधिनियमानुसार २४ आठवड्यांपलीकडील वैद्यकीय गर्भपाताला मान्यता देण्यासाठी वैद्यकीय मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.या मंडळाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे अधिष्ठाता असून समितीत क्ष-किरण तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, हृदयरोग तज्ज्ञ, अनुवंश, मानसोपचार तज्ज्ञ आणि मेंदुविकार तज्ज्ञ अशा नऊ तज्ज्ञांचा समावेश आहे. गर्भातील बाळाला काही व्यंग असल्यास गर्भवती महिलींना २४ आठवड्यांपलीकडील वैद्यकीय गर्भपातास मान्यता देण्यासाठी वैद्यकीय मंडळास पाचारण करावे.असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांनी केले आहे.

# युवक सजग तर पर्यावरण सुरक्षित" : डॉ. प्रीती तोटावर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा - शिवरामजी मोघे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित बौद्धिक सत्रात "पर्यावरण संवर्धन व युवकांची भूमिका" या विषयावर डॉ. प्रीती तोटावर, महाराष्ट्र राज्य महिला अध्यक्षा, नैसर्गिक पर्यावरण व मानवता विकास संस्था, यांनी प्रभावी मार्गदर्शन केले.

आपल्या भाषणात डॉ. प्रीती तोटावर म्हणाल्या की, पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची, विशेषतः युवकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. वाढते प्रदूषण, वृक्षतोड, जलसंकट आणि हवामान बदल यांसारख्या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त मोहिमा, पाणी अडवा–पाणी जिरवा उपक्रम आणि जैवविविधतेचे जतन यामध्ये सक्रिय सहभाग घेतल्यास समाजात सकारात्मक बदल घडू शकतो, असे त्यांनी नमूद केले. "आजचा युवक जागरूक असेल तर भविष्यातील भारत हरित आणि समृद्ध राहील," असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याचे आणि इतरांनाही त्यासाठी प्रेरित करण्याचे आवाहन केले. स्पर्धात्मक परीक्षांसाठी तयारी करतानाही पर्यावरण विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन अभ्यास करण्याचा सल्ला त्यांनी दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. योगेश उगले होते. प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. गजानन फुटाणे, डॉ. सुजाता शेंडे आणि डॉ. राहुल दखने उपस्थित होते. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. अमर वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# बाभूळगाव न.प.विषय समितीवर सेना-कॉंग्रेसचे वर्चस्व

## बांधकाम सभापतीपदी मदिना परविन यांची निवड

**जनमाध्यम प्रतिनिधी**



बाभूळगाव - नगर पंचायत विषय समितीची निवडणूक आज गुरूवारी (ता. २६) रोजी स्थानिक नगर पंचायत सभागृहात पार पडली. विषय समितीच्या निवडणूकीत पुन्हा एकदा शिवसेना-कॉंग्रेसने आपले वर्चस्व प्रस्तापित केले आहे. शिवसेना पक्षाचे मदिना परविन शब्बीर खान यांची बांधकाम सभापतीपदी अविरोध निवड झाली. तर पाणी पुरवठा सभापतीपदी उपाध्यक्ष श्याम जगताप, आरोग्य सभापतीपदी शेख कादर (कॉंग्रेस), शिक्षण सभापतीपदी शबाना परविन नईम खान (शिवसेना), महिला व बालकल्याण सभापतीपदी मंजुश्री नंदुरकर (कॉंग्रेस), राष्ट्रवादी मंदाकिनी रमेश मोते उपसभापतीपदी यांची अविरोध निवड झाली आहे.

चार वर्षापूर्वी शिवसेना व कॉंग्रेस पक्षाने एकत्रित येवून महाविकास आघाडी स्थापन केली होती. शिवसेनेकडे नगराध्यक्षपद तर कॉंग्रेसकडे उपनगराध्यक्षपद तसेच समितीचे दोन सभापती सेनेकडे तर दोन सभापतीपद कॉंग्रेसकडे असा सत्तेचा फॉम्यूला त्यावेळेस ठरला होता. त्यानुसार शेवटच्या वर्षीसुद्धा ही महाविकास आघाडी बाभूळगाव शहरात अभेद्य राहीली. पाचव्या वर्षीसुद्धा या दोन्ही पक्षाने आपले निर्वीवाद वर्चस्व कायम ठेवले आहे. पिठासीन अधिकारी म्हणून यवतमाळ उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे यांनी काम पाहिले. तर यावेळी न.प. मुख्याधिकारी डॉ. पल्लवी सोटे, न.प. कर निरीक्षक पवन जतकर यांनी सहकार्य केले. दरम्यान नवनियुक्त विषय समिती सभापती यांचे अभिनंदन करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा संगिता मालखुरे, शिवसेना सत्ताधारी पक्षाचे गटनेते जाकीर खान, नगरसेवक अक्षय राऊत, शेख अहेमद, अमर सिरसाट, लता उत्तम मनवर, रेणूका अंकुश सोयाम, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष रमेश मोते, शिवसेना अल्पसंख्याक यवतमाळ जिल्हा प्रमुख शब्बीर खान, शिवसेना शहर प्रमुख नईम खान, प्रदिप नंदुरकर, अंकुश सोयाम, शिवसेना महिला शहरप्रमुख साधना सहारे, तृप्ती गुंडारे, मनिषा सोयाम, सुनंदा साठवणे, रजनी भागवत, सविता शिंदे, सारिका वाघाडे, मिरा मालखुरे आदींनी अभिनंदन केले.

# मंगलमूर्ती ते उमरखेड रोडवर गतीरोधक टाकण्याची मागणी; नगरपरिषद अभियंत्याचे दुर्लक्ष

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - नगरपरिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक १५ मधील महावीर नगर जैन मंदिर समोरील येत असलेल्या मंगलमूर्ती नगर ते पवननगर-उमरखेड रोड वळणावर जात असलेल्या रस्त्यावर ग्लोबल डिस्ट्रीब्यूटर होलसेल मॉल समोर सतत अपघाताच्या घटना घडत असून उममखेड रोड कडून येणाऱ्या व मंगलमूर्ती नगर कडून जाणाऱ्या वाहनांची फार मोठ्या प्रमाणात स्पीड, वेग असतो त्यामुळे या ठिकाणी अपघात होऊन जीवित हानी होण्याची शक्यता पुन्हा पुन्हा नाकारता येत नाही.

या ठिकाणी ३ फेब्रुवारी २०२६ रोजी ऑटोने जात असलेले सुरोशे परिवार यामधील कु. दिपाली सुरोसे ही दहा वर्षाची मुलगी या वळणावर ऑटो पलटी होऊन जागीच ठार झाली होती त्यामुळे परिसरातील महावीर नगर व पवननगर मधील नागरिकांनी गेल्या दहा ते पंधरा दिवसापासून गतिरोधक तथा स्पीडब्रेकर लावण्याची नगर परिषद मधील अभियंता शुभम आचमारे यांच्याकडे केली आहे. सदर परिसरात पाहता सतत काही ना काही छोट्या-मोठ्या अपघाताच्या घटना घडत आहेत.गेल्या दोन-तीन दिवसापासून शहरातील अनेक रस्त्यावर नवीन रबरी गतिरोधक स्पीड ब्रेकर बसविण्यात आले आहे परंतु मंगलमूर्ती-उमरखेड रोड वरील होत असलेल्या अपघाताच्या घटना पाहता या ठिकाणी तात्काळ बसविणे गरजेचे होते परंतु अद्याप पर्यंत नगरपरिषद बांधकाम विभागामार्फत गतिरोधक बसविण्यात आले नाही.त्यामुळे या रस्त्यावर नगरपरिषद बांधकाम विभागामार्फत गतीरोधक तथा स्पीड ब्रेकर टाकण्यात यावे जेणेकरून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची गती कमी होऊन अपघाताच्या घटना घडणार नाही अशी परिसरातील नागरिकांची मागणी आहे. अन्यथा नगर परिषद समोर आंदोलन करण्याचा इशारा काही सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# वणीत अमली पदार्थांचा विळखा..!

## तरुण पिढी वाचवा आमदार संजय देरकर यांचा विधानसभेत सरकारला इशारा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



वणी - महाराष्ट्र विधानसभेच्या चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात वणी मतदारसंघाचे आमदार संजय देरकर यांनी आपल्या भागातील ज्वलंत प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले.वणी परिसरातील अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याबद्दल अत्यंत चिंता व्यक्त करत त्यांनी या प्रश्नाला प्रथम प्राधान्य दिले. मतदारसंघातील तरुण पिढी अमली पदार्थांच्या सेवनामुळे आणि अवैध व्यापारामुळे उद्ध्वस्त होत असून, प्रशासनाने यावर तातडीने बंदी घालून कठोर कारवाई करावी,असे त्यांनी सभागृहात स्पष्टपणे बजावले. अमली पदार्थांचा हा वाढता धोका रोखण्यासाठी सरकारने युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली.

अमली पदार्थांच्या मुद्द्यासोबतच आमदार देरकर यांनी बळीराजा आणि आदिवासी बांधवांच्या मागण्यांसाठीही सरकारला साकडे घातले.झरी जामणी तालुक्यातील आदिवासी बांधवांच्या भावनांना वाचा फोडताना त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांचे भव्य स्मारक उभारण्याची मागणी केली. केवळ स्मारकाची घोषणा न करता त्यासाठी अर्थसंकल्पात आवश्यक निधीची तरतूद करण्याची सूचनाही त्यांनी केली. शेतकरी प्रश्नांवर बोलताना त्यांनी वणी आणि मारेगाव तालुक्यात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली. तसेच,'कॉटन सिटी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वणीत सीसीआयची कापूस खरेदी केंद्रे बंद असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत असून, ही केंद्रे तातडीने सुरू करण्याची मागणी त्यांनी लावून धरली. विकासाच्या मुद्द्यांवर भर देताना आमदार देरकर यांनी वणी मतदारसंघासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतुदी करण्याची मागणी केली. यामध्ये वणी येथे सुसज्ज 'स्मार्ट रुग्णालय' उभारणे, शासकीय विश्रामगृह व पोलीस कर्मचारी निवासस्थानांचे आधुनिक बांधकाम करणे आणि शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा किमान १० तास अखंडित वीज पुरवठा करणे या मागण्यांचा समावेश आहे. वणी मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि तरुण पिढीच्या भविष्यासाठी सरकारने या मागण्या गांभीर्याने घ्याव्यात, असे आग्रही आवाहन आमदार संजय देरकर यांनी आपल्या भाषणातून केले.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/१८८/२०२५
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- ०९/०२/२०२६

जाहीरनामा

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **नजीबखॉन अब्बास खान रा. उमरखेड यांनी त्यांचे स्व:ताचे नामे नजीबखॉन अब्बास खान मौजा** उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** १६.०६.१९८५ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक १०/०३/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा.
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# बाबासाहेब नाईक अभियांत्रिकीत गेटी उत्साहात साजरी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - स्थानिक बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयात दि.२० फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी दरम्यान सांस्कृतिक मेळावा गेटी -२६ उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य डॉ. अविनाश वानखडे तर प्रा. प्रदीप दुधाट, प्रभारी,स्टुडंट्स अफेअर व प्रा. के एम पुनवटकर ,प्रभारी, विद्यार्थी मंडळ मंचावर उपस्थित होते.

उत्कृष्ट अभियंता होताना भविष्यातील करिअरसाठी व नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी अशा संस्कारक्षम सांस्कृतिक व्यासपीठाचा वापर स्वतःच्या सर्वांगीण विकासासाठी करणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत डॉ. अविनाश वानखडे यांनी यावेळी व्यक्त केले. महाविद्यालयातील सोनेरी दिवस परत येत नसतात आणि म्हणूनच या संधीचा फायदा घेऊन सर्वांनी या व्यासपीठाचा वापर जीवनातील आठवणीच्या क्षणासाठी करावा आणि भावनिक अभिव्यक्तीसह आत्मविश्वास वाढवावा, असे ते पुढे म्हणाले. संस्कृतिक मेळाव्यात नृत्य स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, संगीत नाटिका, ट्रॅडिशनल डे, ग्रुप डे , फन फेअर, तांत्रिक व कला प्रदर्शनी, रांगोळी व पोस्टर मेकिंग, कुकिंग विदाऊट फायर व न्युज पेपर ड्रेस मेकिंग अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उस्फूर्त व उदंड प्रतिसाद लाभला. या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित छावा हा संगीतमय जीवनपट सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला यातील सर्वांचा अभिनय व नृत्य यांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले.

# महात्मा फुले जन आरोग्य योजनाच्या नावाखाली आर्थिक लूट

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - शासनाच्या महत्त्वाकांक्षी आरोग्य उपक्रमांपैकी एक असलेल्या महात्मा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत गरजू रुग्णांना मोफत व गुणवत्तापूर्ण उपचार मिळावेत, हा उद्देश असताना याच योजनेच्या नावाखाली काही खासगी रुग्णालयांत रुग्णांच्या नातेवाईकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे धक्कादायक आरोप पुढे येत आहेत. रुग्ण मोरेश्वर गुलाब इंगोले यांच्यावर या रुग्णालयामध्ये उपचार करण्यात आला मात्र रुग्णाला सुट्टीच्या नंतर मेडिसिन घेताना आर्थिक निवडणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे.

यवतमाळ येथील नामवंत आर्थो तज्ज्ञ डॉक्टर यांच्या रुग्णालयात योजनेचा पूर्ण लाभ न देता अतिरिक्त खर्च वसूल केला जात असल्याची तक्रार अनेक रुग्णांच्या नातेवाईकांनी केली आहे. शासनाकडून उपचारांचा खर्च थेट रुग्णालय व्यवस्थापनाला दिला जात असतानाही औषधे, तपासण्या व इतर कारणांखाली रोख रक्कम उकळली जात असल्याचा आरोप आहे. नियमांनुसार रुग्णांना डिस्चार्जवेळी सात दिवसांची औषधे मोफत देणे अपेक्षित असताना दहा दिवसांच्या औषधांचा खर्च थेट नातेवाईकांकडून घेतला जात असल्याचे सांगितले जाते. एवढेच नव्हे तर रुग्णालयातील समन्वयकांच्या जागी कथितरित्या गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींचा वापर करून नातेवाईकांना दमदाटी, अभद्र भाषा आणि मानसिक छळ केल्याच्या तक्रारीही पुढे आल्या आहेत. यवतमाळ जिल्हा आधीच शेतकरी आत्महत्यांनी ग्रस्त आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, मजूर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे उपचारासाठी या योजनेवर अवलंबून आहेत. अशा परिस्थितीत योजनेच्या नावाखालीच आर्थिक लूट होत असल्यास ही बाब केवळ गैरप्रकार नसून सामाजिक अन्याय ठरतो. शासनाने या प्रकरणाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित रुग्णालयाच्या कागदपत्रांची, बिलांची व औषध पुरवठ्याची तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. आरोग्य विभाग, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय व योजनेचे प्राधिकरण यांनी संयुक्त कारवाई करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा "मोफत उपचार" ही केवळ कागदी घोषणा ठरेल.सामान्य नागरिकांचा प्रश्न स्पष्ट आहे.

# राळेगावात अरुंद रस्त्याचा बळी; हायड्रा क्रेनच्या धडकेत ६० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

राळेगाव - शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग 361 बी च्या बांधकामादरम्यान चुकीचे नियोजन, अरुंद रस्ता आणि अवजड वाहनांच्या वाढत्या बेफाम वेगामुळे आज पुन्हा एक निष्पाप जीव गमवावा लागला. शहरातील संत कृपा मंगल कार्यालयासमोर दुपारी घडलेल्या भीषण अपघातात ६० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. मृत व्यक्तीचे नाव विलास कवडुजी राऊत (वय ६०, रा. तिरझडा, ता. कळंब, जि. यवतमाळ) असे असून ते कौटुंबिक कार्यक्रमानिमित्त रावेरी येथे आले होते. कार्यक्रम आटोपून ते संत कृपा मंगल कार्यालयासमोरील राळेगाव–वडकी मार्गावरून दुपारी अंदाजे २.४५ वाजताच्या सुमारास पायी जात असताना वडकीकडून येणाऱ्या हायड्रा क्रेन (क्र. MH29CJ0818) ने त्यांना जोरदार धडक दिली. अपघात इतका गंभीर होता की त्यांच्या कमरेला व गुप्तभागावर गंभीर दुखापत झाली. स्थानिक नागरिकांनी तातडीने त्यांना ग्रामीण रुग्णालय, राळेगाव येथे हलविले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी मृतकाचे जावई संदिप गणपतराव भुडे यांनी राळेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. अप नं. ९७/२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २८१ व १०६ (१) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून संबंधित क्रेन चालकाविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. पोलिसांनी पुढील तपास हाती घेतला आहे. नागरिकांचा संताप; सुरक्षिततेची मागणी पुन्हा ऐरणीवर राष्ट्रीय महामार्ग 361 बी हा राळेगाव शहराच्या मध्यवर्ती भागातून जात असल्याने दररोज अवजड वाहने, क्रेन, ट्रक यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते.

# बळीराजाला अवकाळीची धास्ती, रब्बी सोंगणीला वेग

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

जिल्हासह परिसरात गेल्या दोन-तीन दिवसांपासून ढगाळ हवामानामुळे रब्बी हंगामातील हरभरा, तूर व गहू पिकाच्या सोंगणीला वेग आला आहे. आसेगाव परिसरासह हिवरा पूर्णा, टाकरखेडा पूर्णा, विरूळ पूर्णा ,चिंचोली, कृष्णापुर, लसणापूर धानोरा व कोट गावंडी गावांतील शेतकरी संभाव्य अवकाळी पावसाच्या धास्तीने शेतात सकाळपासूनच लगबगीने काम करतानाचे चित्र दिसून येत आहे.




यंदा या भागात हरभरा व गहू पिकाची स्थिती समाधानकारक आहे. हरभऱ्याचे गाठे सुकण्याच्या अंतिम टप्प्यात असून, गव्हाच्या ओंब्यात दाणे भरलेले आहेत. मात्र, अचानक बदललेले हवामान, ढगाळ वातावरण व थंड वाऱ्यामुळे पिकांवर ओलसरपणाचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशा स्थितीत अवकाळी पाऊस झाल्यास उत्पादनात घट येण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने शेतकरी सतर्क झाले आहेत.

आसेगाव, विरूळ पूर्णा व चिंचोली परिसरात हरभऱ्याची सोंगणी सुरू आहे. तर मागील पेरणी केलेल्या तुरीची कापणी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. अनेक शेतकऱ्यांनी मजूर लावून सोंगणीची कामे वेगात सुरू केली आहे. कापणी केलेल्याची शेतात गंजी लावली असून शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवण्यावर भर दिला आहे. सध्या शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

बाजारभावात स्थिरता राहावी आणि शासकीय खरेदी केंद्रे वेळेत सुरू करावीत, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकरी वेळेआधी सोंगणी पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आहेत.

संभाव्य नुकसान टाळण्यासाठी धावपळ सुरू असलेल्याचे एकंदरीत चित्र परिसरात दिसून येत आहे.

# मुलांच्या 'डिजिटल व्यसना'ची सरकारकडून दखल



**मुंबई-** राज्यातील मुलांमध्ये वाढत चाललेल्या डिजिटल अंतर्गत व्यसनाच्या समस्येची गांभीर्याने दखल घेत महाराष्ट्र देश शासनाने तज्ज्ञांची विशेष टास्क फोर्स नियुक्त कूण करण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील अधिवेशनाच्या बांची आत या टास्क फोर्सचा सविस्तर अहवाल सादर केला बाली जाईल, अशी माहिती ॲड. आशिष शेलार यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे आणि संजय केणकर यांनी लक्षवेधीद्वारे मुलांमधील वाढते ही डिजिटल व्यसन आणि त्याचे दुष्परिणाम याकडे सरकारचे लक्ष वेधले. मंत्री शेलार यांनी सांगितले की, माहिती तंत्रज्ञान हे विभागाचे प्रधान सचिव विरेंद्र सिंह यांना २ फेब्रुवारी रोजी लेखी पत्राद्वारे तज्ज्ञांची टास्क फोर्स स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यात १८ वर्षांखालील सुमारे चार कोटी मुले असून त्यापैकी जवळपास तीन कोटी मुले १५ वर्षांखालील आहेत.त्यामुळे त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याचा प्रश्न अत्यंत गंभीर असून शासन याबाबत कटिबद्ध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच या विषयावर सखोल

## पुढील अधिवेशनात अहवाल सादर होणार

अभ्यासानुसार राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील मुलांमध्ये गेमिंग डिसऑर्डर' मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पाच समुपदेशन केंद्रांमध्ये येणाऱ्या प्रत्येक दहा प्रकरणांपैकी तीन प्रकरणे गेमिंग व्यसनाशी संबंधित आहेत. विविध शाळांमध्ये घेतलेल्या इंटरनेट डिपेंडन्सी स्केल' चाचणीत सुमारे ४० टक्के मुलांमध्ये मध्यम ते तीव्र स्वरूपाचे गेमिंग व्यसन आढळले आहे.

## मानसिक व शारीरिक दुष्परिणाम

डिजिटल व्यसनामुळे मुलांमध्ये चिडचिडेपणा, शैक्षणिक प्रगतीत घट, सामाजिक अलिप्तता, यांसारख्या फॅटम व्हायब्रेशन सिंड्रोम, चिंता व नैराश्य समस्या वाढत आहेत. तसेच टेक-नेक, डोळ्यांवरील ताण, झोपेचे बिघडलेले चक्र आणि वाढता लठ्ठपणा यां त्रासही दिसून येत आहेत.

चर्चा करण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. रिस्पॉन्सिबल नेटिझम संस्थेच्या अभ्यासाचा उल्लेख करताना मंत्री शेलार म्हणाले की, जागतिक गेमिंग बाजारपेठेची उलाढाल २०० अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक आहे. मोबाईल गेम डाउनलोडमध्ये भारत पहिल्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात स्मार्टफोनचा वाढता वापर लक्षात घेता २०२७ पर्यंत देशांतर्गत गेमिंग उद्योग ८.६ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

# सामाजिक न्यायच्या राज्यस्तरीय स्पर्धेत अमरावती विभागाला सर्वसाधारण विजेतेपद

**अमरावती/का.प्र.**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या छत्रपती संभाजीनगर येथील राज्यस्तरीय क्रीडा व कला स्पर्धेत अमरावती विभागाने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले.



अमरावती विभागाच्या टेबल टेनिस महिलामध्ये प्रथम क्रमांक स्नेहल काळवाघे, बॅडमिंटन पुरुष दुहेरी मध्ये निरज चारोळे, प्रथम डुलगज, गोळा फेक महिलामध्ये प्रथम रुपाली अपराजित, गोळा फेक पुरुषमध्ये प्रथम ज्ञानेश्वर साळवे, कबड्डी पुरुष गटात अमरावती विभाग प्रथम, व्हॉलीबॉल महिला गटात अमरावती विभाग प्रथम, रस्सीखेच महिला गटात अमरावती विभाग प्रथम, क्रिकेट पुरुष व महिला गटात प्रथम क्रमांक, समूह नृत्य अमरावती विभाग प्रथम, भूमिका अभिनयात शिवचरित्र्य सादरीकरणामध्ये अमरावती विभाग प्रथम ठरला आहे. तसेच प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांनी अभिनयामध्ये साकारलेली राजमाता जिजाऊची भूमिका अत्यंत प्रभावी ठरली. शिखा गरकल-केदार हिने बालशिवाजी, पवन साबळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमिका साकारली. अमरावती विभागाच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सामाजिक न्याय विभागाचे सचिव हर्षदिप कांबळे, आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे यांनी स्वागत केले आहे.

# अनंत सोमवंशी भारतीय विद्या मंदिर संस्थेच्या कोषाध्यक्षपदी

**अमरावती-**भारतीय विद्यामंदिर या शिक्षण संस्थेच्या कार्यकारिणीची निवडणूक नुकतीच पार पडली या निवडणुकीत संस्थेच्या कोषाध्यक्षपदी अनंत पुरुषोत्तम सोमवंशी यांची निवड करण्यात आली.शिक्षण क्षेत्रात अत्यंत नामांकित असलेल्या भारतीय विद्यामंदिर या शिक्षण संस्थेची स्थापना १९५८ मध्ये करण्यात आली होती. २०२६ ते २०२९ या वर्षासाठी संस्थेच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे.



या निवडीमध्ये संस्थेच्या कोषाध्यक्षपदी अनंत पुरुषोत्तम उर्फ बाबासाहेब सोमवंशी यांची निवड करण्यात आली. अनंत सोमवंशी हे माजी आमदार स्व.बाबासाहेब सोमवंशी यांचे सुपुत्र आहेत. या निवडीबद्दल त्यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन केल्या जात आहे.

## संक्षिप्त



### पाली आणि बुद्धिझम विभागात संत गाडगे महाराज जयंती

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पालि आणि बुद्धिझम विभागात संत गाडगे बाबा यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. कल्पना डोंगरे तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. टी. बी. रामटेके होते. महापुरुषांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रास्ताविक आयु. अनिल हिरेखण यांनी केले. नंतर गाडगेबाबांच्या जीवनावर, कार्यावर प्रकाश टाकणारी भाषणे झालीत. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. टी बी. रामटेके तसेच प्रा. अनिता निरगुळे, प्रा. कल्पना पाटील, प्रा. एस कुमार मेश्राम, प्रा. डॉ. कमलाकर गोवर्धन, प्रा. सपना मेश्राम यांनी तसेच भाग १ व भाग २ चे विद्यार्थ्यांमध्ये अशोक भोरे, सुधाकर पाटील, ॲड. महेंद्र तायडे, द्रौपदी मोहोड, वैशाली कोटांगळे, डी. व्हि. रोकडे यांनी आपले विचार व्यक्त केले.देविदास मेटांगे यांनी गाडगेबाबांवर पोवाडा सादर करून सर्वांची मने जिंकली.प्रा. कल्पना डोंगरे यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली.संचालन ॲड. अरुण कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन बाबुलाल सिरसाट यांनी केले.

### प्रा.उल्हास घारड आचार्य पदवीने सन्मानित

**अमरावती-**येथील न्यू श्याम नगर, पोस्ट व्ही. एम. व्ही. राहणारे



प्राध्यापक उल्हास मनोहर घारड यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे 'अर्थशास्त्र' या विषयात आचार्य पदवी पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. प्राध्यापक उल्हास घारड यांनी डॉ. जयराम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,अमरावती येथील संशोधन केंद्र अंतर्गत 'अमरावती महसूल विभागांमध्ये भारतीय आयुर्विमा महामंडळाने केलेल्या गृहनिर्माण कार्याचे आर्थिक अध्ययन- कालखंड २०१०- ११ ते २०२०- २१' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. त्यांच्या यशाचे श्रेय त्यांनी संशोधन मार्गदर्शक डॉ. जयराम गायकवाड,डॉ. किशोर साबळे, डॉ. महेंद्र मेटे, डॉ.भारती तसेच स्वर्गीय आई-वडील मंदाबाई मनोहर घारड, पत्नी शीतल घारड, मुलं श्रीपाद व अर्णव,सासू-सासरे भीमराव खाडे,सुनंदा खाडे,अनिकेत खाडे व पद्मा खाडे यांना दिले. त्यांचे सर्वत्र सत्कार मित्रमंडळी व नातेवाईकतर्फे करण्यात येत आहे.

# डॉ.उज्ज्वला टांक देहदान कुटुंब रत्न पुरस्काराने सन्मानित

## गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सन्मान सोहळा

**अंजनगाव सुजी/वार्ताहर**

अंजनगाव शहरातील टांक हॉस्पिटल च्या संचालिका डॉ उज्ज्वला राजेंद्र टांक यांना देहदान कुटुंब रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.संत गाडगेबाबांच्या १५० व्या जयंती निमित्त कापुसतळणी येथे श्री संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने मरणोत्तर देहदान केलेल्या कुटूंबातील व्यक्तीच्या कुटुंबांना देहदान कुटुंब रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



डॉ उज्ज्वला टांक यांचे वडिल स्वर्गिय उमेशराव ढोक यांचे २०२४ रोजी वृद्धकाळाने निधन झाले होते. त्यानी हयात असताना त्यांचे देहदान केले होते. 'मरावे परी कीर्तीरुपी उरावे' या उक्तीप्रमाणे देहदान आणि अवयवदान करून समाजासमोर एक आदर्श स्वर्गिय ढोक यांनी ठेवला होता त्यामुळे या देहदान कुटुंबातील व्यक्तींचा देहदान कुटुंब रत्न पुरस्कार श्री संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था कापुसतळणी यांच्या द्वारे प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अरुण शेवाणे व धर्म पत्नी लता शेवाणे यांनी सुद्धा मरणोत्तर देहदानाचा अर्ज भरून संकल्प केला.अध्यक्षस्थानी ॲड सुदेश मोरे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. दिलीप काकडे सह आदी मान्यवर उपस्थित राहुन देहदान व अवयव संबंधित विस्तृत शास्त्रीय माहिती नागरिकांना दिली.देहदान कुटुंब रत्न पुरस्कार प्राप्त डॉ उज्ज्वला राजेंद्र टांक किशोर सावरकर, तीर्थराज बिजेवार, प्रशांत निमकाळे, ओमप्रकाश काळमेघ,रजनी शेरकर, सत्यपाल महाराज,जया मोहळकर,सरोज भगत, अशोक खडगे, राजेंद्र साऊरकर, मीना मांडळे, शकुंतला निलंगे विशाल मंगळे कविता पवार,नरेश कुऱ्हेकर, अंजली गुडधे, प्रतीक्षा दापुरकर संदेश कुचेरिया डॉ रंजीत पानझाडे यांनी संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष अरुण शेवाणे यांचे आभार मानले.

# भजनातूनच दिला स्वच्छता व मानवतेचा संदेश-अशोक शेंडे



**टाकरखेडा संभू -** संत राजेश्वर माऊली वाचनालयाच्या वतीने संत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार अशोकराव शेंडे यांनी मार्गदर्शन करताना संत गाडगेबाबांच्या कार्याचा गौरव करत समाजप्रबोधनाचा संदेश दिला.अशोकराव शेंडे म्हणाले की, संत गाडगेबाबांनी 'गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला' या भजनातून समाजाला खरी दिशा दिली. त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि अंधश्रद्धेपासून दूर राहण्याचा संदेश दिला. 'देव दगडात नसून माणसात आहे, त्यामुळे माणुसकी जपा,' हा त्यांचा मूलमंत्र आजही तितकाच प्रेरणादायी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.या कार्यक्रमाला पौर्णिमा ताई सवाई यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महादेव लांडगे, विकास फरकुंडे, विजय राव सवाई, संतोष लाडे, रेखा ताई पटले, शालिनी मेश्राम, कपिल मेश्राम, सपना मेश्राम, शोभा फरकुंडे, कुसुम मेश्राम, पियुष मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान संत गाडगेबाबांच्या विचारांचे वाचन व अभिवाचन करण्यात आले. उपस्थितांनी मानवता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्पही केला.

# मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने विद्यापीठात आज व्याख्यान

**अमरावती/प्रतिनिधी**

मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पदव्युत्तर मराठी विभाग आणि विदर्भ साहित्य संघ शाखा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात होणार आहे.कार्यक्रमात 'महाभारतातील कृष्ण' या विषयावर अभ्यासक डॉ. विनोद कोलवाडकर (अमरावती) मार्गदर्शन करणार आहेत. भारतीय महाकाव्य परंपरेतील महाभारत हा ग्रंथ मानवी मूल्ये, धर्म-अधर्माचा संघर्ष, नैतिकता आणि तत्त्वचिंतन यांचे गहन दर्शन घडवतो. त्यातील कृष्ण ही व्यक्तिरेखा केवळ धार्मिक प्रतीक नसून एक कुशल राजकारणी, तत्त्वज्ञ, कर्तृत्ववान मार्गदर्शक आणि मानवी मनाचा अभ्यास करणारी बहुआयामी प्रतिमा म्हणून ओळखली जाते. या अनुषंगाने होणारे व्याख्यान विद्यार्थ्यांसह साहित्यप्रेमींसाठी ज्ञानवर्धक ठरणार आहे.

# 'मंथन' अंतर्गत कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

डॉ. विक्रम वानखडे संचलित अंतर्मन माईंड केअर सेंटर यांच्या वतीने आयोजित 'मंथन' एकदिवसीय क्लिनिकल सायकॉलॉजी कार्यशाळा आय.एम.ए.हॉल, अमरावती येथे उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या झाली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. श्रीकांत देशमुख तसेच ख्यातनाम समुपदेशक डॉ. मोहना कुळकर्णी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या सुरुवातीलाच अमरावतीचे प्रसिद्ध समुपदेशक पंकज वसाडकर यांनी आर.ई.बी.टी. या अत्यंत प्रभावी थेरपी पद्धतीवर सखोल मार्गदर्शन केले. क्लिनिकल प्रॅक्टिसमध्ये आरईबीटीचा उपयोग कसा करावा, रुग्णांच्या नकारात्मक विश्वासांना आव्हान देण्याची प्रक्रिया कशी असते, याविषयी त्यांनी उदाहरणांसह मार्गदर्शन केले.यानंतर नागपूरचे प्रख्यात मानसोपचार तज्ज्ञ डॉ. मौसम फिरके यांनी सायकोडायनॅमिक थिअरीवर अत्यंत सखोल व विश्लेषणात्मक विवेचन केले.



त्यांनी अचेतन मन, व्यक्तिमत्त्वाची रचना, संरक्षण यंत्रणा आणि थेरपी प्रक्रियेत सायकोडायनॅमिक दृष्टिकोनाचे महत्त्व स्पष्ट केले.

तक्षशिला चाइल्ड कौन्सिलिंग सेंटर, भोपाळच्या प्रमुख रोली शर्मा यांनी लहान मुलांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी प्ले थेरपी या विषयावर विविध केस स्टडीजच्या आधारे सखोल मार्गदर्शन केले.सी.आर.सी. नागपूरच्या मुख्य प्रशिक्षक डॉ. अपर्णा भालेराव यांनी बुद्धिमत्ता चाचण्या या विषयावर प्रकाश टाकला. बुद्धिमत्ता मोजण्याच्या विविध पद्धती, ‍ चाचण्यांचे प्रशासन, स्कोरिंग, इंटरप्रिटेशन आणि अहवाल लेखन याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. महात्मा फुले महाविद्यालय, अमरावती येथील सायकॉलॉजी विभागप्रमुख गजानन रत्नपारखी यांचीही कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभली.

अमरावती, अकोला व वाशिम जिल्ह्यातील सुमारे ५० विद्यार्थी, समुपदेशक व सायकॉलॉजी क्षेत्रातील व्यावसायिकांनी कार्यशाळेत सक्रिय सहभाग नोंदवला. आयोजन समिती मध्ये नेहा उमरे, झुबेर खान, अभिजीत खंडारे,

प्रतिक्षा वानखडे यांचा महत्त्वाचा सहभाग होता. उत्कृष्ट नियोजन, तज्ज्ञांचे सखोल मार्गदर्शन आणि सहभागींना मिळालेला व्यावहारिक अनुभव यामुळे 'मंथन' कार्यशाळा ही ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली. भविष्यातही अशा दर्जेदार उपक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

# 'साहित्याचे पुनरावलोकन :नवे आयाम, नवा दृष्टिकोन' एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती व्दारा संचालित श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथे २८ फेब्रुवारी २०२६ रोजी साहित्याचे पुनरावलोकन: नवे आयाम, नवा दृष्टिकोन ( मराठी, इंग्रजी हिंदी, व संगीत) भाषा विभागाच्या वतीने आयोजित करण्यात येत आहे.

आधुनिक काळातील बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित वास्तवाच्या पार्श्वभूमीवर साहित्याचा पुनर्विचार आवश्यक असल्याने 'साहित्याचे पुनरावलोकन : नवे आयाम, नवा दृष्टिकोन' या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. साहित्य हे समाजाचे आरसे असून काळानुसार त्याचे स्वरूप बदलत जाते. डिजिटल युगात नवमाध्यमे, नव्या पिढीचे अनुभव, स्त्रीवादी व उपेक्षित घटकांचे लेखन, तसेच भाषांतर साहित्य यांमुळे साहित्याला नवे आयाम प्राप्त झाले आहेत. इंग्रजी मराठी, हिंदी आणि इतर भारतीय भाषांतील साहित्य नव्या दृष्टिकोनातून अभ्यासण्याची गरज आहे.

परिषदेतील विविध सत्रांमध्ये मराठी, इंग्रजी आणि हिंदी साहित्याच्या पुनरावलोकनावर सखोल चर्चा व्हावी याकरीता साहित्यश्री. डॉ.बापूराव देसाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव हे बीज भाषण करतील. प्रथम सत्रामध्ये डॉ.विजया डबीर , डॉ.रमेश अंधारे




, डॉ मोना चिमोटे तर द्वितीय सत्रामध्ये डॉ. निलेश तारे, डॉ. अजय देशमुख, डॉ. पौर्णिमा दिवसे हे 'New Voices, New Visions' या संकल्पनेतून तरुण लेखकांच्या लेखनप्रवृत्ती, सामाजिक माध्यमांचा साहित्यावर होणारा प्रभाव, आणि जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर भारतीय साहित्याची ओळख या विषयांवर विचारमंथन करतील. या परिषदेकरीता दोनशे सहभागी संशोधकांनी आपल्या संशोधनपत्रांद्वारे नव्या साहित्यप्रवाहांची मांडणी केली आहे. दलित साहित्य, स्त्री साहित्य, आदिवासी साहित्य आणि पर्यावरण विषयक लेखन , साहित्याचे मूल्य केवळ सौंदर्यदृष्टीपुरते मर्यादित नसून ते समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याने बदलत्या काळात साहित्यिकांनी नव्या संवेदनशीलतेने लेखन करणारे शोधनिबंध आहेत, परिषद आयोजित करण्यामागील आयोजक प्राचार्य डॉक्टर अंबादास कुलट व संयोजन समिती यांचा उद्देश विद्यार्थ्यांना संशोधनाभिमुख दृष्टिकोन विकसित व्हावा असा आहे. साहित्य आणि तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्जनशील लेखन, तसेच जागतिक संदर्भातील भारतीय साहित्य या विषयांवर विशेष सत्रे आयोजित करण्यात येणार आहे. यामुळे परिषदेचा शैक्षणिक दर्जा उंचावेल. या परिषदेच्या माध्यमातून साहित्याच्या नव्या दिशा आणि शक्यता उलगडून दाखविण्यात येतील, तसेच तरुण संशोधकांना नवचिंतनाची प्रेरणा मिळेल, अशी आशा आहे.

एकूणच, 'साहित्याचे पुनरावलोकन : नवे आयाम, नवा दृष्टिकोन' ही राष्ट्रीय परिषद साहित्यविश्वासाठी विचारप्रवर्तक ठरेल . नव्या साहित्यदृष्टीचा पाया अधिक मजबूत करण्यास ती उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास आहे. हिंदी मराठी, इंग्रजी व संगीत विषयातील साहित्यातील विविध प्रवाह , विविध साहित्य प्रकार यांचा नवीन आयाम व नवीन दृष्टिकोनातून साहित्याच्या बदलत्या प्रवाहांचा आढावा घेत, युवा संशोधक अभ्यासक यांच्यामध्ये साहित्याचा सामाजिक ,आधुनिक, मानसशास्त्रीय दृष्टिकोन विकसित व्हावा आणि वर्तमान स्थितीत साहित्याचे पुनरावलोकन करीत लेखन, वाचन परंपरा अधिक समृद्ध होईल. या परिषदेचे अध्यक्ष दिलीपबाबू इंगोले कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती आहे. उद्घाटक गजानन पुंडकर, उपाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती आणि बीजभाषक डॉ. बापूराव देसाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव असतील. प्रमुख उपस्थितीमध्ये सुरेश खोटरे सदस्य ,श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती आणि डॉ. मोना चिमोटे, अधिष्ठाता मानव विज्ञान विद्याशाखा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती राहतील. विविध विद्यापीठांतील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी आणि साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविवा आणि परिषदेचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक प्राचार्य डॉ.अंबादास कुलट व महाविद्यालयाच्या वतीने करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांसाठी ज्ञानरूपी फुलातील मकरंद - प्रा. डॉ. हेमंत देशमुख

**या** पृथ्वीवर आपला जन्म ते मृत्यू यामधला काळ म्हणजे आपले आयुष्य.निसर्गसृष्टीच्या या चक्रामध्ये काळ व वेळ हा कधी विश्रांती घेत नाही. या आयुष्यामध्ये काही लोक जीवनातल्या गेलेल्या वेळेचाच जास्त विचार करतात, काही लोक वर्तमानातील वेळेचाच विचार करतात तर काही लोक फक्त भविष्याचाच विचार करतात.पण खूप कमी लोक असे असतात की, जे जीवनात विशिष्ट दिवशी (अर्थात जन्मदिवशी/वाढदिवशी) स्मरण करतात की मागील वाढदिवसाला मी काही सकारात्मक संकल्प केले होते यामध्ये कितपत यश प्राप्त झाले आहे व आजच्या वाढदिवशी मी भविष्याचा वेध घेऊन काय काय संकल्प करायचे हे मनात ठरवतात व हे संकल्प पूर्ण करण्याची स्फूर्ती किंवा ऊर्जा आपणास ईश्वराकडून मिळावी यासाठीच असे लोक आपल्या ईश्वराला स्मरून वाढदिवस साजरा करताना दिसतात. अशा काही मोजक्या लोकांच्या मध्ये मला अनुभवास आलेले व्यक्तिमत्व म्हणजे माझे गुरुवर्य प्रा. डॉ. हेमंतराव मुरलीधर देशमुख.



आज २७ फेब्रुवारी सरांचा वाढदिवस. सरांना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा.ज्यावेळी मी शिवाजी महाविद्यालय अमरावतीला महाविद्यालयीन शिक्षण घेत होतो त्यावेळी इंग्रजी किंवा संस्कृत मधील शब्दापेक्षाही कठीण वाटणारा शब्द सरांकडून कानावर येऊ लागला तो शब्द होता संगणक. अशा कठीण विषयाला आम्हाला लाभलेले प्राध्यापक होते प्रा. डॉ. हेमंत देशमुख सरांनी हा विषय आम्हाला खूप सोपा करून शिकवला. याला महत्त्वाचे कारण होते सरांचा स्वभाव आणि शिकवण्याची एक आगळीवेगळी पद्धत. आम्ही बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण भागातले होतो. पण सरांच्या स्वभावामुळे आम्हाला हा विषय आवडीचा लागला. सर कठीण भाग साध्या बोलण्यातून कृतीतून समजावत असत, कधीकधी नाजूक, मुलायम बोटांनी अलगद संगणकाच्या बटनावर (किबोर्डवर) आम्हाला समजवत.पण कधी कधी सर प्रसंग पाहून हाताच्या बोटामध्ये कठोर शब्दाची हातोडी घेऊन कठोर शाब्दीक घाव टाकून समजवत असत. जे विद्यार्थी ज्ञान घेण्यास उत्सुक आहेत त्यांना परिपूर्ण ज्ञान द्यायचे पण जे विद्यार्थी काम चुकारपणा करत किंवा कंटाळा करायचे त्यांच्यासाठी सर कठोरही बनायचे.अशावेळी संत तुकाराम महाराज यांच्या ओळी आठवतात.

*'भले तरी देऊ*
*कासेची लंगोटी*
*नाठाळाचे माती*
*देवू काठी'*

आजपर्यंत सरांच्या वागण्यातून बोलण्यातून व आचरणातून असे दिसून येते की, प्रत्येक वाढदिवशी सर जेजे संकल्प करतात त्यामध्ये समाजहित, विद्यार्थीहीत यांचा समावेश असतो. हे संकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांनी वेळ दिवस ठरवलेला असतो. येणारा त्यांचा वाढदिवस म्हणजेच संकल्प पूर्ण करण्याची वेळ बारा महिन्याचा असतो. सरांना प्रामाणिकपणा खूप आवडतो. म्हणून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ओळी आठवतात.

*नको उगीच अवडंबर*
*आपले जीवन करावे सुंदर*
*गावी फुलवावे सुखाचे अंकुर*
*हेचि कर्तव्य मानवाचे'*

सरांच्या स्वभावामुळे, प्रामाणिकपणामुळे, कर्तव्य निष्ठतेमुळे तत्त्वनिष्ठतेमुळे आज वेगवेगळ्या समाजहिताच्या चळवळीमध्ये किंवा ग्रुपमध्ये सरांचा आवर्जून सहभाग दिसून येतो.दाखवलेल्या दिशेवर चालताना मी सदैव सरांचा आशीर्वाद माझ्या पाठीवर आहे असे समजतो व त्यांचाच आशीर्वाद रुपी प्रसाद म्हणून मी आज एका विद्यालयाचा व कनिष्ठ महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून कर्तव्यनिष्ठा बाळगून विद्यार्थी विकास हाच केंद्रबिंदू मानत आहे.सरांचा आशीर्वाद रुपी हात माझ्या पाठीवर असावा यासाठी एक कविता समर्पित करतो.

*'मोडून पडला संसार जरी*
*मोडला नाही कणा*
*पाठीवरती हात ठेवून*
*नुसते लढ म्हणा'*

सरते शेवटी पुन्हा वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभकामना.

प्राचार्य **संजय एम. भस्मे**
(वर्धा)
मो. नं. ९९७०२६०२४८

# साहित्यिक जाण आणि राजकीय भान जपणारे - प्रा. डॉ. हेमंत देशमुख



**का**ही व्यक्तिमत्वे केवळ पदांमुळे मोठी होत नाहीत; तर त्यांच्या विचारांमुळे, कार्य शैलीमुळे आणि समाजाशी असलेल्या बांधिलकीमुळे उंचावतात. प्रा. डॉ. हेमंत देशमुख हे असेच एक बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. मराठी भाषा दिनाच्या पावन दिवशी जन्माला आलेल्या या व्यक्तिमत्वाने विज्ञान, साहित्य आणि राजकारण या तिन्ही क्षेत्रांत आपली स्वतंत्र छाप निर्माण केली आहे.

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात संगणक विभागप्रमुख म्हणून कार्य करताना त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या नव्या वाटा दाखवल्या. विज्ञानातील प्रगती आणि बदलते तंत्रज्ञान यांचा वेध घेत विद्यार्थ्यांना भविष्याभिमुख शिक्षण देण्यावर त्यांनी भर दिला. त्यांचे लेखन आणि व्याख्याने केवळ माहितीपर नसून प्रेरणादायी ठरले आहेत. विज्ञानाशी नाळ जुळलेली असतानाही मराठी भाषा आणि साहित्याबद्दलची त्यांची आस्था तितकीच प्रगल्भ आहे. कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या विचारधारेप्रमाणे जिद्द, स्वाभिमान आणि 'कणा' टिकवण्याची शिकवण त्यांच्या व्यक्तिमत्वातून प्रत्ययास येते. भाषणातील मुद्देसूदपणा, स्पष्ट भूमिका आणि प्रभावी शब्दफेक यामुळे ते साहित्यिक जाण असलेले वक्ते म्हणूनही परिचित आहेत.

राजकीय क्षेत्रात ते अमरावती शहराध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरद पवार गट) या जबाबदारीवर कार्यरत आहेत. सार्वजनिक जीवनात पारदर्शकता, वेळेचे नियोजन आणि प्रामाणिकपणा यांवर त्यांचा कटाक्ष असतो. युवकांना सकारात्मक राजकीय सहभागासाठी प्रेरित करण्याचे काम ते सातत्याने करत आहेत.क्रीडा क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग उल्लेखनीय आहे. नागपूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन मध्ये सचिव म्हणून सलग १४ वर्षे काम करत त्यांनी संघटन कौशल्य सिद्ध केले. विविध सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांमध्ये पदाधिकारी म्हणून त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे.साधी राहणी, उच्च विचार आणि 'काम हीच पूजा' हा जीवनमंत्र यामुळे प्रा. डॉ. देशमुख हे साहित्यिक संवेदनशीलता आणि राजकीय जबाबदारी यांचा समतोल साधणारे व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात.त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या दीर्घायुष्याच्या आणि निरंतर समाजकार्यासाठी ऊर्जा लाभावी ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**प्रा.रत्नाकर शिरसाट**
लातूर

### मराठी भाषा गौरव दिनानिमित्त

# 'नवभारत गुरुकुलम' प्रस्तावित मराठी माध्यम शाळा




**२७** फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिन.हा दिवस मराठी भाषेच्या अभिमानाचा, अस्मितेचा आणि सांस्कृतिक जागृतीचा दिवस म्हणून साजरा केला जातो. महान साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या या दिनाचे औचित्य साधत, अमरावतीमध्ये शिक्षणक्षेत्रात एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टीपूर्ण पाऊल उचलले जात आहे. श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्ट द्वारा प्रस्तावित नवभारत गुरुकुलम ही शाळा मराठी माध्यमातून आधुनिक, मूल्याधिष्ठित आणि युगानुकूल शिक्षण देण्याच्या उद्देशाने उभारली जात असून ट्रस्टने तिचे बांधकाम कार्य सुरू केले आहे. ही केवळ शाळा नसून एक व्यापक शैक्षणिक संकल्पना आणि दूरदर्शी योजना म्हणून पाहिली जात आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व नाकारता येत नाही; मात्र मातृभाषेपासून दूर जाऊन शिक्षण घेणे ही दीर्घकालीन दृष्टीने घातक प्रवृत्ती ठरू शकते. राष्ट्रीय शिक्षण नीती २०२० स्पष्टपणे सांगते की, प्राथमिक शिक्षण मातृभाषेत झाल्यास विद्यार्थ्यांची समज, आकलनक्षमता आणि सर्जनशीलता अधिक विकसित होते. याच अनुषंगाने CBSE मंडळाने देखील २२ भारतीय भाषांमधून शिक्षणाचे माध्यम उपलब्ध व्हावे यासाठी NCERT ला अभ्यासक्रमात आवश्यक बदल व भाषांतर करण्याचे निर्देश दिले आहेत, ही बाब मातृभाषाधारित शिक्षणाच्या वाढत्या महत्त्वाची साक्ष देणारी आहे.

या प्रस्तावित शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल साधणारी तिची शैक्षणिक दृष्टी. येथे विद्यार्थ्यांच्या पंचकोशीय विकासावर म्हणजे शारीरिक, प्राणिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक स्तरांवरील सर्वांगीण प्रगतीवर विशेष भर दिला जाणार आहे. भारतीय विचारसरणी, संस्कार, खेळ, संस्कृती आणि जीवनमूल्ये यांचा समावेश शिक्षण प्रक्रियेत केला जाणार असून त्याचबरोबर आधुनिक साधने, डिजिटल तंत्रज्ञान आणि STEAM (Science, Technology, Engineering, Arts, Mathematics) आधारित शिक्षणपद्धतीचा प्रभावी वापर करण्यात येणार आहे.

शाळेची वास्तुरचना देखील भारतीयत्वाची जाणीव करून देणारी, संस्कृतीचे दर्शन घडवणारी आणि विद्यार्थ्यांना प्रेरणादायी वातावरण देणारी असेल, अशी संकल्पना आहे. शिक्षण केवळ वर्गात मर्यादित न राहता परिसर, वास्तू, उपक्रम आणि अनुभव यांच्या माध्यमातून घडावे, हा दृष्टिकोन या प्रकल्पामागे दिसून येतो.आज अनेक मराठी शाळा बंद पडत असताना, मातृभाषेच्या जतनासाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी असा उपक्रम उभारला जाणे ही समाजासाठी आशेची किरण आहे. 'एक युगानुकूल शाळा' हे ब्रीद धारण केलेली नवभारत गुरुकुलम ही प्रस्तावित शाळा भविष्यात शिक्षणक्षेत्रात आदर्श आणि दीपस्तंभ ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने अशा उपक्रमाचे स्वागत करणे म्हणजे केवळ एका शाळेचे अभिनंदन नव्हे, तर मातृभाषा, संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांना दिलेला सन्मान होय. समाज, पालक आणि शिक्षणप्रेमी यांनी अशा प्रयत्नांना पाठबळ दिल्यास मातृभाषाधारित शिक्षणाची नवी दिशा निश्चितपणे निर्माण होईल.

**सुनील पाठक,**
विश्वस्त,श्रीमती न.
हि.शैक्षणिक ट्रस्ट अमरावती

# महेंद्र उबाळे; मैत्री, माणुसकी आणि कर्तव्यनिष्ठेचा प्रेरणादायी प्रवास



**जी**वनाचा प्रवास हा दिवसांच्या गणतीने मोजला जात नाही,तर त्या दिवसांत घडवलेल्या कार्याने, जपलेल्या नात्यांनी आणि कमावलेल्या विश्वासाने मोजला जातो. अशाच कर्तृत्ववान, निष्ठावंत आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व असलेला माझा जिवलग मित्र महेंद्र उबाळे यांनी मुंबई महानगरपालिकेत तब्बल ३२ वर्षे प्रामाणिक, समर्पित आणि कर्तव्यदक्ष सेवा बजावून तसेच अनेक उच्च पदे भूषवून सन्मानाने सेवानिवृत्ती होत आहे. त्याच्या या उज्वल सेवाकार्याचा गौरव करण्याचा योग लाभणे ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

१५ फेब्रुवारी १९६८ रोजी ठाणे जिल्ह्यातील खर्डी येथे जन्मलेल्या महेंद्र यांचे बालपण संस्कारमय वातावरणात गेले. त्याचे वडील शांताराम उबाळे (बी.ए., बी.एड.) हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक तर आई सुनंदा या प्रेमळ व कर्तव्यदक्ष गृहिणी होत्या. शिक्षण, शिस्त, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा यांचे बाळकडू त्याला लहानपणी घरातूनच मिळाले. प्राथमिक शिक्षण खर्डी येथे पूर्ण केल्यानंतर त्यांनी भिवंडी येथे बारावीपर्यंतचे शिक्षण घेतले. पुढे सांगली येथील वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून अभियांत्रिकी पदवी संपादन केली आणि एम.बी.ए. करुन स्वतःला अधिक सक्षम केले.

सन १९९५ साली त्याचा विवाह विद्या यांच्याशी झाला. त्यांनी शिक्षण क्षेत्रात १६ वर्षे सेवा बजावल्यानंतर स्वेच्छानिवृत्ती घेतली. मुलगी मिताली (बी.ई. इलेक्ट्रिकल, एम.एस. सिडनी, ऑस्ट्रेलिया) नामांकित कंपनीत कार्यरत असून मुलगा साहिल (बी.ई. सिव्हिल) यशस्वी उद्योजक म्हणून परिचित आहे. सध्या हा परिवार चेंबूर येथे वास्तव्यास आहे.महेंद्र आणि माझ्या मैत्रीचा प्रवास १९९३ साली एका मुलाखतीच्या निमित्ताने सुरु झाला. विविध शासकीय विभागांच्या मुलाखतीदरम्यान आमची अनेकदा भेट होत गेली आणि ही ओळख दृढ मैत्रीत परिवर्तित झाली. २३ जुलै १९९३ रोजी मुंबई महानगरपालिकेच्या मुलाखतीनंतर महेंद्र याची पहिल्याच यादीत निवड झाली, तर मी प्रतीक्षा यादीत होतो. त्या कठीण काळात त्यानी दिलेला आत्मविश्वास आणि मानसिक आधार आजही स्मरणात आहे.

सन १९९५ मध्ये मीही महापालिकेच्या सेवेत रुजू झालो. पुढे सिवरेज ऑपरेशन विभागात एकत्र काम करण्याची संधी मिळाल्यानंतर आमच्या मैत्रीला नवा आयाम प्राप्त झाला. माझ्या सेवाकाळात आलेल्या अनेक कठीण प्रसंगांत तो खंबीरपणे माझ्या पाठीशी उभा राहिला. स्वेच्छानिवृत्तीनंतर पेन्शन आणि इतर आर्थिक देयके प्रलंबित असताना त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला आणि माझे सर्व हक्काचे लाभ मला मिळवून दिले. त्या वेळी उच्च पदावर कार्यरत असूनही त्यांनी दाखवलेले सहकार्य हे त्यांच्या माणुसकीचे द्योतक आहे.

दानशूर, परोपकारी व सामाजिक बांधिलकी जपणारे महेंद्र उबाळे यांनी प्रसिद्धीपासून दूर राहून धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये हजारो लोकांच्या अन्नदानाची जबाबदारी निस्वार्थीपणे पार पाडली आहे. धम्मदीप संस्था, नालंदा वाचनालय, सम्यक संघ अशा विविध सामाजिक संस्थांमध्ये तो सक्रियपणे कार्यरत आहेत. शिस्तप्रिय, मनमिळाऊ व मार्गदर्शक अधिकारी म्हणून महापालिकेत त्याची ओळख निर्माण झाली आहे.आज बृहन्मुंबई महानगरपालिकेचा प्रमुख अभियंता म्हणून तो सेवानिवृत्त होत असला तरी त्याची मैत्री, त्याचे मोठेपण आणि त्याचे माणूसपण कधीच निवृत्त होणार नाही. त्याच्या सेवानिवृत्तीचा हा क्षण म्हणजे कर्तव्यपूर्तीचा सन्मान असून आगामी जीवनात सुख, समाधान आणि यशाचा समृद्ध प्रवास त्याना लाभो, हीच सेवानिवृत्ती निमित्त माझ्या जिवलग मित्राला मनःपूर्वक सदिच्छा !


**संजयकुमार सुर्यवंशी**
माजी
कार्यकारी अभियंता


# सुडभावनेतून साकारलेले 'विलंब'

### एक टक नाटक
### समीक्षण

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वा प्राथमिक नाट्य महोत्सव २०२५-२६ स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सीपना कॉलेज अमरावती, कामगार कल्याण उपकेंद्र शेगाव नाका, यांनी दीपिका भुंबर विलंब नाट्य सादर केले.**

पडदा उघडताच अंधारात चार श्यामवेशात महिलेला मारहाण व लुट गूढध्वनीत आरंभ.'रिकामी सांगत घागर' हे पार्श्वसंगीत वाटसरूला लुटते.अंधारात डॉक्टर धुम्रकांडी ओढताना नीलप्रकाश, विंगेतकिंचाळ, महिलेचा मृत्यू, वातावरण स्तब्ध,अंधारात खुर्चीवर बांधलेली महिला डॉक्टर व हातात बंदुकीचा आभासात द्वि-ब्लॅककमांडो असलेली हॉररूम, सारेपट वर उजेड दृश्यात सूड भावनेत विलंबगतीने प्रवेश. एकाच मंचावर दोन भिन्न नेपथ्य.एक दिवाणखाना व दुसरी क्रूर शिक्षग्रस्त अंधार कोठडी.भावनिक पावासूर तर गूढपार्श्वगीतात डॉक्टर देवास निष्ठूर म्हणत; न्याय याचिका, स्वतःला चावा घेण्याचा मनोविकार, पाच वर्षाच्या





अंधारात सुरू असलेल्या छळाचा परिमाण, मंदसंवादातून स्पष्ट होत; विंगेतून कॉमेन्ट्री झळकत. दुसरा प्रवेश वीजप्रकाश व गडगडाट समान खिडकी बाहेरून येतो.खिडकीत कदाचित चादर. दार उघडा !! दारावर थापा देत आसरा मागणारा आवाज..कोण ? भयभीत आवाजात रेनकोट घालून (कोरडाच) येणारी तरुणी जीव मुठीत बहाण्याने आडोसा घेत डॉ.कांडलकरबद्दल गुपित बोलून, गुंडाने पाठलाग केल्याचे सांगत मैत्री घडवत नीलू परिचय होतो.

वऱ्हाडची बोलीभाषा अन् अघळपघळ लोकभावना त्यात वैर तेवढेच!! 'करेल तो भरेल' या भूमिकेला मांडत रहस्यचर्चा, पियानोचे पार्श्वसंगीत, भयावह संवाद.रेल्वेवेटींग रूमचा प्रसंग, झालेल्या सुटकेचे वर्णन, रेल्वेच्या ध्वनिक्षेपणात भंडारा रेल्वेस्टेशनची घटना. नीलू सांगत अंधारातील अतिप्रसंग शिकार अन् मध्यंतर... उत्तरार्धात डॉ.दिशा कांडलकरची निता मुलगी चहा आणते.आधीची संत्रटोपली गायब. स्नानगृही नीलू, रेनकोट खुर्चीवर, निकीचे बॅगवर लक्ष अन् रस्सीने बिंगफोड. पिस्तुलीचा सामना, बदल्याचा इरादा सर्व थरारक दृश्य अगदी विलंबगतीत.

डॉ. दिशा कांडलकरच्या घरात इबादरीने घुसून निकीला संपवण्याचा डाव मोडते, नीलू पळते.पुढे नीलू डॉ.दिशामुळे उध्वस्त झालेल्या कुटुंबाची कारुण्य कथा सांगत, आखलेले सर्व डाव मांडते. त्यात अनेक खून व डॉक्टरचा अमानुष छळ.सारपटाचे (चेस) खेळ अन जुगारचा अल्पउल्लेख डॉ.दिशा करते. जीवाला गमावून नीलू डॉक्टरशी खेळते, निकीहस्ते डॉ.दिशाचा (मातृ)वध घडवून आपल्या वडिलांचा जिवंतपनी शवविच्छेदनाने कारुण्य मृत्यूचा सूड,बापाला १५ दिवसाचा विलंब बघायला झाला हा नाटकाचा अंतबिंदू.

भूमिका मंद,संवाद,अभिनय तसेच संगीत रिद्म विलंबितपणात तर थ्रिलर आणि हॉर्ररंचे प्रसंग नाटकात उपेक्षित.नेपथ्य दोन कक्ष दाखवताना पूर्ण वेळ दुसऱ्यास्थळी लक्ष विचलनात कलावंत अडकून.कॉमेन्ट्री व संगीत तीक्ष्ण जाणवत.नेपथ्यात मृतांची तसबीर माळेवीण, बंदूक,फोन असून आभास,वयाचे व्यवस्थापन वेशभूषेतून,रंग व प्रकाश योजनेत थरारक प्रसंग वंचित, मृत्यूसाठी झटापट नाही अन् नीलूचे मृतदर्शन सारपट मुळे अव्यक्त.पुरुषांच्या अनुपस्थितीत विलंबित गतीने दिग्दर्शक दुर्गा चौधरीने नाटक कमतालीम केले.

नाटकाचे कथानक सूड व भावना ह्यात खेळण्यासाठी थरारक प्रसंग व रंगसंगतीचे मैदान असताना हौशी कलावंतानी जागा रुंद केली. कदाचित प्रेक्षक पुढच्या प्रयोगास प्रलंबित राहू नये एवढी घाई; अन्यथा विलंब समजणार नाही!! म्हणून कलावंत डॉक्टर-दया गोंडाने, नीलू-श्रद्धा हुशारे, निकी-रुपाली कांडलकर, गुंड - अनिता अडकीने, संगीता राऊत, नेपथ्य - विमल भुजबळ, संगीत - गायत्री काळेने वाजवले व उजेड मयुरी विंचूरकरने पाडून अधिक विलंब न होता वेळेत पडद्याआड नाट्य केले.

**कबीर फादर**
मो.७७९८६४५६५५

जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २५७/२०२६ प्रोसेस नं. २६३२/२०२६
चौ.ता. ०९/०४/२०२६ दिनांक : २४/०२/२०२६

**अर्जदार :** १. लिलाबाई श्रीकांत पाटील २. रोहन श्रीकांत पाटील ३. रूचिका श्रीकांत पाटील सर्व रा. संभाजी नगर, आदर्श कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्री. श्रीकांत विनायकराव पाटील
**पत्ता :-** रा. संभाजी नगर, आदर्श कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. श्रीकांत विनायकराव पाटील यांचे दि. ०६ / ११ / २०२३ रोजी कमांड हॉस्पिटल (एस. सी.) पुणे. ता. जि. पुणे. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२५/२०२६ प्रोसेस नं. २२२०/२०२६
चौ.ता. २४/०३/२०२६ दिनांक : १६/०२/२०२६

**अर्जदार :** १. अभिजीत प्रभाकर शोभणे रा. मुखर्जी यांच्या बंगल्यासमोर, राउत वाडी, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. मंजुषा तरेश शुक्ला रा. आयसीआयसीआय बँक, कानडे नगर, बुलढाणा, ता. जि. बुलढाणा. ३. सौ. वैशाली विनय नाडे रा. फ्लॅट नं. इ-९, जिजाइ नगरी, महात्मा सोसायटी, कोथरूड, पुणे. ता. जि. पुणे. ४. सौ. अश्विनी अविनाश बंगले रा. सर्व्हे नं. ६/१७/१/११, ज्ञानदीप सोसायटी, जगतजननी बंगलो, कर्वे नगर, पुणे. ता. जि. पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. श्री प्रभाकर रामचंद्र शोभणे २. श्रीमती उषा प्रभाकर शोभणे
**पत्ता :-** रा. मुखर्जी यांच्या बंगल्यासमोर, राउत वाडी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री प्रभाकर रामचंद्र शोभणे यांचे दि. ०९/०६/२००१ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत श्रीमती उषा प्रभाकर शोभणे यांचे दि. २७/११/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- १८/२०२६ कलम -१९ दि. २०/०२/२०२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक-** श्री.गुरुकृपा गौरक्षण गौ-सेवा चॅरिटेबल ट्रस्ट, खडकी, अकोला ता. जि. अकोला
**अर्जदार :-** श्री. गजानन सखाराम खांबलकर रा. श्रीराम निवास, मंगरूळपीर रोड, गांधीनगर, खडकी, अकोला, ता. जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** रोख रक्कम रु ७००/- गजानन सखाराम खांबलकर यांचे ताब्यात आहे. **आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियतही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच, वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक- २०/०२/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला

**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- २१/२०२६ कलम - १९ दि. २६/०२/२०२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव :** शिवरूद्र प्रतिष्ठाण समाज मंदीर ट्रष्ट सैनिक कॉलनी मोठी उमरी अकोला
अर्जदार :

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** रुपये ७००/- श्री श्रीरंग उत्तमराव रावते यांचे कडे जमा आहे.
**आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक- २६/०२/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मनपा अकोला**

**निविदा सुचना क्र. ३१, सन २०२५-२६**

आयुक्त, अकोला महानगरपालिका, मनपा निधी अंतर्गत ०२ काम, मा. आमदार श्रीम. निलम गोऱ्हे यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२५-२६ निधी अंतर्गत ०२ काम, मा. आमदार श्री वसंत खंडेलवाल यांच्या स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम २०२५-२०२६ अंतर्गत ०२ काम या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/ १९६१/२०२६,
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : २६/०२/२०२६


# जुने शहरात 'ऑपरेशन प्रहार' नावालाच

# पोलिसांच्या नाकावर टिच्चून खुलेआम चालतोय वरली - मटका, टेबल जुगार

## - जुने शहर, एलसीबी व एसडीपीओ पथकाची मूकसंमती?
## - नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण

■ प्रतिनिधी | अकोला ■

**जुने शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत नवाबपुरा, भांडपुरा, बाळापूर रोड परिसरात अवैध जुगार अड्डे स्थानिक पोलिसांच्या नाकावर टिच्चून खुलेआम पद्धतीने सुरू आहे. विशेष म्हणजे या धंद्याची माहिती जुने शहर पोलिस, स्थानिक गुन्हे शाखा आणि एसडीपीओ यांच्या पथकाला सुद्धा असल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. भव्य दिव्य टिन शेड उभारून सुरू असलेल्या या अवैध व्यवसायाने स्थानिक पोलिसांच्या कार्यशैलीवरच नव्हे तर कार्यक्षमतेवर थेट प्रश्न उपस्थित केला आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, जुने शहर पोलिस स्टेशन हद्दीतील नवाबपुरा, भांडपुरा चौक, बाळापुर रोड परिसरात अवैध जुगार अड्डे खुलेआम सुरू असल्याचा धक्कादायक आरोप समोर आला असून त्याची थेट चित्रफित आणि फोटोसोबत तक्रार एका जागरूक नागरिकाने वरिष्ठांकडे केली आहे.

विशेष म्हणजे सध्या दहावी-बारावीच्या बोर्ड परीक्षा सुरू असताना या अड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम होत असल्याचे सांगण्यात आले आहे. परिसरातील महापालिकेची उर्दू कन्या शाळा जवळच असल्याने शाळेत ये-जा करणाऱ्या मुलींनाही गैरप्रकारांना सामोरे जावे लागत असल्याची भीती या तक्रारीतून व्यक्त करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, संबंधित ठिकाणी टिन शेड उभारून बाकांची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय आदी सुविधा उपलब्ध करून जुगार अड्डे बिनधास्तपणे चालवले जात आहेत. दारूच्या नशेत येणाऱ्या काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींमुळे परिसरात वारंवार भांडणे, शिवीगाळ होत असून शांततेचा भंग होत आहे.

या अवैध व्यवसायामागे 'रहिम खान' नामक इसमाचे नाव पुढे आले असून त्याला काही पोलिस कर्मचारी व स्थानिक राजकीय पाठबळ असल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळेच कोणतीही भीती न बाळगता हा व्यवसाय सुरू असल्याचा दावा करण्यात आला आहे.

तक्रारदाराने असेही नमूद केले आहे की, संबंधितांविरोधात बोलणाऱ्यांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जातात. त्यामुळे नागरिक उघडपणे पुढे येण्यास घाबरत आहेत. स्थानिक पोलिसांना पूर्वसूचना न देता स्वतंत्र पथकाद्वारे छापा टाकल्यास लाखो रुपयांचा मुद्देमाल मिळू शकतो, असा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची माहिती जुने शहर पोलिसांना, स्थानिक गुन्हे शाखेला (एलसीबी) तसेच एसडीपीओ पथकाला असल्याची चर्चा आहे. मग कारवाई का नाही? असा संतप्त प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. कायद्याचे रक्षण करणाऱ्यांनीच जर डोळेझाक केली, तर सर्वसामान्यांनी न्याय कुणाकडे मागायचा? असा सवालही उपस्थित होत आहे.

अवैध जुगार आणि अमली पदार्थांच्या विक्रीमुळे तरुण पिढी उद्ध्वस्त होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत या घातक साखळीचे जाळे पोहोचत असल्याची चर्चा असून प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. दरम्यान, पोलिस



प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन तातडीने धाड टाकून कारवाई करणार का? नवाबपुरा, बाळापूर रोड, जुने शहर परिसराला अवैध धंद्यांच्या विळख्यातून मुक्त करणार का? की पुन्हा एकदा सर्व काही 'जैसे थे' राहणार? याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# काटेपूर्णा बालविवाह- 'पोस्को' प्रकरणात तिघांची निर्दोष मुक्तता

## सरकार पक्षाला आरोप वाजवी शंकेपलीकडे सिद्ध करण्यात अपयश

■ प्रतिनिधी | अकोला ■

काटेपूर्णा येथील कथित बालविवाह व 'पोस्को' (POCSO) प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने तिघा आरोपींची निर्दोष मुक्तता केली. विद्यमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांनी हा निर्णय दिला.



अन्वी मिरजापूर (ता. जि. अकोला) येथील नितिन दुर्योधन उंबरकर, उर्मिला दुर्योधन उंबरकर आणि जया उर्फ ज्योती किसनराव गावंडे यांच्याविरुद्ध बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. फिर्यादीने तक्रारीत नमूद केले होते की, ती अल्पवयीन असताना तिच्या मर्जीविरुद्ध लग्न लावून आरोपी क्र. १ नितिन याने बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले.

या प्रकरणाचा तपास अमरावतीहून वर्ग करण्यात आल्यानंतर बोरगाव मंजू पोलिसांनी पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. सुनावणीदरम्यान सरकार पक्षाने गुन्हा सिद्ध करण्यासाठी ११ साक्षीदार तपासले. विशेष म्हणजे, सर्व साक्षीदारांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६१ अन्वये दिलेल्या जबाबाशी सुसंगत साक्ष नोंदविली; एकही साक्षीदार फितूर झाला नाही. बचाव पक्षाने तीन साक्षीदार तपासले. एकूण १४ साक्षींच्या आधारे खटल्याचा निकाल देण्यात आला.

मात्र, मुलीची जन्मतारीख आणि काटेपूर्णा येथे कथित विवाह झाल्याचा ठोस व विश्वासार्ह पुरावा सरकार पक्षाला वाजवी शंकेपलीकडे सिद्ध करता आला नाही. तसेच साक्षींमधील तफावत आणि पुराव्यांतील त्रुटी लक्षात घेत न्यायालयाने आरोपींना निर्दोष घोषित केले.

आरोपी क्र. १ व ३ च्या वतीने ॲड. राजेश जाधव, ॲड. मुमताज देशमुख, ॲड. टिना नंदा, ॲड. सुनील जुनघरे, ॲड. प्रभात देशमुख, ॲड. समीर शेख आणि ॲड. रामराव चव्हाण यांनी कामकाज पाहिले. आरोपी क्र. २ च्या वतीने ॲड. गणेश परियाल, ॲड. मुक्ता दाने, ॲड. ज्योत्स्ना बोदडे आणि ॲड. अक्षय नवलकार यांनी बाजू मांडली. बालविवाह व 'पोस्को' अंतर्गत दाखल झालेल्या या बहुचर्चित खटल्याच्या निकालाकडे अकोलेकरांचे लक्ष लागले होते. न्यायालयाच्या निर्णयानंतर प्रकरणावर पडदा पडला आहे.

# अजितदादांच्या नावाने राज्यस्तरीय पुरस्काराची मागणी

## अधिवेशनात अमोल मिटकरी यांचा प्रस्ताव

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ज्येष्ठ नेते अजितदादा पवार यांच्या नावाने राज्यस्तरीय पुरस्कार सुरू करण्याची मागणी आमदार अमोल मिटकरी यांनी अधिवेशनात केली. 'अजितदादा पवार राज्य गौरव पुरस्कार' सुरू करून प्रशासनातील उत्कृष्ट कार्याचा सन्मान करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



मिटकरी म्हणाले, गेल्या अनेक दशकांपासून अजितदादांनी राज्याच्या प्रशासनात विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळत विकासाभिमुख आणि निर्णयक्षम नेतृत्वाची ठसठशीत छाप पाडली आहे. जलसंपदा, वित्त व नियोजन यांसारख्या खात्यांमध्ये त्यांनी घेतलेले निर्णय आणि ग्रामीण-शहरी विकासासाठी राबविलेल्या धोरणांचा विचार करता त्यांच्या कार्याचा राज्यस्तरावर गौरव व्हायलाच हवा. या प्रस्तावित पुरस्काराच्या माध्यमातून प्रशासन, सहकार, कृषी, उद्योग, पायाभूत सुविधा तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करता येईल, असेही मिटकरी यांनी नमूद केले. अशा पुरस्कारामुळे लोकाभिमुख प्रशासनाच्या मूल्यांना बळकटी मिळेल आणि नव्या पिढीतील नेतृत्वाला प्रेरणा मिळेल, असा त्यांचा दावा आहे. दरम्यान, राज्य शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी सभागृहात केली. या प्रस्तावावर राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

# धनादेश अनादर प्रकरणी आंध्रप्रदेशातील एजन्सी मालकाला दोन वर्षांचा कारावास

## २२.४० लाखांचा दंड; अकोला न्यायालयाचा निर्णय

■ प्रतिनिधी | अकोला ■

धनादेश अनादर प्रकरणात तिसरे सह. दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) न्यायालयाने आंध्रप्रदेशातील एजन्सी मालकाला दोन वर्षांचा कारावास व २२ लाख ४० हजार २८० रुपयांचा दंड ठोठावला आहे. या निर्णयामुळे व्यापारी व्यवहारात धनादेश देऊन टाळाटाळ करणाऱ्यांना कडक इशारा मिळाला आहे.

सदर प्रकरणात एसडीएस रामासाईटस् क्रॉप सायन्स प्रा. लि. या कंपनीने आंध्रप्रदेशातील श्री. चन्नकसेवा एजन्सीचे मालक यांच्याविरुद्ध न्यायालयात धाव घेतली होती. सन २०१९ मध्ये आरोपीने शेती व्यवसायासाठी कीटकनाशके व खतांचा माल खरेदी केला होता. त्यासाठी दिलेला धनादेश अनादरित (बाउन्स) झाल्यानंतर कंपनीने न्यायालयीन लढा सुरू केला.

प्रकरणाची सविस्तर सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने आरोपी दोषी ठरवत धनादेशाच्या रकमेइतकाच २२,४०,२८० रुपयांचा दंड आणि दोन वर्षांचा कारावास अशी शिक्षा सुनावली. फिर्यादी कंपनीतर्फे ॲड. मनमोहन सारडा, ॲड. सतीश सिरसाट व ॲड. सचिन इंगोले यांनी प्रभावी युक्तिवाद करत पुरावे सादर केले. न्यायालयाने त्यांच्या बाजूचा युक्तिवाद ग्राह्य धरत फिर्यादी कंपनीला न्याय दिला. या निर्णयामुळे व्यापारी व्यवहारात आर्थिक शिस्त राखण्याचा संदेश देण्यात आला असून, धनादेश अनादर प्रकरणात न्यायालय कठोर भूमिका घेत असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## अकोला ते बोरगांव मंजू श्यामध्वज पायदळ निशान यात्रा

**अकोला :** श्री श्याम बाबा फागुन उत्सव निमित अकोला ते बोरगांव मंजू श्यामध्वज पायदळ निशान यात्राचे आयोजन करण्यात आले आहे. अकोला श्याम मंदिर ते स्वयंभू श्यामल नरेश बोरगांव मंजूची ही १९ कि.मि.ची श्री श्यामबाबा ध्वज पायदळवारी श्री श्याम बाबाच्या झांकी समवेत शुक्रवार दि २७ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.१५ वाजता स्थानिक श्री रामदेवबाबा-श्री श्यामबाबा मंदिर येथून निघणार आहे. ही निशान यात्रा सिंधी कँप चौक, नेहरू पार्क चौक, इनकम टॅक्स चौक, महाकाली चौक, राधाकृष्ण टॉकीज, महाबीज, शिवणी मार्गे नेशनल हाईवे ६ वरुन बोरगांव मंजू ला येथे पोहचून तेथे स्वयंभू श्यामल नरेश ला निशान अर्पण करण्यात येणार आहेत.

## शनिवारी अटल टिंकरिंग लॅब' जिल्हास्तरीय प्रदर्शनी

**अकोला :** राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून विज्ञान क्षेत्रातील नव्या कल्पनांना चालना देण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अकोला व बुलढाणा तसेच एलएएचआय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरात अटल टिंकरिंग लॅब' जिल्हास्तरीय प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे. शनिवार दि २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता, जिल्हा न्यायालय समोरील न्यू इंग्लिश हायस्कूल येथे आयोजित या

अटल टिंकरिंग लॅब जिल्हास्तरीय प्रदर्शनीत अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील अटल टिंकरिंग लॅब असलेल्या शाळांमधील विद्यार्थी आपल्या नाविन्यपूर्ण विज्ञान व तंत्रज्ञान आधारित प्रकल्पांचे सादरीकरण करणार आहेत.

# आ. साजिद पठाण यांना 'लॉरेन्स बिश्नोई' गँगकडून धमकी प्रकरणी विधिमंडळ गाजले

## -मुख्यमंत्री तथा गृहमंत्री फडणवीस यांचे आश्वासन
## - 'पूर्ण सुरक्षा, आरोपीचा शोध सुरू'

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांना कुख्यात 'लॉरेन्स बिश्नोई' गँगकडून दहा कोटी रुपयांची खंडणी मागत जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार गुरुवारी विधानसभेत पुन्हा एकदा गाजला. 'दहा कोटींची व्यवस्था नाही केली तर तुझी बाबा सिद्दीकीसारखी हत्या करू,' असा थेट इशारा देण्यात आल्याने प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे.

गँगस्टर शुभम लोणकर याने फोन करून धमकी दिल्याचा आरोप असून, या गंभीर प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)चे आमदार जयंत पाटील यांनी सभागृहात मुद्दा उपस्थित करत आ. पठाण यांना तात्काळ 'झेड प्लस' सुरक्षा देण्याची आणि धमकी देणाऱ्या आरोपीला त्वरित अटक करण्याची जोरदार मागणी केली.

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'ज्या दिवशी आ. पठाण यांना कॉल आला, त्याच दिवशी मी त्यांच्याशी संपर्क साधला. अकोला जिल्हा पोलिस अधीक्षकांना तातडीने आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. आ. साजिद खान पठाण यांना संपूर्ण पोलिस सुरक्षा देण्याचे आदेश गृह विभागाला देण्यात आले आहेत.'



फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'शुभम लोणकर हा गुंड प्रवृत्तीचा व्यक्ती सध्या फरार असला तरी त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके कामाला लागली आहेत. कोणत्याही परिस्थितीत आमदारांच्या सुरक्षेशी तडजोड होणार नाही.'

दरम्यान, या प्रकरणामुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, विरोधकांनी सरकारवर कडक शब्दांत टीका केली आहे. आमदाराला थेट खंडणीची धमकी दिली जाणे हे चिंताजनक असल्याचे मत सभागृहात व्यक्त करण्यात आले.

आ. पठाण यांच्या सुरक्षेची जबाबदारी गृह विभागाची असून 'त्यांना काहीही होऊ देणार नाही,' अशी ठाम ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्याने प्रकरणाला राजकीय रंग चढला आहे. आता आरोपीच्या अटकेकडे आणि वाढीव सुरक्षेच्या अंमलबजावणीकडे लक्ष लागले आहे.


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ८९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# ‘मुख्यमंत्री बळीराजा पांधण’ रस्त्यांना वेग द्या

**वर्धा/जनमाध्यम**

शेतकऱ्यांच्या शेत वहिवाटीच्या अडचणी दूर करण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या ‘मुख्यमंत्री बळीराजा पांधण रस्ते’ योजनेची कामे तातडीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले. वर्धा-सेलू विधानसभा क्षेत्रातील योजनेचा आढावा त्यांनी गुरुवारी आभासी पद्धतीने घेतला.

उपविभागीय अधिकारी तथा योजनेचे सदस्य सचिव दीपक करंडे यांच्या दालनातून पार पडलेल्या या बैठकीस देवळीचे आमदार राजेश बकाणे, तहसीलदार संदीप पुंडेकर, गटविकास अधिकारी, भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक, तालुका कृषी अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे अधिकारी तसेच प्रगतिशील शेतकरी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला पालकमंत्र्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले. शेतकऱ्यांची अनेक वर्षांपासूनची मागणी लक्षात घेऊन शासनाने ही योजना अंमलात आणली असल्याचे त्यांनी नमूद केले.शेतात जाण्यासाठी तसेच शेतीमाल घरापर्यंत किंवा बाजारात नेण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.



## पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करा
## पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

विशेषतः पावसाळ्यात चिखल, पाणथळ जागा आणि खड्डेमय मार्गामुळे शेतमाल वाहतूक अडथळ्यात येत होती. या पार्श्वभूमीवर ‘बळीराजा पांधण’ योजना शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी ठरणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.वर्धा-सेलू विधानसभा क्षेत्रात एकूण १,०२२ पांधण रस्त्यांचा समावेश असून त्यांची एकत्रित लांबी सुमारे १,७२५ किमी आहे. प्रत्येक रस्त्याचे वर्गीकरण करून त्यानुसार प्राधान्यक्रम ठरवावा. पावसाळा सुरू होण्यापूर्वी कामे पूर्ण होतील, यासाठी प्रशासनाने नियोजनबद्ध पावले उचलावीत, असे निर्देश त्यांनी दिले.कामांचा दर्जा उच्च प्रतीचा राहावा, यासाठी संबंधित कार्यकारी यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे. स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन पारदर्शक पद्धतीने अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.आ. राजेश बकाणे यांनीही कामांना गती देण्याबाबत सूचना केल्या. बैठकीत योजनेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेऊन तातडीच्या अंमलबजावणीवर भर देण्यात आला.



## महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी रामदास तडस यांचा सत्कार

**वर्धा** - वर्धा जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते तथा खासदार रामदास तडस यांची भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल शहरात आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या निवासस्थानी जाऊन सामाजिक कार्यकर्त्यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. प्रबोधनकार पद्माकर कांबळे, अखिल भारतीय गरीबी निर्मुलन समितीचे जिल्हाध्यक्ष नजीर भाई शेख तसेच समाजसेवक दिलीप वैद्य यांनी अभिनंदन करून पुढील संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते.

# नीती आयोग अधिकाऱ्यांची खरसखांडा येथे पाहणी

**कारंजा/जनमाध्यम**

तालुक्यातील ग्रामपंचायत खरसखांडा येथे भारत सरकारच्या नीति आयोग अंतर्गत नियुक्त अधिकारी विदिशा दास यांनी आकांक्षित तालुका कार्यक्रमां तर्गत क्षेत्रीय भेट देत विविध विकासकामांची पाहणी केली.

सर्वप्रथम त्यांनी गावातील अंगणवाडीला भेट देऊन तेथील शैक्षणिक उपक्रम, पोषण आहार, स्वच्छता व्यवस्था व परसबागेची माहिती घेतली. अंगणवाडीतील मुलांशी संवाद साधत त्यांच्या उपस्थितीचे व उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.



## अंगणवाडी व विकासकामांचे कौतुक

यानंतर गावातील दगडी बंधारे तसेच सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी करण्यात आली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती ग्रामपंचायत अधिकारी धनश्री बेलसरे यांनी दिली.

यावेळी पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी दुबे, विस्तार अधिकारी घोडे, महिला व बाल प्रकल्प अधिकारी मानकर, समन्वयक किरणाके, पर्यवेक्षिका सांडेकर, सरपंच श्वेता कोडापे, अंगणवाडी सेविका, आशा व ग्रामस्थ उपस्थित होते. अधिका ऱ्यांनी गावातील कामांबद्दल समाधान व्यक्त केले.

# विविध कृषी पुरस्कारांकरीता ऑनलाईन संगणक प्रणाली कार्यान्वित

**वर्धा/जनमाध्यम**

कृषि विभागाच्यावतीने दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला,व्यक्ती तसेच संस्थांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. या पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्यासाठी ऑनलाईन संगणक प्रणाली सुरु करण्यात आली आहे. या प्रणालीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे.सदर संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे. या ऑनलाईन प्रणालीमुळे घरबसल्या अर्ज सादर करता येणार आहे ऑफलाईन चार प्रतींमधील प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारा वेळ व खर्च वाचून प्रस्ताव सादरीकरण जलदगतीने होणार आहे. एकदाच अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा-पुन्हा देण्याची आवश्यकता पडणार नाही अर्ज कुठल्या टप्प्यावर आहे याची माहिती शेतकऱ्यांना सहज मिळणार आहे.

# आरोग्य सेवेतील वर्धेची दमदार छाप

**वर्धा/जनमाध्यम**

राज्य शासनाच्या व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने नुकताच राज्यस्तरीय वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान पुरस्कार वितरण साहेळा आयोजित करण्यात आला.रुग्णालयातील बोर, ओपीडी, आयपीडी, मोठी शस्त्रक्रीया, मध्यम शस्त्रक्रीया, नार्मल डेलीव्हरी, या सारख्या निर्देशांकाचे मुल्यमापन करुन उत्कृष्ठ रुग्णालयाची निवड करणे आणि महाराष्ट्र राज्यातील आरोग्य सुविधा पुरविण्याच्या बाबतीत चांगली कामगिरी करणा-या उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण व महिला रुग्णालयांचा सन्मान करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक तसेच महिला रुग्णालय, १०० खाटाचे उपजिल्हा रुग्णालय, ५० खाटाचे उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयाची निवड करण्यात आली होती.मुबंई येथे झालेल्या राज्यस्तरीय वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान पुरस्कार वितरण सोहळ्यास ग्रामीण रुग्णालय पुलगावचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रमोद कोडापे यांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांनी ग्रामीण रुग्णालय पुलगाव येथे भेट देऊन वैद्यकीय अधिक्षक व त्यांच्या अधिकारी व कर्मचा-यांचे अभिनंदन केले.

# ‘संविधान राज’ जनजागृती अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सेलू/जनमाध्यम**

भारतीय संविधानातील मूलभूत मूल्ये आणि नागरिकांचे अधिकार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या ‘संविधान राज जनजागृती’ अभियानाचे बुधवारी (२६ फेब्रुवारी) सेलू बसस्थानकावर आगमन झाले. अकोला येथून प्रारंभ झालेल्या या अभियानाचे स्थानिक नागरिकांनी उत्साहात स्वागत केले.

कार्यक्रमाची सुरुवात शाहीर अभिमन्यू अंभोरे यांच्या संचाने सादर केलेल्या संविधान गीतांनी झाली. उपस्थितांना



संविधानातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांची जाणीव करून देण्यात आली.यावेळी संदेश घेरे, आकाश इंगळे, धम्मा अंभोरे व दिनकर पाटोळे यांनी नागरिकांशी संवाद साधत भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत हक्क आणि कर्तव्ये याविषयी माहिती दिली. तसेच भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचा उल्लेख करण्यात आला.बसस्थानक परिसरात संविधान गीतांचे सामूहिक गायन करण्यात आले. प्रवासी, विद्यार्थी व स्थानिक नागरिकांनी कार्यक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला.

# निनादाचा स्वर घुमणार

## युवा कवी कृष्णा हरले यांच्या ‘निनाद’ काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**साहूर/जनमाध्यम**

शब्दांच्या धगधगत्या भट्टीतून घडलेला आणि अंत:करणातील स्पंदनांना स्वर देणारा युवा कवी कृष्णा हरले यांचा ‘निनाद’ हा काव्यसंग्रह अखेर रसिकांच्या भेटीला येत आहे. साहित्यप्रेमींच्या प्रतीक्षेला पूर्णविराम देत ३ मार्च रोजी साहूर येथील लक्ष्मीनारायण सभागृहात जाहीर कार्यक्रमातून या काव्यसंग्रहाचे प्रकाशन होणार आहे.

निनाद या काव्यसंग्रहाचे प्रकाशन काव्यगंध प्रकाशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. या सोहळ्यात जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड तसेच अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवाश्रम गुरुकुंज मोझरी चे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य ॲड. दिलीप कोहळे यांच्या हस्ते पुस्तकाचे लोकार्पण होणार आहे.कृष्णा हरले यांच्या लेखणीतून उमटलेले विचार, सामाजिक भान, तरुणाईचे अस्वस्थ मन आणि जीवनातील सूक्ष्म भावविश्व यांचा संगम ‘निनाद’मध्ये अनुभवायला मिळणार आहे. गेल्या काही दिवसांपासून या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाची साहित्यवर्तुळात उत्सुकता होती.कार्यक्रमास वर्धा जिल्हा सेवाधिकारी प्रभाकर गायकवाड, पत्रकार अमोल सोटे, किशोर शेंडे, रेखा शेंडे, ॲड. अश्विनी कोहळे, ॲड. अश्विनी गायकवाड, गजानन सरोदे, वसंत ढवळे, माजी पंचायत समिती सभापती ईश्वर वरकड, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस प्रशांत काकपुरे, उत्तमरावजी करांगळे, सरपंच प्रकाश गायकवाड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.काव्यप्रेमी मित्रपरिवाराने या काव्यसंग्रहाचे उत्स्फूर्त स्वागत केले असून, साहूरमध्ये ३ मार्च रोजी शब्दांचा हा ‘निनाद’ निश्चितच रसिकांच्या मनात दीर्घकाळ घुमत राहील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# श्रमिकांच्या न्यायहक्कांसाठी भामसचा एल्गार

**वर्धा/जनमाध्यम**

केंद्र शासनाच्या श्रम संहितेतील बदलांविरोधात आणि कामगारांच्या प्रलंबित मागण्यां साठी भारतीय मजदूर संघ (भामस) जिल्हा वर्धाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जोरदार निदर्शने करण्यात आली. दुपारी झालेल्या या आंदोलनात विविध उद्योग, आस्थापना आणि शासकीय विभागांतील शेकडो कामगार सहभागी झाले होते. घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला होता.

नुकतेच भारतीय मजदूर संघचे

## जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा



राष्ट्रीय अधिवेशन जगन्नाथ पुरी (ओडिशा) येथे पार पडले. या अधिवेशनात केंद्र शासनाने केलेल्या श्रमसंहितेतील बदलांवर तीव्र चर्चा झाली. कामगारांचे हक्क अबाधित राहावेत आणि सामाजिक सुरक्षा अधिक भक्कम व्हावी, यासाठी ठोस ठराव संमत करण्यात आले.

भामसने मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये EPS-95 पेन्शन किमान ७५०० रुपये करण्यात यावी, EPF वेतन मर्यादा ३० हजार रुपये निश्चित करावी, ESIC लाभाची मर्यादा ४२ हजार रुपये करण्यात यावी, बोनस पात्रता वेतन मर्यादा २१ हजार रुपये करावी, स्कीम वर्कर्स व ठेका मजुरांना कायमस्वरूपी करण्यात यावे, तसेच सामान्य भरती प्रक्रियेवरील बंदी तत्काळ हटवावी अशा ठोस मागण्यांचा समावेश आहे.जिल्हाध्यक्ष सुनील पाटणकर, जिल्हामंत्री भुजंग तिजारे आणि जिल्हा संघटनमंत्री प्रशांत गौरशेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. एवोनिथ स्टील, आरोग्य विभाग, बँकिंग क्षेत्र, एमएसईबी, सुरक्षा रक्षक आदी क्षेत्रांतील कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कामगारांच्या प्रश्नांकडे सरकारने दुर्लक्ष करू नये, अन्यथा संघर्ष अधिक तीव्र केला जाईल,असा इशारा यावेळी देण्यात आला. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र शासनाला निवेदन सादर करण्यात आले.

श्रमिकांच्या हक्कासाठी भामसची ही लढाई आता अधिक आक्रमक होणार असल्याचे स्पष्ट संकेत या आंदोलनातून मिळाले.

# थोडक्यात

## रेल्वे स्थानकावरून १० लाखांचा ट्रक चोरी

**हिंगणघाट** - येथील रेल्वे स्थानकाच्या मालधक्क्यावर उभा असलेला एमएच-३४ एबी-७६८५ क्रमांकाचा ट्रक अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना समोर आली आहे. साजिद खान साबीर खान नवाब (४३), रा. इंदिरा गांधी वार्ड, यांच्या मालकीचा हा ट्रक असून त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो. खताची मालगाडी येणार असल्याने त्यांनी ट्रक मालधक्का ट्रॅकवर उभा केला होता. काही वेळासाठी घरी जाऊन परत आल्यावर ट्रक आढळून आला नाही. सर्वत्र शोध घेऊनही वाहनाचा माग कळला नाही. या घटनेत सुमारे १० लाखांचे नुकसान झाले आहे. तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## गोदाम फोडून साहित्य लंपास

**वर्धा** - बॅचलर रोड परिसरातील मंडप डेकोरेशनच्या गोदामाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी ८६ हजार रुपयांचे साहित्य चोरून नेल्याची घटना मंगळवारी (२४) उघडकीस आली. भूषण वामन मिटकरी (२८), रा. म्हाडा कॉलनी, यांचा मंडप सजावटीचा व्यवसाय आहे. त्यांनी साहित्य साठवण्यासाठी बॅचलर मार्गावर गोदाम घेतले आहे. चोरट्यांनी गोदामाचे कुलूप तोडून ३० हॅलोजन दिवे, चोक, स्टीलच्या वाट्या व प्लेटा असा ऐवज लंपास केला. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. या प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

## वाळू विक्रीचा बहाणा करून ५० हजारांवर डल्ला

**सेलू** - वाळू विक्रीचा बहाणा करून अनोळखी इसमाने ५० हजार रुपये हिसकावून नेल्याची घटना वार्ड क्रमांक ५ मध्ये घडली. यास्मीन जुनेद खाँ पठाण (२८) व त्यांचे वडील घरी असताना आरोपीने वाळू हवी का, अशी विचारणा केली. त्यानंतर त्याने वडिलांना दुचाकीवरून बाहेर नेले व पेट्रोल संपल्याचा बहाणा केला. काही वेळाने तो पुन्हा घरी येऊन पोलिसांनी वाहन पकडल्याचे सांगत ८ हजारांची मागणी करू लागला. पैसे देण्यासाठी कपाटातून ५० हजारांचे बंडल काढताच आरोपीने ते हिसकावून पळ काढला. सेलू पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## इतर बहुजन वभिागामार्फत देण्यात येणा-या पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

**वर्धा**- इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती व भटक्या जमातीतील पारंपारिक लोककलाकारांना नटराज पुरस्कार, पारंपारिक कारागिरांना विश्वकर्मा पुरस्कार तसेच सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कार्य करणा-या या समाज प्रबोधनकार, सामाजिक कायकर्ते व संस्थांना क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.या पुरस्कारासाठी इच्छुक पात्र व्यक्तीं व संस्थाकडून अर्ज मागविण्यात येत आहे. इच्छुकांनी ३ मार्च पर्यंत अर्ज सादर करावे, असे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालकांनी कळविले आहे.

## संत गोमाजी मठात शनिवारी विशाल हिंदू संमेलन

**हिंगणघाट** - हिंदू एकतेचा जयघोष आणि सनातन संस्कृतीचा संदेश देण्यासाठी स्थानिक संत गोमाजी महाराज मठ येथे शनिवारी(२८ फेब्रुवारी)विशाल हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ४ वाजता दिंडी काढण्यात येणार असून सायंकाळी ५ वाजता मुख्य कार्यक्रमास सुरुवात होईल. विवेक विचार मंचाचे प्रांत संयोजक अतुल शेंडे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. वर्धा येथील सीमा पांढरकर प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करतील. कार्यक्रमासाठी शहरासह परिसरातील सकल हिंदू बांधव-भगिनींनी सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर मठ परिसरात जय्यत तयारी सुरू असून मोठ्या संख्येने उपस्थिती अपेक्षित आहे.

## स्वयंम योजनेच्या प्रवेशाकरीता मुदतवाढ

**वर्धा** - इतर मागास प्रवर्ग, विमुक्त भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी १० मार्च मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.बीए, बीकॉम, बीएससी अशा १२ वी नंतरच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना १० मार्च पर्यंत अर्ज सादर करता येणार आहे. अर्ज सादर केल्यावर गुणवत्तेनुसार अंतिम निवड यादी ११ मार्च प्रसिध्द करण्यात येईल. निवड यादीनुसार १२ ते २० मार्च पर्यंत प्रवेश घेता येणार आहे.

## भारत-युक्रेन संसदीय मैत्री गटावर अमर काळे

**वर्धा**- १८ व्या लोकसभेच्या कार्यकाळासाठी स्थापन करण्यात आलेल्या भारत-युक्रेन संसदीय मैत्री गटावर वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभा सचिवालयाने याबाबत अधिसूचना जारी केली असून लोकसभाध्यक्षांच्या मान्यतेने ही निवड करण्यात आली आहे.भारत आणि युक्रेन यांच्यातील संसदीय संवाद, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि द्विपक्षीय संबंध दृढ करण्यासाठी या मैत्री गटाची स्थापना करण्यात आली आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ९२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त



### श्रीमद भागवत कथा हरिनाम सप्ताहात मोफत निदान व उपचार शिबीर

**दर्यापूर**- शहराचा मध्यवर्ती भाग म्हणजे सिव्हिल लाईन दर्यापूर येथे स्व. प्रकाशरावजी खुळे यांच्या पाचव्या वर्ष श्राद्ध निमित्त ह.भ.प.श्री.अनिल महाराज साखरे यांच्या मधून वाणीतून श्रीमद् भागवत कथा हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले होते. या भागवत कथेमध्ये डॉ. अवंतिका वामन चर्हाटे एम.डी होमिओपॅथी यांनी उपस्थित भक्तगणांचे मोफत निदान, उपचार व औषधोपचार केले.डॉ. अवंतिकाचे आई-वडील दोन्ही सेवानिवृत्त शिक्षक असून डॉ.अवंतिका चऱ्हाटे ह्या अर्थाने समाजसेवेचे काम करत असल्याबाबतचे मत उपस्थित महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे अध्यक्ष तथा शिक्षक सहकारी बँकेचे संचालक तुळशीदास धांडे यांनी व्यक्त केले. या मोफत निदान व उपचार शिबिराचा पुरुषोत्तम कडू, बाळासाहेब वसु,गजानन गावंडे, मीराताई खुळे, अशोक सांगोले, दुर्गा कडू, मनीषा गावंडे, आशा उमाळे, सुनंदा पवित्रकार, ओवी पवित्रकार, लीला पोटे,आनंदराव टापरे, विजया खुळे, कमलबाई इखे, वर्षा मानकर, शोभा डांगे, रजनी सांगोले, इंदू बेले, विमल खुळे, मीरा खुळे,निता होले इत्यादींनी लाभ घेतला. शिबिराला सर्वांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिल्याबद्दल डॉ.अवंतीका यांचे वडील वामनराव व आई कविता चर्हाटे यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून शिबिराची सांगता झाली.



### श्रीराम हायस्कूलमध्ये विद्यार्थिनींचा सत्कार

**टाकरखेडा संभू -** श्रीराम शिक्षण संस्था, टाकरखेडा शंभू द्वारा संचालित श्रीराम हायस्कूलमध्ये एन.एम.एम.एस. (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला.या परीक्षेत शाळेतील एकूण सात विद्यार्थ्यांपैकी पाच विद्यार्थिनींनी प्राविण्य प्राप्त करत भरघोस यश मिळवले. यामध्ये संजना कैलास सोळंके, खुशी देवानंद यावले, अक्षरा श्रीकांत शेंडे, कार्तिका प्रवीण शेंडे आणि सोनाक्षी प्रकाश इंगोले या विद्यार्थिनींचा समावेश आहे.या यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार संस्थेच्या अध्यक्षा डॉ.नीलंबरी देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक उमेश सोलव तसेच सविता बेलसरे, संतोष देशमुख, संगीता लोहेकर, रीता धनैया, प्रशांत मालवे आणि श्याम देशमुख आदी उपस्थित होते.यावेळी मान्यवरांनी विद्यार्थिनींच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



### डॉ.पंडीत भोयर यांना आचार्य पदवी

**अंजनगाव बारी -** नजिकच्या उदखेड निवासी यांनी उंच भरारी घेत 'विदर्भाच्या सामाजिक व सांस्कृतिक विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान – ऐतिहासिक अभ्यास' या विषयावर सखोल व अभ्यासपूर्ण संशोधन पूर्ण केल्याबद्दल डॉ. पंडीत चंपतराव भोयर यांना दि. २३ फेब्रुवारी रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या वतीने तत्त्वज्ञान विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्रदान करण्यात आली आहे.डॉ.भोयर यांनी आपल्या संशोधनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व कार्याचा विदर्भाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विकासावर झालेला प्रभाव ऐतिहासिक दृष्टीकोनातून सखोलपणे अभ्यासला आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल खा.बळवंत वानखडे, कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, डॉ. मिनल मालधुरे, प्रा. डॉ. ओमराज गजभिये, प्रा. डॉ. संतोष बनसोड, प्रा. डॉ. नितीन कोळी (परीक्षा नियंत्रक), तसेच सावर्डी येथील माजी सरपंच राजकुमार मेश्राम, उदखेड येथील माजी सरपंच राहुल उके, प्रकाश भोयर, मधुकर वाकडे, शेखर बडगे आणि मिलिंद वाहुरवाघ यांनी डॉ. भोयर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.डॉ. भोयर यांच्या या यशामुळे त्यांच्या संस्थेचा, गावाचा आणि जिल्ह्याचा गौरव वाढला असून, भविष्यातही ते संशोधन, अध्यापन व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करतील,असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. डॉ. पंडीत चंपतराव भोयर यांना त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक आणि सामाजिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहे.

# अवघ्या सहा तासात खुनाच्या गुन्हातील आरोपी ताब्यात

## अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/का.प्र.**



राजापेठ पोलीस स्टेशन हद्दीमधील शिशा बार जवळ गोपाल नगर येथील शुभम ठाकरे (३०) याचा २५ फेब्रुवाराच्या रात्री खून झाला होता.या प्रकरणातील आरोपीला शोधण्यास राजापेठ पोलिसांना यश मिळाले असून अवघ्या सहा तासात खुनाच्या गुन्हातील आरोपीला ताब्यात घेतले आहे.

खुनाची माहीती प्राप्त झाल्यावर पोलीस आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ अधिकारी यानी घटनास्थळावर भेट दिली.दोन इसमाचे भांडण होऊन त्यामध्ये एका अज्ञात इसमाने मृतक नामे शुभम किशोर ठाकरे याला धारदार शस्त्राने मारून ठार केल्याची प्राथमिक माहीती प्राप्त झाली होती.सदर गुन्हाचे घटनास्थळावर तात्काळ पोनि संदीप चव्हाण, गुन्हे शाखा यांनी कर्मचा-यासह सह भेट दिली असता आरोपी नामे अनुप दिपक पांडे (वय ४१रा स्वस्तीक नगर अमरावती) यास स्वस्तीक नगर येथून त्याचे प्लॅटीनम गाडी सह ताब्यात घेतले. याचा प्राथमिक तपास केला असता आरोपी व मृतक याचेत दारू पिण्याचे कारणावरून भांडण होवून आरोपी याने शुभमला चाकूने मारल्याचे सांगीतले आहे.

सदर घटनेसंदर्भाने पोलीस स्टेशन राजापेठ येथे खूनाचा गुन्हा नोंद होण्याची कार्यवाही चालू आहे.आरोपी यांचेवर यापूर्वी पोलीस स्टेशन तिवसा येथे दुखापतीचा गुन्हा नोंद आहे.सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे), रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे, सपोआ कैलास पुंडकर गाडगेनगर विभाग यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात स.पो.नि. मनिष वाकोडे, स.पो.नि. महेश इंगोले, सपोनी अमोल कडू, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, फिरोज खान, सतिश देशमुख, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, जहीर शेख, सचिन बहाळे, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, नापोका विकास गुडधे, अतुल संभे, मिर्झा नईम बेग, नाझीम उद्दीन सैयद, पोका विशाल वाकर्पाजर, सागर ठाकरे, रंजीत गावंडे, राजीक रायलीवाले, सुरज चव्हाण, निखील गेडाम, योगेश पवार, चालक संदीप खंडारे, प्रभात पोकळे, चेतन शर्मा, राहुल दुथे यांनी केली.

## साऊर मार्गावर धोकादायक झाडाची फांदी; अपघाताचा धोका वाढला

**टाकरखेडा संभु/वार्ताहर**

सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांच्या अखत्यारीतील राज्य मार्ग क्र. ३०८ (पूर्णा नगर फाटा ते शिराळा) या मार्गावर साऊर परिसरात एका झाडाची मोठी फांदी रस्त्याच्या मधोमध लटकलेली असून गेल्या अनेक दिवसांपासून ती कायम आहे. टाकरखेडा रामा–पूर्णा नगर मार्गालगत असलेल्या या ठिकाणी वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही फांदी रस्त्याच्या मधोमध खाली झुकलेली असल्यामुळे विशेषतः रात्रीच्या वेळी दुचाकी व चारचाकी वाहनधारकांसाठी अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत वारंवार लक्ष वेधले असले तरी अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, अशी तक्रार आहे. साऊर जवळील हा मार्ग वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असून दररोज शेकडो वाहनांची ये-जा येथे होत असते.

त्यामुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून झाडाची धोकादायक फांदी काढावी, अशी मागणी ग्रामस्थ व वाहनचालकांकडून होत आहे.प्रशासनाने वेळीच उपाययोजना केल्यास मोठा अनर्थ टळू शकतो, अन्यथा अपघात झाल्यास जबाबदारी कोणाची, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.



# पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक सहल व टेक्निकल फिल्ड व्हिजिट

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर च्या प्रथम व द्वितीय वर्ष डिग्री व डिप्लोमा च्या विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक सहलीचे तसेच टेक्निकल फिल्ड व्हिजिट चे आयोजन करण्यात आले होते. सदर व्हिजिटमध्ये सर्वप्रथम महिमापुर येथील स्टेप वेल ची विद्यार्थ्यांनी पाहणी केली सरपंच अमोल पाटील वाटाणे यांनी विद्यार्थ्यांना देवगिरी साम्राज्यातील १२ व्या शतकातील ऐतिहासिक महिमापुर पाय विहिरी बद्दल इत्यंभूत माहिती दिली, विहीर निर्माण करण्याकरिता लागणाऱ्या विटा तसेच दगड व इतर साहित्य तसेच विहीर मजबुती करिता काय उपाययोजना केल्या होत्या हे जाणून घेतले, यानंतर सरपंच अमोल पाटील वाटाणे यांनी सर्व शिक्षक वर्ग व विद्यार्थ्यांचे ग्रामपंचायत कार्यालय येथे स्वागत केले व आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत च्या योजना कशा असतात व त्याची प्लॅनिंग कशी करावी याविषयी माहिती दिली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आले.

दरम्यान विध्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नाची समाधान पूर्वक उत्तर व माहिती सरपंच अमोल वाटणे यांनी दिली.पुढील सत्रात श्री संत गाडगेबाबा गौरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट माऊली धांडे येथे भेट दिली व तेथील गौरक्षण



तसेच पर्यावरण विषयी चालू असलेले कार्य याबाबत माहिती जाणून घेतली. प्राध्यापक गजानन भारसाकळे यांनी सर्व शिक्षक वर्गाचे व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या प्रसंगी त्यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व आपले अनुभव सांगितले, व विध्यार्थ्यांना काही सूचना दिल्या जेणेकरून पुढील आयुष्यात त्यांना आपले ध्येय प्राप्त करता येईल. प्रा भारसाकळे यांनी मिळविलेल्या तीन पेटेंट बद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी संपूर्ण मंदिराचे आतील तसेच बाहेरच्या बाजूने मोजमाप करून डॉक्युमेंटेशन करिता आवश्यक असलेली सर्व माहिती गोळा केली याप्रसंगी पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर च्या वतीने श्री गणेश रामेकर यांचा सत्कार करण्यात आला. ही शैक्षणिक फिल्ड व्हिजिट प्राचार्य संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राध्यापक राम विघे यांच्या पुढाकाराने करण्यात आली, आकि.प्रा. स्नेहल विधळे,आकि.प्रा.तृप्ती भामकर प्रा. भूपेंद्र जयस्वाल,हरीश पळसोकार प्रामुख्याने उपस्थित होते. फिल्ड व्हिजिट ची विध्यार्थी संयोजिका म्हणून बी आर्च द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी कडू हिने आपली जबाबदारी पार पाडली. सदर शैक्षणिक फिल्ड व्हिजिटमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय आनंद लुटला.



**तळवेल-येथील शेतकरी कैलास फुलझेले यांच्या शेतात बहरलेली उन्हाळी कांद्याची लागवड; कष्ट, नियोजन आणि आशेची हिरवीगार कहाणी सांगणारे हे समृद्ध पीक.**

छायाचित्र : **संतोष शेंडे,** टाकरखेडा संभू

## सायन्स ऑलिंपियाडमध्ये पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची सुवर्ण कामगिरी

**अमरावती** - पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल च्या विद्यार्थ्यांनी सायन्स ऑलिंपियाड स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत सुवर्णपदकांची कमाई केली आहे. राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे नाव उज्ज्वल केले.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयातील संकल्पना, तर्कशक्ती व समस्या सोडवण्याची क्षमता



प्रभावीपणे सिद्ध केली. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांना हे यश मिळाले.शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पालकांनीही विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात शाळेचा गौरव वाढला असून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली आहे.

# सौर ऊर्जेच्या कामगिरीसाठी महावितरणला बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्ड

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणचा नवी दिल्ली येथे २०२६ च्या बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्डने गौरव करण्यात आला. केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्याहस्ते मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात तब्बल १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा निर्मितीसाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० ची अंमलबजावणी सुरू आहे. राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनीही या योजनेला मोठी गती दिली आहे.बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्डसाठी रस्ते, बंदरे, वीज, शहरी वाहतूक, पाणी आदी ८ क्षेत्रांतील पायाभूत सुविधा प्रकल्पांचे मूल्यमापन करण्यात येते. यंदा देशातील सुमारे १४५ प्रकल्पांचे मूल्यमापन करून निती आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अमिताभ कांत यांच्या अध्यक्षतेखालील २५ सदस्यांच्या निवड समितीने पुरस्कारांसाठी प्रकल्पांची निवड



जाहीर केली. यात वीज क्षेत्रामध्ये मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणची देशपातळीवर पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. जगातील सर्वात मोठा विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मध्ये आतापर्यंत १९८५ कृषीवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल १० लाख २५ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे. या योजनेमुळे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. तसेच महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. तब्बल २३१ विकासकांकडून या योजनेमध्ये १६ हजार मेगावॅटचे विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प वेगाने उभारण्यात येत आहेत.

## सुभद्रा चॅरिटेबल ट्रस्ट कडुन विरेंद्र वानखडे यांना आर्थिक मदत

**शिराळा -** श्री सुभद्रा चॅरिटेबल ट्रस्ट शिराळा कडुन आजारी विरेंद्र जयगोपाल वानखडे यांना आर्थिक मदत कुडबास संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य व माजी जि.प. सभापती मिलिंदभाऊ तायडे यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी मिलिंदभाऊ तायडे, नंदकुमार चिंचखेडे, ज्ञानेश्वर वानखड, अवधूत तायडे, योगेंद्र तायडे, मधुकरराव खेडकर, रविंद्र मोहोड धनराज सिरसाट, सुरेश सुखदान, अशोकराव मनोहरे, दिनेश तायडे,आकाश रामटेके आदी उपस्थित होते.



# विद्यापीठात क्लाऊड आणि जनरेटिव्ह एआय वर तांत्रिक कार्यशाळा

**अमरावती/प्रतिनिधी**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संगणक शास्त्र विभाग, एडब्ल्यू क्लाऊड क्लब आणि इन्क्युबेशन सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने 'क्लाउड आणि जनरेटिव्ह एआय' या विषयावर एक दिवसीय विशेष तांत्रिक कार्यशाळा उत्साहात पार पडली. शैक्षणिक सिद्धांत आणि उद्योगातील बदलत्या गरजा यांच्यातील दरी सांधण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थी आणि शिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान आणि जागतिक उद्योगातील अनुभवांची ओळख करून देण्यात आली.

कार्यशाळेत आनंद मेहता यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. ते सध्या एनएएसडीएक्यू मध्ये कार्यरत असून एडब्ल्यूएसचे कम्युनिटी बिल्डर, 'फिनऑप्स' आणि एआय क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत. त्यांनी आपल्या प्रदीर्घ




अनुभवातून मल्टि-क्लाउड आर्किटेक्चर आणि एंटरप्राइझ स्तरावरील तंत्रज्ञानावर कार्यशाळेत प्रकाश टाकला.कार्यशाळेत एडब्ल्यूएस फाउंडेशन, क्लाऊड कॉम्प्युटिंगच्या मूलभूत संकल्पनांसह एडब्ल्यूएस च्या विविध सेवांची सखोल माहिती देण्यात आली. तसेच वास्तविक जगात आणि विविध उद्योगांमध्ये एआय चा प्रभावी वापर कसा केला जातो, फिनऑप्स, क्लाऊडवरील खर्च कमी करणे, आर्थिक व्यवस्थापन करण्याचे कौशल्य, जे सध्याच्या कॉर्पोरेट जगात अत्यंत महत्त्वाचे मानले जाते, करिअर रोडमॅप, क्लाऊड आणि एआय क्षेत्रात करिअरच्या संधी आणि अपेक्षा आदिंबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या नेतृत्वात व प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे मार्गदर्शन आणि कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मो. आतिक, विभागातील शिक्षक तसेच इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरुळकर, नरेश मोवाळे, रवी ढेंगळे, भावेश वारके, संतोष मालधुरे, एडब्ल्यूएस क्लाऊड क्लब कॅप्टन यश साठे व प्रणव शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. कार्यक्रमात सर्व सहभागींना एडब्ल्यूएस कडून प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. कार्यशाळेत संगणकशास्त्र विभागातील पदवी, पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी, प्राध्यापकांनी मोठया संख्येने सहभाग नोंदवला.

GHARIKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

# अपघाताचा बनाव, अल्पवयीन मुलाचा झाला खून

## भातकुलीतील घटना,आरोपी रुग्णालयात पोलिस निगराणीखाली







**अमरावती/प्रतिनिधीः-** भातकुली पोलीस ठाणे हद्दीत २५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री नोंदविण्यात आलेल्या अपघाताच्या प्रकरणाचा तपास करताना तो प्रत्यक्षात खून असल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी आरोपीवर अटकेची कारवाई करण्याची तयारी सुरू असून तो सध्या रुग्णालयात पोलिस निगराणीखाली उपचार घेत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बरायठा, शाहागड बंडा, जि. सागर (मध्यप्रदेश) येथून साडी विक्रीसाठी आलेले काही भटके कुटुंबीय सहा-सात दिवसांपूर्वी भातकुली परिसरात वास्तव्यास होते. त्यापैकी जितेराजा अरुण गौड व त्याचा नातेवाईक बब्बु बिसनांथ गौड हे २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी भातकुली ते चेचरवाडी रोडवरील पुलाजवळ पाणी आणण्यासाठी जात असताना मोटारसायकलने मागून धडक देऊन पसार झाल्याची तक्रार देण्यात आली होती. जखमींना प्राथमिक उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, भातकुली येथे दाखल करण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जितेराजा अरुण गौड यास मृत घोषित केले, तर बब्बु बिसनांथ गौड यास पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. फिर्यादीच्या तक्रारीवरून भातकुली पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा नोंदविण्यात आला होता. दरम्यान, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन जखमांची पाहणी केली असता त्या धारदार शस्त्राने झाल्याचा प्रथमदर्शनी संशय आला. त्यानंतर मृतकाचे वडील व नातेवाईकांना गुन्हे शाखा कार्यालयात बोलावून विश्वासात घेऊन सखोल चौकशी करण्यात आली. चौकशीत जेवणाच्या कारणावरून जितेराजा व बब्बु यांच्यात वाद होऊन हाणामारी झाली आणि रागाच्या भरात बब्बु बिसनांथ गौड याने धारदार शस्त्राने वार करून खून केल्याचे निष्पन्न झाले. सदर कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शना ☞(पान २ वर)

# धामणगाव मार्गावर कार-बाईकचा भीषण अपघात

## महिलेचा जागीच मृत्यू, ५ जण गंभीर जखमी





**अमरावती/प्रतिनिधीः-** धामणगाव - देवगाव मार्गावर स्विफ्ट कार आणि दुचाकी यांच्यात समोरा समोर धडक झाल्याची घटना आज गुरुवार २६ फेब्रुवारीला सकाळी ११.१५ वाजता सुमारास समोर आली. यामध्ये एका महिलेचा मृत्यू झाला असून पाच जण जखमी आहे. त्यांच्यावर यवतमाळ आणि अमरावती येथे उपचार सुरू आहे. भावना प्रवीण कदम (कारंजा) असे मृत महिलेचे नाव आहे तर पार्थ देशमुख, योगेश देशमुख, सारिका देशमुख आणि इतर दोन (सर्व राहणार यवतमाळ) अशी जखमींची नावे आहे. ☞(पान २ वर)

# मांडवा ग्रामस्थांचे उपोषण मागे

**माजी आमदार वीरेंद्र जगताप यांचे प्रयत्न**

## उपविभागीय अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना रस्ता देण्यासाठी कारवाईचे आदेश




**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे तहसीलपासून अवघ्या ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या मांडवा येथे, उपोषणकर्ते २५ फेब्रुवारीपासून तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसले होते.त्यांच्या शेतजमिनीत प्रवेश मिळावा या मागणीसाठी माजी आमदार आणि काँग्रेस नेते वीरेंद्र जगताप यांच्या प्रयत्नांमुळे २६ फेब्रुवारी रोजी उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी उपोषणकर्त्यांना सरबत आणि उपविभागीय अधिकाऱ्यांकडून पत्र देण्यात आले. शेतीसाठी रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी मांडवा गावातील लोकांनी २५ फेब्रुवारीपासून तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. ज्यामध्ये तहसीलदारांनी घटनास्थळाची पाहणी न करता आणि कोणतीही माहिती न घेता दिलेल्या आदेशांविरुद्ध उपोषणकर्त्यांनी अन्न त्याग आंदोलन सुरू केले. मांडवा गावातील किसन इंगोले आणि इतर उपोषणकर्त्यांनी उपोषण सुरू केले. यासाठी २६ फेब्रुवारी रोजी माजी आमदार काँग्रेस नेते वीरेंद्र जगताप यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांशी चर्चा करून मांडवा गावातील उपोषणकर्त्यांना न्याय देण्याबाबत आणि त्यांना शेतीसाठी रस्ता देण्याबाबत बोलणे केले.त्या अनुषंगाने उपविभागीय अधिकाऱ्यांनी पत्र दिले आणि ५ मार्च रोजी तहसीलदार, पोलिस विभाग ☞(पान २ वर),

# गांधी पूल सार्वजनिक वाचनालय बांधकामात लाखो रुपयांचा घोटाळा?

## ७८ लाखांच्या कामात गंभीर आर्थिक अनियमिततेचे आरोप

### -चौकशी न झाल्यास आंदोलनाचा इशारा





**अचलपूर/प्रतिनिधीः-** जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत नगर परिषद अचलपूर हद्दीतील गांधी पूल परिसरात सुरू असलेल्या सार्वजनिक वाचनालयाच्या प्रथम मजल्याच्या बांधकामात मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. सुमारे ७८,१८,३०४/- खर्चाच्या या कामात अंदाजपत्रकानुसार बांधकाम पूर्ण न होताच संबंधित कंत्राटदारास १ ते ४ असे सलग RA Bill अदा करण्यात आल्याने लाखोंचा घोटाळा झाल्याची चर्चा शहरभर रंगली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंत्राटदाराने हे काम अंदाज ☞(पान २ वर)

# इलेक्ट्रिक वाहनाचा शॉक लागल्याने चिमुकलीचा मृत्यू

### नालवाडी परिसरात हळहळ



आरोही ही 'स्कूल ऑफ ब्रिलियंस 'ची सातव्या वर्गातील विद्यार्थिनी होती.

**वर्धा/प्रतिनिधीः-** खेळण्या-बागडण्याच्या वयात एका १३ वर्षीय चिमुकलीचा इलेक्ट्रिक वाहनाचा शॉक लागल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. नालवाडी परिसरातील गजानन अपार्टमेंट मधील ही घटना असून, या घटनेने संपूर्ण शहरावर शोककळा पसरली आहे. आरोही तथागत रामटेके (वय १३) असे मृतक बालिकेचे नाव आहे. माहितीनुसार आरोही ही 'स्कूल ऑफ ब्रिलियंस 'ची सातव्या वर्गातील विद्यार्थिनी होती. बुधवारी दुपारी अडीच ते तीन वाजेच्या सुमारास आरोही आपल्या मैत्रिणीकडे अभ्यासासाठी गेली होती. तिथे बाथरूमला गेली. त्यावेळी बाथरूमच्या स्विच बोर्ड मध्ये इलेक्ट्रिक गाडी चार्जिंगला लावण्यात आली होती. त्या बोर्डमधून तिला जोरदार करंट लागला. प्राथमिक माहितीनुसार त्या बोर्डला इलेक्ट्रिक गाडीचा प्लग लावलेला होता. ज्यामुळे हा शॉक लागल्याची खात्री झाली आहे. कारण ही इलेक्ट्रिक दुचाकी तिच्या अंगावर ☞(पान २ वर)

# तुळजापूर गडी येथे २१ शेतकऱ्यांच्या शेतात चोरी

## ३ लाखांचे साहित्य लंपास



**बेलोरा/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार पोलिस स्टेशन अंतर्गत तुळजापूर गडी येथील शेत शिवारात चोरट्यांनी एकाच रात्री धुमाकूळ घालत २१ शेतकऱ्यांचे शेती साहित्य चोरून नेले. यामध्ये तूर, कापूस, केबल, झटका मशीन आणि शेती अवजारांचा समावेश असून, एकूण ३ लाख रुपयांचा माल लंपास झाला आहे.

अंबादस देविदास नवलकर आणि इतर २० शेतकऱ्यांच्या शेतात ही चोरी झाली. रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्यांनी चारचाकी गाडी आणून सर्व शेतकऱ्यांच्या शेतातील महत्त्वाचे साहित्य जमा केले आणि पसार झाले. सकाळी शेतकरी ☞(पान २ वर)

# नगरसेविका कांबळे यांच्या पात्रतेवर सुनावणी १७ मार्च रोजी

### पक्षाच्या व्हिपचे उल्लंघन केल्याचा आरोप

### -महायुतीच्या उमेदवाराला केले होते मतदान



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महापालिकेच्या महापौर-उपमहापौर निवडणुकीत एमआयएमच्या प्रभाग क्रमांक २१ जुनी वस्ती प्रभागातील नगरसेविका मीरा कांबळे यांनी महायुतीच्या उमेदवारांना मतदान करून एकच खळबळ उडून दिली होती. मीरा कांबळे यांचे सदस्यत्व रद्द करणे आणि त्यांना अपात्र घोषित करण्याच्या मागणीसाठी एमआयएम पक्षाच्या वतीने विभागीय आयुक्त श्वेता सिंगल यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीला विभागीय आयुक्तांनी मान्य केले आहे. त्यानुसार मीरा कांबळे यांना नोटीस जारी केली आहे. कांबळे यांच्या पात्रतेवर १७ मार्च रोजी सुनावणी घेण्यात येणार आहे. आता १७ मार्च रोजी होणाऱ्या सुनावणी कडे सर्वांच्या नजरा लागलेल्या आहे. मीरा कांबळे पात्र राहतात कि त्यांची सदस्यता रद्द होते याकडे लक्ष लागले आहे. एमआयएमच्या वतीने एड. नासिर शाह ☞(पान २ वर)

# बालनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीचे उद्‍घाटन

## कलावंत व कलाकारांना सर्व सोयी उपलब्ध करून देणार -महापौर तेजवानी

### -संत ज्ञानेश्वर नाट्य संकुल आणि टाऊन हॉलचे लवकरच नुतनीकरण





**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाच्या वतीने सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या माध्यमातून मराठी बाल नाट्यस्पर्धेची अंतिम फेरी ला गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ पासून अमरावती मध्ये अतिशय सुंदर उद्‍घाटन समारंभाने सुरुवात झाली. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बाल नाट्य स्पर्धेची ही अंतिम फेरी सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांच्या देखरेखीत आज पासून सुरु झाली असून सांस्कृतिक संचालनालयाचे अधीक्षक वसंतराव खडसे आज स्वतः उपस्थित होते.

अमरावतीचे लोक प्रतिनिधी खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा, ☞(पान २ वर)

# प्रत्येक खरेदीवर उपहार पक्का

## ड्रॉ नाही, स्पर्धा नाही, जितकी जास्त खरेदी तितके आकर्षक उपहार

**आराधना होलसेल शॉपिंग मॉलकडून ग्राहकांसाठी नवी आकर्षक योजना**



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील नामांकित आराधना होलसेल शॉपिंग मॉल तर्फे ग्राहकांसाठी आणखी एक आकर्षक उपहार योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत आता केवळ लाडक्या बहिणींनाच नव्हे, तर प्रत्येक ग्राहकाला प्रत्येक खरेदीवर उपहार हमखास मिळणार आहे. आराधना होलसेल शॉपिंग मॉलचे संचालक हबलानी कुटुंबाने शहरवासीयांसाठी ही नवी योजना सुरू केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून कपड्यांच्या व्यवसायात विश्वासार्ह ब्रँड म्हणून कार्यरत असलेल्या आराधना होलसेल शॉपिंग मॉलमध्ये ग्राहकांच्या सोयीसुविधा आणि सेवेवर नेहमीच विशेष भर दिला जातो. येथे येणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला अगदी कमी खरेदीतही अधिक समाधान मिळावे, यासाठी मॉल परिवार सातत्याने प्रयत्नशील असतो. याच उद्देशाने यापूर्वी शहरातील लाडक्या बहिणींसाठी 'आराधना लाडली बहन उपहार योजना' ☞(पान २ वर)

# इर्विन, डफरीन व सुपर हॉस्पिटलमधील आरोग्य सुविधांसाठी निधी द्या- आ.सुलभा खोडके

**-जिल्हा नियोजन समितीचे अंदाज पत्रक १ हजार कोटींचे करा**

## -सीआयआयआयटी प्रकल्पाला ३५ कोटींच्या निधीसाठी पुरवणी मागणी



**मुंबई/प्रतिनिधीः-** राज्यविधिमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये आज गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी रोजीच्या कामकाजादरम्यान वर्ष २०२६-२०२७च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करतांना अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी अमरावतीच्या आरोग्य सेवांचा विस्तार व बळकटीसाठी राज्याच्या बजेट मध्ये भरीव निधीची तरतूद करण्याची मागणी केली. त्याचबरोबर अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात मंजूर झालेल्या 'सीआयआयआयटी' प्रकल्पाला ३५ कोटींच्या निधीसाठी पुरवणी मागणी सुद्धा सभागृहातून करण्यात आली.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित पुरवणीत मागणीवर चर्चा करतांना आ. खोडके यांनी सांगितले कि, अमरावती जिल्ह्यातील तंत्रशिक्षण व अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची तांत्रिक शिक्षण गुणवत्ता सुधारण्यास त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्या मार्फत अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात खाजगी सहभागातून 'सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इक्यूबेशन अँड ट्रेनिंग प्रकल्प अर्थात 'सीआयआयआयटी'च्या कौशल्यवर्धन केंद्रांची उभारणी करण्यास मागील वर्षी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना.अजितदादा पवार यांनी घोषणा करून मान्यता देण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाच्या इमारत बांधकाम व प्रशिक्षण खर्चाला जवळपास २०० कोटी रुपये खर्च लागणार असून त्यापैकी १६५ कोटींचा खर्च टाटा टेक्नोलॉजी लिमिटेड आणि भागीदार कंपन्या करतील आणि १५ टक्के खर्च म्हणजेच ३५ कोटी इतका खर्च हा महाराष्ट्र शासनाद्वारे ☞(पान २ वर)

# अमरावतीत ३१ सराईत गुंड्यांची यादी

### -काहींवर एमपीडीए, तर काहींवर तडीपारी व मोक्का प्रस्तावित

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी सणोत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या निर्देशानुसार मागील पाच वर्षांचा गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून २३,७०४ आरोपींची यादी तयार करण्यात आली आहे. त्यातून ३१ सराईत व वारंवार गुन्हे करणाऱ्या गुंड्यांची स्वतंत्र छाननी करून मोठ्या कारवाईची तयारी सुरू आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, शहरातील १० पोलीस ठाण्यांमधील गुन्हेगारी नोंदी संगणकीकृत पद्धतीने संकलित करण्यात आल्या. सणांच्या काळात वारंवार गोंधळ, मारामाऱ्या किंवा गंभीर गुन्ह्यांत सहभागी झालेल्या आरोपींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या ३१ आरोपींवर एमपीडीए, ☞(पान २ वर)